महाराष्ट्र
साहित्य
परिषद

# महाराष्ट्र साहित्य पत्रिका

जानेवारी ते मार्च २०१५



नाचू कीर्तनाचे रंगी ।
ज्ञानदीप लावू जगी ॥

संत नामदेवांची कर्मभूमी असलेल्या घुमान (पंजाब) येथे ८८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन संपन्न होत आहे. नामदेवांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन!

# मनःपूर्वक अभिनंदन!

ज्येष्ठ कादंबरीकार भालचंद्र नेमाडे यांना मराठी साहित्यातील अमूल्य योगदानासाठी भारतीय साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च मानला गेलेला 'ज्ञानपीठ' सन्मान नुकताच जाहीर झाला आहे.

नेमाडे यांच्या रूपाने मराठी भाषेला हा सन्मान मिळणे ही मराठी साहित्यरसिकांसाठी निश्चितच आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. 'कोसला' ते 'हिंदू' अशा गेल्या ५० वर्षांतील आपल्या सर्जनशील निर्मितीने नेमाडे यांनी मराठी साहित्याला जी जागतिक उंची मिळवून दिली त्याचा हा गौरव आहे.

भालचंद्र नेमाडे यांचे मनःपूर्वक अभिनंदन!





महाराष्ट्र साहित्य परिषदेचे त्रैमासिक मुखपत्र

# महाराष्ट्र साहित्य पत्रिका

अंक क्र. ३५०, जानेवारी-मार्च २०१५

संपादक

**महेंद्र मुंजाळ**

संपादक मंडळ

**मनोहर सोनवणे । प्रा. सुजाता शेणई । डॉ. किसन पाटील**
**डॉ. पुरुषोत्तम काळे । नंदा सुर्वे । श्याम जोशी**

सल्लागार संपादक मंडळ

**डॉ. नीलिमा गुंडी । प्रा. रूपाली शिंदे । डॉ. कल्याणी दिवेकर**

प्रकाशक

**प्रकाश पायगुडे**

प्रमुख कार्यवाह

महाराष्ट्र साहित्य परिषद

**महाराष्ट्र साहित्य परिषद**

टिळक रस्ता, पुणे ४११०३०. दूरभाष : ०२०-२४४७५९६३
संकेतस्थळ : www.masapapune.org
ई-मेल : masaparishad@gmail.com
(कार्यालयाची वेळ : स. ९.३० ते १२, दु. ४.३० ते रा. ८)

महाराष्ट्र साहित्य परिषद

मुद्रक-प्रकाशक
**प्रकाश पायगुडे**
प्रमुख कार्यवाह
महाराष्ट्र साहित्य परिषद,
टिळक रस्ता, पुणे ४११०३०.

संपादकीय संयोजन
**संदीप खाडे**

अक्षरजुळणी व सजावट
**आर्ट ॲडव्हर्टायझिंग**

मुखपृष्ठ
**जयदीप कडू**

मुद्रितशोधन
**अशोक देव**

मुद्रणस्थळ
**पुणे विद्यार्थी गृह,**
महाराष्ट्र मुद्रणशाळा छापखाना
सदाशिव पेठ, पुणे
४११०३०.

मूल्य : **१५ रुपये**

प्रकाशन क्र. ३५०
जानेवारी-मार्च २०१५

या अंकात व्यक्त झालेल्या विचारांशी संपादक, संपादन समिती, सल्लागार मंडळ तसेच प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

# अं|त|रं|ग

३ **संपादकीय - महेंद्र मुंजाळ**

■ **निमित्त : साहित्य संमेलन**

६ **संत नामदेव, घुमान आणि शीख संप्रदाय**
डॉ. निशिकांत मिरजकर

१२ **डॉ. सदानंद मोरे : महाराष्ट्राच्या लोकव्यवहाराचा मार्मिक अभ्यासक** - डॉ. राजा दीक्षित

■ **निमित्त : ज्ञानपीठ**

१८ **'ज्ञानपीठ'ची समृद्ध अडगळ** - संजय भास्कर जोशी

■ **विशेष लेख**

२४ **होय, मराठी अभिजातच..** - प्रा. हरी नरके

■ **मालिका : समकालीन कवी**

२८ **मी कवितेच्या डोळ्यांत पाहतो** - श्रीधर नांदेडकर

३२ **श्रीधर नांदेडकरांची कविता : आत्मपिडेकडून सर्वव्यापी करुणेकडे...** - डॉ. प्रभा गणोरकर

३८ **भाषण** - डॉ. अरुणा ढेरे

■ **सुमनांजली**

४४ **म. द. हातकणंगलेकर** - डॉ. रणधीर शिंदे

४८ **सरिता पदकी** - डॉ. मंदा खांडगे

५१ **नव्या जाणिवा** - विश्राम गुप्ते

■ **सदर : प्रकाशक आणि त्यांचे प्रकल्प**

५४ **पद्मगंधा प्रकाशन** - प्रा. सुजाता शेणई

■ निवडक नवे

५७ **गाज** - नंदा सुर्वे

५८ **साहित्यवारी घुमानद्वारी** - प्रदीप खेतमर

५९ **मुख्य शाखा व शाखा कार्यवृत्त** - प्रकाश पायगुडे

# संपादकीय



## संपादकीय

**महेंद्र मुंजाळ**

महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचा याआधीचा अंक (क्र. ३४९) डिसेंबर २०१४ मध्ये प्रकाशित झाला. नवे रूप, नवे स्वरूप घेऊन आलेला आमच्या संपादकीय कार्यकाळातला हा पहिलाच अंक. पत्रिकेच्या अनेक वाचकांनी हा अंक आवडल्याचे विविध माध्यमांतून आवर्जून आम्हाला कळवले. यात नामवंत साहित्यिकांबरोबरच मराठी भाषेचे अभ्यासक-संशोधक, मराठीचे जिज्ञासू विद्यार्थी, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील सर्वसामान्य वाचक, मराठी विषय घेऊन एमपीएससी/यूपीएससी करणारे विद्यार्थी यांचा समावेश होता. या प्रतिसादाबद्दल पत्रिकेच्या सर्व वाचकांना मन:पूर्वक धन्यवाद द्यावेसे वाटतात. वाचकांचा हा प्रतिसाद आमचा उत्साह वाढवणारा, आम्हाला प्रोत्साहन देणारा तर आहेच, त्याचबरोबर आमच्या जबाबदारीची जाणीवही करून देणारा आहे असे आम्ही मानतो. पत्रिकेच्या वाचकांना पुढील काळात अधिकाधिक दर्जेदार अंक वाचायला मिळतील, असा विश्वास या निमित्ताने आमच्या सर्व संपादकीय सोबत्यांच्या वतीने देतो.

या अंकाच्या निमित्ताने आम्ही एक प्रयोग केला. हा अंक आम्ही साहित्य परिषदेच्या www.masapapune.org या संकेतस्थळावर पीडीएफ स्वरूपातही उपलब्ध करून दिला. त्यालाही बऱ्यापैकी चांगला प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्राबरोबरच बृहन्महाराष्ट्रातील गुलबर्गा, बेळगाव, इंदूर, वडोदरा, हैदराबाद ते अगदी अमेरिकेतील सॅन होजे येथूनही वाचकांनी हा ऑनलाइन अंक आवडला अशा प्रतिक्रिया आमच्यापर्यंत पोहोचवल्या. यात तरुण वाचक अर्थातच जास्त होते. हा अनुभवही आम्हाला सुखद धक्का देणारा होता. यापुढचे अंकही परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

आमच्या या सर्व प्रयत्नांना पाठबळ देण्याचे काम परिषदेच्या कार्याध्यक्ष डॉ. माधवी वैद्य, प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे, कोषाध्यक्ष सुनील महाजन तसेच परिषदेचे इतर सर्व पदाधिकारी, जिल्हा प्रतिनिधी या सर्वांनी खूप चांगल्या पद्धतीने केले. त्याबद्दल त्यांनाही धन्यवाद द्यावेसे वाटतात.

या अंकाच्या निमित्ताने मनाला वेदना देणाऱ्या एका घटनेवर प्रकाश टाकावासा वाटतो. ती घटना म्हणजे पुरोगामी विचारवंत कॉम्रेड गोविंदराव पानसरे यांची हत्या. विवेकी विचारांच्या डॉ. दाभोलकरांच्या हत्येनंतर त्याच पद्धतीने गोविंदराव पानसरे यांची हत्या होणे ही धक्कादायक बाब आहे. महाराष्ट्राच्या पुरोगामित्वाला कलंक लावणारी ही घटना आहे. महाराष्ट्राने आता तरी खडबडून जागे होण्याची वेळ आली आहे. गोविंदराव पानसरे यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

आता या अंकाच्या निमित्ताने.

मागील काही महिन्यांत अनेक घडामोडींनी मराठी साहित्यविश्व ढवळून निघाले आहे. त्यात तीन घडामोडींचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. एक, घुमान येथे होत असलेले साहित्य संमेलन, दोन, भालचंद्र नेमाडे यांना ज्ञानपीठ आणि तीन, मराठीला अभिजात भाषेचा दर्जा.

साहित्य संमेलन हा मराठी साहित्यविश्वाचा अविभाज्य घटक आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाने यंदाचे ८८वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन महाराष्ट्राची सीमा ओलांडून संत नामदेवांची कर्मभूमी असलेल्या घुमान (पंजाब) येथे घेण्याचा धाडसी निर्णय घेतला त्यावरून बराच गहजब झाला, अनेक शंका उपस्थित केल्या गेल्या. या संमेलनाला दोनशे तरी लोक येणार का, इथपासून ते तिथे कोण मराठी पुस्तके विकत घेणार, इथपर्यंत. परंतु साहित्य महामंडळ तसेच आयोजक ‘सरहद’चे संजय नहार आणि संमेलनाचे स्वागताध्यक्ष भारत देसडला यांनी गेली ४-५ महिने अविश्रांत काम करून, संमेलनपूर्व अनेक कार्यक्रम करून, उपक्रम राबवून सुरुवातीची नकारात्मक

परिस्थिती बदलवली आणि आज या संमेलनाला हजारो साहित्यरसिक उपस्थित राहतील असे वातावरण तयार झाले आहे. ही निश्चितच महत्त्वाची बाब आहे.

'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी।।' असे व्रत धारण करणाऱ्या, वारकरी संप्रदायाचे आद्य प्रवर्तक असलेल्या, मराठी संतकाव्याला केंद्रीभूत असलेल्या 'अभंग' या रूपबंधाचे निर्माते असलेल्या संत नामदेवांनी भक्तिमार्गाचा प्रसार आणि जनप्रबोधन यासाठी सुमारे सातशे वर्षांपूर्वी भारतभर संचार केला. विशेषत: उत्तर भारतात त्यांनी केलेल्या कार्याचा प्रभाव आजही ठळकपणे जाणवतो. पंजाबमध्ये तर त्यांनी घुमान नावाचे एक स्वतंत्र गावच वसवले. 'बाबा नामदेवजी का डेरा' या नावाने हे गाव प्रसिद्ध आहे. राष्ट्रीय ऐक्याचे प्रवर्तक असलेल्या नामदेवांच्या या घुमान गावात ८८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन ३, ४ व ५ एप्रिल २०१५ रोजी संपन्न होत आहे, ही निश्चितच वैशिष्ट्यपूर्ण बाब आहे. या निमित्ताने संत नामदेव, घुमान आणि शीख संप्रदाय यांच्यातील ऋणानुबंधांवर प्रकाश टाकणारा डॉ. निशिकांत मिरजकर यांचा लेख या अंकात आहे.

या संमेलनाला डॉ. सदानंद मोरे यांच्या रूपाने संत तुकारामांचा वंशज असलेला संतसाहित्याचा व्यासंगी अभ्यासक, सर्जनशील इतिहास संशोधक, महाराष्ट्राच्या लोकव्यवहाराचा मार्मिक विश्लेषक अध्यक्ष म्हणून लाभावा हाही एक दुग्धशर्करा योग आहे. डॉ. मोरे यांचे मन:पूर्वक अभिनंदन! या निमिताने या सम्यक् विचारवंताच्या कार्यकर्तृत्वावर दृष्टिक्षेप टाकणारा डॉ. राजा दीक्षित यांचा लेख या अंकात आहे.

ज्येष्ठ कादंबरीकार भालचंद्र नेमाडे यांना भारतीय साहित्य क्षेत्रात सर्वोच्च मानला गेलेला ज्ञानपीठ सन्मान नुकताच जाहीर झाला आहे. भालचंद्र नेमाडे यांनी गेल्या पन्नास वर्षांत आपल्या सर्जनशील निर्मितीने मराठी साहित्यात जी मौलिक भर घातली आहे त्याचाच हा सन्मान आहे आणि तेवढाच तो मराठी जनांचाही सन्मान आहे. नेमाडे यांचे अभिनंदन! या निमित्ताने भालचंद्र नेमाडे यांना ज्ञानपीठ मिळण्याचे मराठी साहित्यविश्वाच्या दृष्टीने कोणकोणते आयाम असू शकतात, हे अधोरेखित करणारा संजय भास्कर जोशी यांचा लेख या अंकात आहे.

मराठी भाषेच्या अभिजाततेचा मुद्दा मागील काही दिवस चर्चेत आहे. प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने अनेक पुराव्यांनिशी मराठी भाषा अभिजात आहे हे सिद्ध करून दाखवले आहे. या समितीचा प्रस्ताव साहित्य अकादमीने स्वीकारला असून तो अंतिम मंजुरीसाठी केंद्र सरकारकडे पाठवला आहे. त्यामुळे मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याचा मार्ग जवळजवळ सुकर मानला जात आहे. या पार्श्वभूमीवर मराठी भाषा अभिजाततेचे निकष कसे पूर्ण करते हे स्पष्ट करणारे प्रा. हरी नरके यांचे विवेचन या अंकात आहे.

या अंकापासून 'समकालीन कवी' ही नवी मालिकाही सुरू केली आहे. मराठी कवितेच्या प्रवाहात अनेक समकालीन कवी-कवयित्री आपल्या अनुभूतीची ओंजळ रिती करून हा प्रवाह अधिक खोल व व्याप्त करत आहेत, व्यापक मानवी जाणिवांना भिडण्याचा प्रयत्न करत आहेत. अशा काही आश्वासक कवी-कवयित्रींनी स्वतःच्याच कवितेवर केलेले भाष्य व जाणकारांनी त्यांच्या कवितेचा घेतलेला परामर्श या मालिकेतून मांडत आहोत. या अंकात कवी श्रीधर नांदेडकर यांचे मनोगत व त्यांच्या कवितेवर डॉ. प्रभा गणोरकर यांनी केलेले भाष्य आहे.

अलीकडच्या काळात ज्येष्ठ समीक्षक प्रा. म. द. हातकणंगलेकर तसेच लेखिका सरिता पदकी यांचे निधन झाले. मराठी साहित्यात या दोघांचेही महत्त्वपूर्ण योगदान आहे. त्यांच्या कार्यकर्तृत्वावर तसेच व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारे अनुक्रमे डॉ. रणधीर शिंदे व डॉ. मंदा खांडगे यांचे लेख या अंकात समाविष्ट आहेत.

डॉ. अरुणा ढेरे यांनी दापोली येथील मसापच्या विभागीय साहित्य संमेलनात केलेले भाषण तसेच विश्राम गुप्ते यांनी विनायक येवले या तरुण कवीस लिहिलेले एक उत्कट पत्रही या अंकात वाचायला मिळेल.

प्रकाशकांच्या विविध प्रकल्पांची ओळख करून देणारे सदरही या अंकापासून सुरू केले आहे. प्रा. सुजाता शेणई यांनी पद्मगंधा प्रकाशनाच्या प्रकल्पांविषयी या अंकात लिहिले आहे. त्याशिवाय काही निवडक पुस्तकांचा परिचय 'निवडक नवे' या सदरातून करून दिला आहे.

या अंकाचेही वाचक स्वागत करतील असा विश्वास वाटतो. या अंकासाठी साहाय्य करणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार!

◆

**महेंद्र मुंजाळ**

**भ्रमणध्वनी :** ९८५०५९८४८७

mahendramunjal@gmail.com

# आपल्या जीवलगांना ‘गिफ्ट’द्यायचंय?

मग असं गिफ्ट द्या, जे इतर गिफ्टमध्ये उठून दिसेल.
ज्याला ते द्यायचंय त्याला ते एक दिवस नाही तर
तब्बल वर्षभर प्रत्येक आठवड्यात मिळत राहील.

## अन् तेही फक्त ६५० रुपयांत!
## अगदी घरपोच!!

तुम्ही फक्त इतकंच करा, ज्यांना गिफ्ट द्यायचंय त्यांच्या नावे
साप्ताहिक ‘पुणे पोस्ट’ची वार्षिक वर्गणी : ६५०/- रुपये.
आमच्याकडे भरा. त्यानंतर ‘पुणे पोस्ट’चे दर्जेदार अंक
वर्षभर घरपोच पाठवण्याची जबाबदारी आमची!
(१ वर्षाच्या वर्गणीमध्ये दिवाळी अंकासह ४५ अंक घरपोच)

**कॉल करा 7722005082**

**‘पुणे पोस्ट’ तुम्हाला
स्वत:ला वाचण्यासाठीही अन्
भेट देण्यासाठीही...**

‘पुणे पोस्ट’चा अंक पाहण्यासाठी घरपोच मिळवायचा असेल
तर वरील नंबरवर एक कॉल करा. अंक पाहा आणि वर्गणीदार व्हा!

**पुणेपोस्ट**
अवघ्या महाराष्ट्राचं साप्ताहिक

संपर्क : साप्ताहिक ‘पुणे पोस्ट’ ६, मंगलमूर्ती, १३५, शुक्रवार पेठ, पुणे - ४११ ००२.
फोन : ०२०-२४४६४६९६ ई-मेल : weeklypunepost@gmail.com



# निमित्त : साहित्य संमेलन


निशिकांत मिरजकर

महाराष्ट्रातील भक्तिमार्गाचे उद्‌गाते आणि मराठी संतकाव्याला केंद्रीभूत असलेल्या 'अभंग' या रूपबंधाचे निर्माते संत नामदेव यांचे कार्यकर्तृत्व फक्त महाराष्ट्रापुरते सीमित नव्हते. त्याला अखिल भारतीय स्तराचे परिमाण होते. संत नामदेवांची भक्ती पंढरीच्या पांडुरंगाच्या ठायी एकवटलेली असली आणि नित्य चंद्रभागेचे स्नान आणि विटेवरल्या विठ्ठलाचे सान्निध्य ही त्यांच्या दृष्टीने सर्व सुखाची परमावधी असली, तरी या सुखाची तृप्ती अनुभवत पंढरपुरात जीवन व्यतीत करण्याची निवड त्यांनी केली नाही. महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून त्यांनी तीर्थयात्रांच्या मिषाने भारतभर संचार केला.

पहिली तीर्थयात्रा नामदेवांनी ज्ञानदेवांच्या समवेत ज्ञानदेवांच्याच आग्रहामुळे केली. त्या काळी विसोबा खेचरांच्या गुरूपदेशामुळे विश्वी विश्वरूप बनून राहिलेल्या परमात्म्याच्या अस्तित्वाचे भान जरी नामदेवांना आलेले असले, तरी अजून पंढरीचा विठोबा हेच आपले सर्वस्व आहे, अशी त्यांची भावनिक धारणा होती. त्याला सोडून दूर जाण्याची कल्पनाच त्यांना असहनीय वाटत होती. तीर्थयात्रेस जाण्याचा प्रस्ताव ज्ञानदेवांनी मांडताच नामदेवांनी त्यांना सरळ सरळ 'नाही' म्हटले होते. मोठी मिनतवारी करून, पांडुरंगाची आण घालून ज्ञानदेवांनी त्यांना सांगाती नेले होते. तीर्थयात्रेच्या प्रारंभीच्या प्रवासात नामदेव आणि ज्ञानदेव दोघेच एकमेकांसोबत होते. अनुभवांची देवाणघेवाण करीत, परस्परांचे सौहार्द अनुभव करीत त्यांचा प्रवास चालला होता. नंतर इतर संतमंडळी येऊन त्यांना मिळाली. त्यांचा एक संतमेळाच तयार झाला.

या यात्रेतच संत नामदेवांच्या आध्यात्मिकतेला जनकल्याणाचा स्तर प्राप्त झाला. या विशाल भारतवर्षात पसरलेल्या जनसमुदायाचे निरीक्षण करण्याची संधी मिळाली. त्यांच्या सांसारिक आणि आध्यात्मिक समस्या, त्यांची दुर्बलता, त्यांची भ्रांती यांचा परिचय झाला. जनप्रबोधनाची दिशा त्यांनी आपल्या मनाशी निश्चित करण्यास प्रारंभ केला. पंढरीच्या पांडुरंगाच्या ठायी एकवटलेले त्यांचे मन त्या कोषातून बाहेर पडले. झाडाफुलांत, डोंगरदऱ्यांत, नदीनाल्यांत, पशुपक्ष्यांत, जनसंमर्दात निहित असलेल्या परमेश्वराशी त्यांचे मन संवाद करू लागले.

संत ज्ञानदेव समाधिस्थ झाले (इ. स. १२९६) आणि



**मराठी संतकाव्याला केंद्रीभूत असलेल्या 'अभंग' या रूपबंधाचे निर्माते असलेल्या संत नामदेवांनी भक्तिमार्गाचा प्रसार आणि जनप्रबोधन यासाठी सुमारे सातशे वर्षांपूर्वी भारतभर संचार केला. विशेषतः उत्तर भारतात त्यांनी केलेल्या कार्याचा प्रभाव आजही ठळकपणे जाणवतो. पंजाबमध्ये तर त्यांनी घुमान नावाचे एक स्वतंत्र गावच वसवले. 'बाबा नामदेवजी का डेरा' या नावाने हे गाव प्रसिद्ध आहे.**

**राष्ट्रीय ऐक्याचे प्रवर्तक असलेल्या नामदेवांच्या या घुमान गावात ८८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन संपन्न होत आहे.**

**या निमित्ताने संत नामदेव, घुमान आणि शीख संप्रदाय यांच्यातील उत्कट ऋणानुबंधांवर टाकलेला हा प्रकाश.**

त्यांच्यावर जिवापाड प्रेम करणाऱ्या नामदेवांचे मन त्यांच्या वियोगाने व्याकूळ झाले. 'नामा म्हणे आता लोपला दिनकर। बाप ज्ञानेश्वर समाधिस्थ।।' असा आपल्या मनी दाटलेला अंधार नामदेवांनी वर्णन केला आहे. ज्ञानेदवांच्या वियोगाने व्याकूळ झालेल्या नामदेवांच्या मनाला ती पंढरी, ती चंद्रभागा, ते पांडुरंगाचे मंदिर... सारे सोडून दूर निघून जावे असे वाटले असणे शक्य आहे. त्यांनी भ्रमण करण्याचा निश्चय केला. या भ्रमणामध्ये 'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी।।' ही दोन उद्दिष्टे त्यांनी सतत नजरेसमोर ठेवली. यापैकी पहिले आत्मरंगी रंगण्याचे, आत्मानुभूतीत रमण्याचे होते; तर दुसरे जनप्रबोधनाचे, विश्वोद्धाराचे होते. 'विश्व हे मोहरे लावावे' ही ज्ञानदेवांची उक्ती नामदेवांनी जीवनव्रत म्हणून स्वीकारली.

ज्ञानदेवांच्या समाधीनंतर तीन वर्षांनी नामदेवांनी प्रथम दक्षिणेची यात्रा केली. श्रीशैलशिखर, मल्लिकार्जुन, चिदंबर, विष्णुकांची, रामेश्वर, कन्याकुमारी, हरिहरेश्वर ही तीर्थस्थाने पाहून ते पंढरीला परत आले. ही यात्रा त्यांनी एकट्याने केली.

दोन वर्षे घरी विश्राम करून नामदेव पुन्हा यात्रेला बाहेर पडले. दशदिशांत दूरवर पसरलेला विशाल परमात्मा जणू आता त्यांना हाकारत होता. सहा वर्षे नामदेव सतत परिभ्रमण करीत होते. त्यांनी द्वारकेला सहा महिने वास्तव्य केले. तेथून प्रभास, सोरटी, सोमनाथ, पुष्कर, कुरुक्षेत्र, इंद्रप्रस्थ, हस्तिनापुर ही क्षेत्रे पाहून ते हिमालयाकडे वळले. हरिद्वार, हृषीकेश, देवप्रयाग, केदारनाथ, कैलास, बद्रिनारायण, मानसरोवर या हिमालयातील तीर्थक्षेत्रांचे त्यांनी दर्शन घेतले. मानसरोवरापासून परत फिरून अयोध्या, वृंदावन, उज्जयिनी, प्रयाग, काशी, गया, गंगासागर संगम ही पवित्र स्थळे पाहत नामदेव पंढरपुरास परत आले.

एक- दोन वर्षे पंढरपुरात राहून पुन्हा नामदेव यात्रेला निघाले. गुजरात, राजस्थान, प्रयाग करून ते वाराणसीला गेले. काही वर्षे ते वाराणसीमध्ये राहिले; परंतु नामदेवांचे मन वाराणसीत रमले नाही. हे आपले कार्यक्षेत्र नव्हे, असे त्यांना वाटत राहिले, तेव्हा ते तेथून निघाले आणि गयाक्षेत्री जाऊन थेट पंढरपुरास परतले. या पदयात्रेच्या दरम्यान नामदेवांनी 'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी।।' या दिशेने आपले जीवनकार्य प्रत्यक्षात आणले होते. कीर्तन-

# संत नामदेव, घुमान आणि शीख संप्रदाय



भजनाच्या द्वारे त्यांनी विठ्ठलाच्या नामाचा आणि ईश्वरभक्तीचा इतक्या जोमाने प्रचार केला, की त्याचा प्रभाव सहजगत्या उत्तर भारताच्या आणि मध्य भारताच्या साहित्यावर पडलेला आढळून येतो. नामदेवांच्या पश्चात पन्नास वर्षांनंतर गुजरातचे भक्तकवी नरसी मेहता (इ.स. १४१२-१४७८) आपल्या काव्यात अनेक वेळा नामदेवांचा गौरव करताना दिसतात.... 'जेणें नामानुं छापरूं छाई आल्युं' (ज्याने नामदेवांच्या खोपटाचे छत शाकारले)... 'रामानुं नाम नामदेवें लिधुं' (नामदेवांनी रामनाम घेतले)... 'नाम हाथ ते दूध पीला... नामानुं छापरू आल्युं छाई' (नामदेवांच्या हातून जो दूध प्यायला, ज्याने नामदेवांचे छत शाकारले)... 'नामदेव गाय सजीवन करें.. तै नामदेवनी जीवडी गाय' (नामदेवांनी मृत गाईला जिवंत केले)... 'सोई नामदेवनुं देवल फेरव्युं' (ज्याने नामदेवांसाठी देऊळही फिरविले)... 'पंढरपूर नगर छे एक, तंमां नामा साई विशेक, नामदेवनुं हरिसी प्रीत...' (पंढरपूर नावाच्या नगरी विशेष हरिप्रीत करणारे नामदेव राहत)... अशा नामदेवचरित्रातील किंवदंतींचे गौरवपूर्ण वर्णन नरसी मेहता यांनी श्रद्धापूर्वक केलेले आहे. राजस्थानच्या विख्यात कवयित्री मीराबाई (इ. स. १४८६-१५४६) यांनी गोविंदाच्या भक्तप्रेमब्रीदाचे वर्णन करताना नामदेवांचाही भावपूर्ण शब्दांत उल्लेख केला आहे :

*'म्हाँरे नैणों आगे रहाओ जी श्याम गोविंद।।*
*दास कबीर घर बालद जो लाया,*
*नामदेव की छान छबंद।।*
*दास धना को खेत निपजायो, गज की टेर सुनंद।।*
*सब संतों का काज सुधारा, मीरा सूं दूर रहंद।।'*

(हे श्याम गोविंद, माझ्या डोळ्यांसमोर रहा रे.. तू कबीराच्या घरी बैल आणलास, नामदेवाचे छत शाकारलेस, धन्नादासच्या शेतात बी पेरलेस आणि गजेंद्राची पुकार ऐकून त्याच्या साहाय्यार्थ धाव घेतलीस, सगळ्या संतांची कामे केलीस, मग मीरेपासून का दूर राहतोस रे?)

परभाषिक संतकवींच्या काव्यातील हे गौरवपूर्ण उल्लेख म्हणजे नामदेवांनी तीर्थयात्रेच्या दरम्यान तेथील जनमानसावर आपल्या व्यक्तिमत्त्वाचा जो ठसा उमटवलेला होता त्याचेच पडसाद आहेत. या पदयात्रेत नामदेवांनी भजन-कीर्तनाद्वारा एकेश्वरवादाचा, विशुद्ध भक्तीचा, जातिनिरपेक्ष मानवतेचा आणि सदाचारपूर्ण जीवनपद्धतीचा पुरस्कार तळमळीने केला.

नामदेवांच्या या प्रकारच्या उपदेशाला या यात्रेच्या दरम्यान लोकांचा जो प्रतिसाद मिळाला त्यावरून नामदेवांनी आपल्या उर्वरित जीवनकार्याची दिशा निश्चित केली असावी. कारण इ. स. १३३० च्या आसपास ते पुन्हा तीर्थयात्रेच्या मिषाने बाहेर पडले आणि त्यांनी सरळ उत्तरेचा रस्ता धरला. प्रथम ते द्वारकेला गेले, तिथून मारवाड प्रदेशातून मथुरेला गेले आणि मथुरेहून हरिद्वारला जाऊन तिथून पंजाबकडे मार्गस्थ झाले. पंजाबातील गुरुदासपूर जिल्हा मग किती तरी वर्षे त्यांचे कार्यक्षेत्र बनून राहिला. भूतविंड या गावी राहून नामदेव भक्तीचा प्रचार करीत राहिले. त्यांची कीर्ती आसपास पसरू लागली. भूतविंडमध्ये अडोली नावाची एक विधवा राहत होती. मोलमजुरी करून ती आपल्या एकुलत्या मुलाचे पालनपोषण करीत होती. या मुलाला पोटदुखीची व्यथा जडली. नामदेवांच्या कृपाप्रसादाने मुलाची व्यथा बरी झाली, अशा विश्वासाने अडोलीने मुलगा नामदेवांच्या सेवेत समर्पित केला. 'बोहरादास' (बहोरदास) असे नाव धारण करून हा मुलगा सतत नामदेवांची सेवा करीत त्यांच्या समवेत राहू लागला. हा नामदेवांचा पंजाबातील प्रमुख शिष्य बनला.

भूतविंडमधून नामदेव मरड या गावी गेले. तेथून ते भट्टिवाल येथे गेले. भट्टिवाल येथे पाण्याची मोठी समस्या होती. या वेळेपर्यंत नामदेवांचा बराच बोलबाला झाला असल्याकारणाने भट्टिवालच्या लोकांनी पाण्यासाठी नामदेवांची प्रार्थना केली. नामदेवांनी त्यांना तलाव खोदण्यास प्रवृत्त केले. नामदेवांनी सांगितलेल्या जागी खोदकाम केल्यावर पाणी लागले. तलाव तयार झाला. तिथल्या लोकांनी या तलावाचे नाव 'नामियाना' असे ठेवले. भट्टिवालमधे जल्लो आणि लद्धा नावाचे दोन प्रमुख शिष्य नामदेवांना लाभले. यापैकी जल्लो ऊर्फ जाल्हण हा व्यवसायाने सुतार होता. तो नामदेवांच्या बरोबर पंढरपूरलाही गेला होता. लद्धा घुमानजवळच्या सखोवाल गावचा होता. तो खत्री होता. त्याने नामदेवांच्या शिकवणुकीचा बराच प्रचार केला.

यानंतर नामदेव अमृतसरपासून ३५ मैलांच्या अंतरावर गुरुदासपूर जिल्ह्यातील जंगलात एका रमणीय तलावापाशी जाऊन राहिले. नामदेवांच्या वास्तव्यामुळे त्या स्थानाचे रूपच पालटले आणि तिथे एक गावच वसले. तेच घुमान. नामदेव विनाउद्देश, अहेतुकपणे 'घूमते घूमते' येथे येऊन राहिले, म्हणून 'घुमान'. येथे नामदेवांचा 'डेरा' प्रस्थापित झाला. त्यांच्या व्यक्तित्वाशी अनेक अद्‌भुत चमत्कारकथा जोडल्या गेल्या. पंढरपुराहून ज्ञानदीप घेऊन पंजाबात

पोचलेले नामदेव घुमानमध्ये 'बाबा नामदेवजी' म्हणून प्रस्थापित झाले.

नामदेवांच्या पंजाबातील शिष्यांपैकी सर्वांत प्रसिद्ध असलेला केशो त्यांना घुमानमध्येच प्राप्त झाला. केशो अविवाहित राहिला, म्हणून त्याला 'केशो कलंधर' असेही म्हणत. तो तारा गावचा खत्री होता. त्याला कुष्ठरोग झालेला होता आणि घरातल्यांसकट सगळ्या लोकांच्या घृणेचा विषय तो बनला होता. वेगवेगळे औषधोपचार करून तो दमला होता. शेवटी निराश होऊन तो आत्महत्या करणार होता. तेवढ्यात कुणी तरी सांगितले म्हणून तो घुमानला नामदेवांच्या दर्शनाला आला. नामदेवांनी त्याला ठेवून घेतले, त्याची शुश्रूषा केली आणि त्याचा कुष्ठरोग बरा झाला. केशो कलंधर भावलपूर येथे नामदेवांच्या भक्तियोगाची शिकवण लोकांना देत राहिला. आजही त्याचा आश्रम तेथे आहे. मात्र, फाळणीनंतर ते भावलपूर पाकिस्तानात गेले आहे.

घुमानमधील नामदेवांची कीर्ती दिल्लीच्या बादशहापर्यंत पोचली. बादशहाला या संताला भेटण्याची इच्छा झाली. बादशहा घुमानला आला. नामदेवांच्या व्यक्तिमत्त्वाने तो प्रभावित झाला. त्याने नामदेवांना मोठा शाही नजराणा देऊ केला, परंतु नामदेवांनी नजराण्याचा स्वीकार करण्यास ठाम नकार दिला. तेव्हा बादशहाने घुमानमध्ये नामदेवांकरिता एक मंदिर बनवण्याची व्यवस्था केली. घुमानला आज जे मंदिर आहे त्याचे तेच मूळ रूप होय. याच बादशहाने तलावाच्या बाजू पक्क्या बांधून घेतल्या आणि तेथील रोजच्या खर्चाकरिता काही जमीन इनाम दिली.

घुमानमध्ये राहून नामदेवांनी अशा स्थळांच्या पदयात्रा केल्या जिथे हिंदू आणि मुस्लिम दोन्ही समुदायांची वस्ती होती. घुमानच्या परिसरातील नामदेवांच्या येण्याजाण्याची ही स्थळे होती : वन्सी, मरडी (जि. अमृतसर); दुनियापूर (जि. मुलतान), लाहोर, अमृतसर, मुलतान, लायलपूर, जालंधर, लुधियाना, अंबाला, रोहतक, भिवानी, हिसार. या सर्व स्थळी नामदेवांची लहान-मोठी मंदिरे आजही उभी आहेत.

घुमान हे एक छोटेसे गाव आहे. नामदेवांमुळे वसलेले आणि 'बाबा नामदेवजी का डेरा' म्हणूनच प्रसिद्धी पावलेले. गावात तयार कपड्यांची आणि कापडांची दुकाने प्रामुख्याने आहेत. ती सगळी 'बाबा' या आडनावाच्या दुकानदारांचीच. नामदेवांचे प्रमुख पंजाबी शिष्य बहोरदास यांचे वंशज असल्याचे हे बाबा अभिमानाने सांगतात. घुमानमधील नामदेवांचे मंदिर तसे गावाबाहेर आहे. मंदिर चांगले प्रशस्त आहे. एखाद्या जुन्या वाड्यासारखा त्याला परकोट आहे. आतल्या भागात सभामंडप, कोठीच्या खोल्या, नामदेवांचे मुख्य मंदिर, छोटी मंदिरे आणि खुले आवार आहे. मुख्य मंदिर म्हणजे नामदेवांची स्मृतिसमाधी आहे, तर छोटी मंदिरे बहोरदास आणि अन्य महंतांच्या समाध्या आहेत. मुख्य मंदिराच्या दारावर नामदेवांचे मोठे तैलचित्र आहे. अर्थातच महाराष्ट्राला चिरपरिचित असलेल्या नामदेवांच्या 'वीणाधारी', भजनमग्न रूपापेक्षा या चित्रातील नामदेव वेगळ्या परिवेशात आहेत. ते कच्छा नेसून, मांडी घालून आसनस्थ बसले आहेत. वृद्ध आहेत. पांढरी दाढी छातीपर्यंत रुळत आहे. गळ्यात जाड माळा आहेत. डोक्यावर पांढऱ्या केसांचा जुडा बांधलेला आहे. नेत्र अर्धोन्मीलित असून मुद्रा शांत आहे. मंदिराच्या आतील गाभाऱ्यात एक गोलाकार चबुतरा आहे. त्यामध्ये दगडी बांधणीचे कोनाड्यासारखे देवघर आहे. त्यामध्ये नामदेवांची सुवर्णप्रतिमा आहे. पलीकडे एक विशाल पलंग आहे. या पलंगावर बहोरदास विराजमान आहेत, अशी भाविकांची श्रद्धा आहे. परिसराच्या एका कोपऱ्यात छोटेसे

**घुमानमध्ये राहून नामदेवांनी अशा स्थळांच्या पदयात्रा केल्या जिथे हिंदू आणि मुस्लिम दोन्ही समुदायांची वस्ती होती. घुमानच्या परिसरातील नामदेवांच्या येण्याजाण्याची ही स्थळे होती : वन्सी, मरडी (जि. अमृतसर); दुनियापूर (जि. मुलतान), लाहोर, अमृतसर, मुलतान, लायलपूर, जालंधर, लुधियाना, अंबाला, रोहतक, भिवानी, हिसार. या सर्व स्थळी नामदेवांची लहान-मोठी मंदिरे आजही उभी आहेत.**

शिवमंदिर आहे. दुसऱ्या कोपऱ्यात छोट्याशा मंदिरात राधाकृष्णांच्या संगमरवरी मूर्ती आहेत. नामदेव मंदिराच्या समोरील सभामंडपाला 'दरबार' असे म्हणतात. तेथे एका उंच बैठकीवर 'ग्रंथसाहेबा'ची प्रतिष्ठापना केलेली आहे. सभामंडपात 'ग्रंथसाहेबा'चा अखंड पाठ चालू असतो.

पंढरपुरातील विठ्ठल मंदिराच्या महाद्वारातील पायरीखाली समाधी घेण्याच्या ऊर्मीने नामदेव घुमानमधून माघ वद्य द्वितीयेच्या दिवशी नाहीसे झाले. त्यामुळे त्या दिवशी घुमानामध्ये नामदेवांचा समाधिसोहळा साजरा केला जातो. त्या दिवशी दुपारी बारा वाजता सारे घुमान गाव नामदेव मंदिरात जमा होते. सगळेजण स्नान करून,

शुचिर्भूत होऊन आलेले असतात. सर्वजण शांत, नि:स्तब्ध बसतात. कोणी कसलाही आवाज करीत नाही. कारण त्या वेळी प्रत्यक्ष नामदेव तिथे येतात, अशी सर्वांची श्रद्धा आहे.

२००० साली नामदेवांच्या समाधिग्रहणास साडेसहाशे वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने घुमान येथे मोठा महोत्सव करण्यात आला. महाराष्ट्रातून हजारो लोक घुमानला जाऊन पोचले. रामभाऊ बगाडे, वसंत कोपर्डे, निवृत्तिनाथ रेळेकर, धोंडोपंत गोंदकर इत्यादींनी या महोत्सवाचे आयोजन केले होते. घुमानच्या शीख समाजाने या महोत्सवास फार उत्कट भावनिक आणि क्रियाशील प्रतिसाद दिला.

संत नामदेव आणि शीख संप्रदाय यांचे नाते वस्त्राच्या ताण्याबाण्यासारखे परस्परांत घट्ट विणलेले आहे. संत नामदेवांच्या नंतर सुमारे दोनशे वर्षांनी शीख संप्रदायाची पायाभरणी गुरू नानकदेव यांनी केली.

**पंढरपुरातील विठ्ठल मंदिराच्या महाद्वारातील पायरीखाली समाधी घेण्याच्या ऊर्मीने नामदेव घुमानमधून माघ वद्य द्वितीयेच्या दिवशी नाहीसे झाले. त्यामुळे त्या दिवशी घुमानामध्ये नामदेवांचा समाधिसोहळा साजरा केला जातो. त्या दिवशी दुपारी बारा वाजता सारे घुमान गाव नामदेव मंदिरात जमा होते. सगळेजण स्नान करून, शुचिर्भूत होऊन आलेले असतात. सर्वजण शांत, नि:स्तब्ध बसतात. कोणी कसलाही आवाज करीत नाही. कारण त्या वेळी प्रत्यक्ष नामदेव तिथे येतात, अशी सर्वांची श्रद्धा आहे.**

नानकदेवांच्या या नव्या क्रांतिकारक शिकवणुकीची बीजे नामदेवांच्या पदरचनांमध्ये सुस्पष्टपणे आढळून येतात.

'रामकली-दि-वर' या आपल्या पदात गुरू नानक म्हणतात,

'हिंदूच्या पोटी जन्मला की झाला हिंदू

तो गळ्यात जानवे अडकवतो पण दुष्कृत्य मात्र सोडत नाही

त्याची आत्मशुद्धी कशी होणार?'

'आपण मुसलमान आहोत या गोष्टीचा मुसलमानाला केवढा अभिमान!

पण त्याला योग्य मार्गदर्शक मिळू शकत नाही

म्हणून त्याला सन्मार्ग दिसत नाही.

आणि सत्कृत्य केल्याविना स्वर्गाचे दार कसे उघडणार?'

'वास्तविक ईश्वर सर्वत्र भरून राहिलेला आहे

त्यानेच आपणा सर्वांना निर्माण केले आहे

हे ज्याने ओळखले तोच खरा हिंदू व तोच खरा मुसलमान!'

आणि त्यांच्यापूर्वी दोनशे वर्षे आधी नामदेव म्हणाले होते,

*'हिंदू अंधा तुरकू काणा । दुहांते गिआनी सिआणा।।*
*हिंदू पूजै देहुरा मुसलमाणु मसीति।।*
*नामे सोई सेविआ जी देहुरा न मसीति।।'*

(हिंदू आंधळा आहे, तर तुर्क (मुसलमान) काणा आहे. दोघांपेक्षा ज्ञानी शहाणा आहे. हिंदू मंदिरात पूजा करतो आणि मुसलमान मशिदीत नमाज पढतो. परंतु मी, नामदेवाने त्याचीच पूजा नित्य केली आहे, ज्याचे नसते मंदिर की मशीद!)

गुरू नानकांनी ज्या पाच गोष्टींचा आग्रह सर्वांसाठी धरला होता त्या होत्या : १) नाम (ईश्वराचे नाम हेच त्याच्या अस्तित्वाचे प्रतीक मानणे), २) दान (सर्वांच्या ठिकाणी उदारता), ३) अस्नान (शरीरशुद्धीसाठी प्रात:स्नान), ४) सेवा आणि ५) सिमरण (अखंड नामस्मरण). यापैकी 'नाम' आणि 'सिमरण' या दोन गोष्टी म्हणजे नामदेवांच्या सर्व मराठी आणि हिंदुस्थानी पदरचनेच्या आशयसूत्राचे प्राणतत्त्वच तर आहे.

शिखांचा 'आदिग्रंथ' ऊर्फ 'गुरू ग्रंथसाहेब' हा गुरू नानकांच्या नंतर शंभर वर्षांनी सिद्ध झाला. शिखांचे पाचवे गुरू अर्जुनदेव यांनी त्याचे संपादन केले. त्यांच्यानंतरही आणखी शंभर वर्षे, म्हणजे गुरू गोविंदसिंगांच्यापर्यंत त्यात भर पडत गेली. गुरू नानक, गुरू अंगद, गुरू अमरदास, गुरू रामदास, गुरू अर्जुन, गुरू हरगोविंद, गुरू हरराय, गुरू हरकिशन, गुरू तेगबहादूर आणि गुरु गोविंदसिंग या दहाही गुरूंची पदरचना या ग्रंथात समाविष्ट आहे. या दहा गुरूंच्या पदांखेरीज पंधरा 'भगतां'ची पदरचनाही 'गुरू ग्रंथसाहेबा'त समाविष्ट आहे. ते पंधरा 'भगत' असे : फरीद, बेणी व जयदेव (बारावे शतक); सधना, त्रिलोचन व नामदेव (तेरावे शतक); रामानंद, सेन, पीपा, कबीर, रविदास (चौदावे व पंधरावे शतक); धन्ना, भिक्कन, सूरदास व परमानंद (सोळावे शतक). यापैकी शेख फरीद (११७३), जयदेव (११७०) आणि नामदेव (१२७०) हे तीनच भगत

नानकांच्या पूर्वकाळातील आहेत. त्यांच्यापैकी जयदेव आणि शीख फरीद यांची पाच पदे 'ग्रंथसाहेबा'त आहेत, तर नामदेवांची एकसष्ट पदे आहेत.

शीख संप्रदायामध्ये जो आदर आणि सन्मान दहा गुरूंच्या पदरचनांच्या बाबतीत राखला जातो, तोच आदर आणि सन्मान पंधरा भगतांच्या पदरचनांच्या बाबतीत श्रद्धापूर्वक राखण्यात येतो. 'गुरू ग्रंथसाहेबा'चा अखंड पाठ करताना नानकदेवांची पदे आणि नामदेवांची पदे सारख्याच श्रद्धापूर्ण रीतीने गायिली जातात. व्यासपीठावरून नामदेवांच्या पदांचे गायन सादर केले जाते तेव्हा भक्त उठून उभे राहतात आणि मस्तकावर आच्छादन घेतात.

पंजाबमधील आतंकवाद नुकता नुकता संपुष्टात आला होता, तेव्हा लुधियानाचे संत सुचासिंग यांच्या 'बिस्माद नाद' या संस्थेने मुंबई येथे नामदेवांवर एक चर्चासत्र आयोजित केले होते. यशवंतराव चव्हाण सभागृहात संपूर्ण दिवसभर हे चर्चासत्र झाले. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी हे उद्घाटन- सत्राचे अध्यक्ष होते. चर्चासत्र मराठी, हिंदी, इंग्लिश आणि पंजाबी अशा चार भाषांमध्ये झाले. अमृतसर, पतियाळा, लुधियाना,दिल्ली, जालंधर, मुंबई, पुणे, कोल्हापूर, बीड येथून आलेल्या समीक्षकांनी नामदेवांच्या जीवनकार्यावर आणि साहित्यावर निबंध वाचले. या कार्यक्रमासाठी दोन बसगाड्या भरून श्रोते लुधियानाहून आले होते आणि चारी भाषांमधले निबंध भक्तिभावाने शांतपणे ऐकत होते. दिल्लीमधील पंजाबी लोकांनी लोधी इस्टेट भागात एक भव्य नामदेव मंदिर बांधलेले आहे. या मंदिरात पुरुषभर उंचीची, हाती वीणा व टाळ घेतलेली, पारंपरिक महाराष्ट्रीय पद्धतीची नामदेवांची मूर्ती आहे. नामदेव जयंती व नामदेव पुण्यतिथी हे दिवस प्रतिवर्षी या मंदिरात उत्साहाने साजरे केले जातात. त्यामध्ये दिवसभर भजन-कीर्तन आणि महाप्रसादाचे भोजन याप्रमाणेच नामदेवांच्या साहित्यावर अभ्यासकांचे परिसंवादही आयोजित केले जातात.

शीख संप्रदाय जातिभेद आणि कर्मकांड यांच्या विरोधात आहे. साहजिकच 'कां करौ जाति, कां करौ पाति । हरि का नाम गाइ दिन-राति।।' असा जातिभेदरहित ईश्वरभक्तीचा संदेश देणारे नामदेव त्यांना प्रिय आणि वंदनीय वाटतात. पूजाविधीच्या कर्मकांडाचा स्पष्ट निषेध नानकांनी केलेला आहे. 'गुरू ग्रंथसाहेबा'त समाविष्ट असलेल्या नामदेवांच्या पदांमध्ये 'आनिले कुंभ भराइले उदक...' असे एक पद आहे. त्यामध्ये पूजाविधीच्या विविध उपचारांचे वैयर्थ नामदेवांनी फार उत्तम रीतीने वर्णन केले आहे. ते म्हणतात, 'मी कुंभ आणले. त्यांत उदक भरले. विचार केला, या उदकाने ठाकुरजीला स्नान घालावे. पण मग लक्षात आले, बेचाळीस लाख जीवयोनींच्या रूपाने विठ्ठलाने या जलात आधीच स्नान केलेले नाही का?.. मी दूध आणले, त्याची खीर बनवली. म्हटले, ठाकुरजीला खिरीचा भोग चढवावा. पण मग विचार केला, वासराच्या रूपाने विठ्ठलाने हे दूध आधीच चाखलेले आहे!... मी फुले आणली, त्यांची माला गुंफली. आता ठाकुरजींच्या मूर्तीला ती माला वाहणार, तो ध्यानी आले, भ्रमराच्या रूपाने विठ्ठलाने या फुलांचा आस्वाद आधीच घेतलेला आहे!... काय करावे? उभा-आडवा सगळीकडे विठ्ठलच विठ्ठल भरून राहिला आहे. सगळी पृथ्वी त्याने भरून गेलेली आहे. स्थाना-स्थानावर त्याला नमन करण्यावाचून नामदेव काय करणार?...'

*'ईभै बीठलु, ऊभै बीठलु बीठलबिनु संसारु नहीं।*
*थाण-थणंतरि प्रणवै नामा पूरि रहियो तू सरब मही।'*

अशा विश्वव्यापी विठ्ठलाचा अनुभव घेणारे नामदेव आणि

*'आकाशाच्या तबकात*
*चंद्र-सूर्याच्या पणत्या असोत*
*तारकामंडल माणिकमोती बनो*
*वाहत्या वाऱ्याचाच असो चंदनधूप*
*आणि सर्व सृष्टीची उत्फुल्ल फुले बरसोत'*

अशी विश्वरूपी अनंताची पूजा गगन में बालु रवि चंदु, दीपक बने तारिका मंडल मैती' या गीतामधून मांडणारे नानकदेव शीख संप्रदायाला एकाच जातकुळीचे वाटतात.

*'एक अनेक बिआपक पूरन जन देखउ तत सोई।*
*माइआ चित्र विचित्र विमोचित बिरला बूझै कोई।।*
*सभु गोविंदु हैं, सभु गोविंदु हैं, गोविंदु बिनु नहिं कोई।*
*सूत एकु मणि सत सहंस जैसे उतिपोति प्रभु सोई।।'*

ही नामदेवांची अनुभूती त्यांना शीख संप्रदायातील गुरूंच्या अनुभूतीशी समांतर असल्याचे जाणवते. नामदेव त्यांच्यासाठी परके नसतात, त्यांचेच असतात.

◆

**डॉ. निशिकांत मिरजकर**
भ्रमणध्वनी - ९९७०१८४५६२
nishimirajkar@yahoo.co.uk



निमित्त : साहित्य संमेलन

राजा दीक्षित









# डॉ. सदानंद मोरे
## महाराष्टाच्या लोकव्यवहाराचा मार्मिक अभ्यासक

॥ १ ॥

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाची निवडणूक ही अलीकडे एक रणधुमाळी बनलीय. या रणधुमाळीत राजकारण व व्यक्तिगत टीकेबाबत काहींचे नैतिक भान सुटते; परंतु यंदाच्या निवडणुकीतील सर्व उमेदवारांनी हे भान बव्हंशी पाळले. म्हणूनच घुमान येथील यंदाच्या (८८व्या) संमेलनाध्यक्षपदी डॉ. सदानंद मोरे निवडून आले याचा आनंद झाला, तरी श्री. भारत सासणे, डॉ. अशोक कामत व श्री. पुरुषोत्तम नागपुरे यांच्या पराभवाचे दुःखही वाटले. या तीनही व्यक्तींनी आपापल्या कार्यक्षेत्रात भरीव योगदान दिलेले आहे. त्यांच्याबद्दल आदर दर्शवून आणि यंदाच्या निवडणुकीचा आदर्श यापुढेही पाळला जावा अशी अपेक्षा व्यक्त करून नियोजित अध्यक्षांविषयी लिहितो. ते मित्र आहेत, हा संदर्भ वगळण्याचे कारण दिसत नाही. म्हणून त्या नात्याने आधी चार शब्द लिहितो. त्यानंतर डॉ. मोरे यांच्या कार्यकर्तृत्वाविषयी अभ्यासाच्या अंगाने प्रतिपादन करतो.

सदानंद मोरे यांच्याशी माझी मैत्री किमान पंचवीस-तीस वर्षांची तरी आहे. हा कालखंड प्रचंड भौतिक व वैचारिक बदलांचा आहे. त्यांचे पडसाद साहित्य व सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासक्षेत्रातसुद्धा उमटलेले आहेत. हे बदल झेलताना त्यांचे आकलनच नव्हे, तर समीक्षणसुद्धा करून पुढे जाणाऱ्या समकालीन मित्रमंडळींमध्ये मोरे यांचे स्थान खूपच वरचे आहे. प्राचीन संस्कृतींपासून उत्तराधुनिकतावादापर्यंत अनेक अभ्यासविषयांचे अनेकांगी आकलन असलेला असा आमचा हा प्राध्यापक मित्र आहे. अचंबा वाटावा अशी उदंड कार्यशक्ती असलेला हा अवलिया माणूस आहे. आमच्या विद्यापीठातले आणि बाहेरचेसुद्धा अनेक व्याप सांभाळत त्यांनी वाचन-संशोधन-लेखनाचा जो डोंगर उभा केला तो स्तिमित करणारा आहे. संख्यात्मकतेत एकवटलेली गुणात्मकता हा मोरे यांच्या लेखनकर्तृत्वाचा विशेष आहे. त्यांच्या अष्टपैलू व्यासंगाला सर्जनशीलतेची आणि रसिकतेची जोड आहे. या माणसाचे झपाटलेपण साक्षात अनुभवण्याचा भाग्ययोग मला लाभला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील माझ्या विभागात अनेकदा मोरे सरांची स्वारी प्रविष्ट झाली की रसाळ चर्चेची एक मैफलच भरत असे. ते अक्षरशः त्यांच्या आगामी लेखांकाच्या धुंदीत असत. 'लोकमान्य ते महात्मा' आणि मुख्यतः 'गर्जा महाराष्ट्र'मधील काही भाग छापून येण्याआधीच ते मी अशा मैफलीत ऐकत आलो. त्या त्या लेखांकाच्या विषयात बुडून जाऊन कथनाच्या ओघात एखादा किस्सा आला, की 'दे टाळी' म्हणून हात पुढे करण्याची मोरे सरांची मिश्कील लकब माझ्याच काय पण माझ्या कर्मचारीवर्गाच्याही अंगवळणी पडलेली आहे. किंबहुना, अशी 'सदानंदी टाळी'

लागल्याशिवाय आमची मैफल पूर्ण होतच नाही! ते, मी आणि डॉ. यशवंत सुमंत असे एक त्रिकूट विद्यापीठात जमले आहे. आपापल्या व्यापांमुळे तशी आमची सारखी ऊठबस नसते; पण चौफेर अभ्यास, समतोल विचार आणि विधायक, समाजशील व पुरोगामी दृष्टी या धाग्यांनी आमच्या मैत्रीची वीण पक्की झालेली आहे. अशा या मैत्रीचेच एक फलित म्हणजे 'कर्मयोगी लोकमान्य' हा अलीकडचा ग्रंथ डॉ. मोरे यांनी सुमंतांना व मला अर्पण केला आहे. अर्पणपत्रिकेत 'या माझ्या मित्रांना' असे न म्हणता 'या माझ्या पिढीतील अभ्यासकांना' असे म्हणून डॉ. मोरे यांनी आमच्या मैत्रीचा नेमका पाया कोणता हे सूचित केले आहे. डॉ. मोरे नोकरीतून निवृत्त झाले आणि आम्ही दोघे त्या टप्प्याकडे येत आहोत, हे लक्षात घेता मैत्रीच्या याच पायावरून निवृत्तीनंतरच्या प्रवृत्तिपरतेचे उड्डाण आपापल्या परीने आम्ही करत राहणार. डॉ. सदानंद मोरे यांच्या आजवरच्या उड्डाणावर हा एक दृष्टिक्षेप...

॥ २ ॥

सदानंद मोरे (जन्म : २५ जून १९५२) हे संत तुकाराम यांच्या दहाव्या पिढीतले वंशज. अठरा पिढ्या वारकरी परंपरेचा वारसा सांभाळणाऱ्या देहूकर मोरे घराण्यात ते जन्मले. 'पवित्र ते कूळ पावन तो देश। जेथे हरीचे दास जन्म घेती' असा जन्मसंदर्भ केवढा भाग्याचा! सदानंद यांचे वडील वै. श्रीधरअण्णा यांनी वारसाहक्काने प्राप्त झालेली परंपरा तर जपलीच, पण तिला गाढ्या व्यासंगाची जोड दिली. आई हिराबाई यांच्या काळे घराण्याकडून सत्यशोधक चळवळीचा वारसा सदानंद यांना प्राप्त झाला. असा हा दुहेरी वारसा तर सदानंदांनी जपलाच, पण आयुष्यभर ज्ञानतपस्या करून मोठे कर्तृत्वही सिद्ध केले. अहमदनगरला त्यांनी प्राध्यापकी सुरू केली आणि पुणे विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान विभागात ते स्थिरावले. या विभागाचे प्रमुखपद त्यांनी भूषविले. संत ज्ञानदेव आणि संत तुकाराम अध्यासनांचे प्रमुखपदही त्यांनी भूषविले. साहित्य अकादमी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, राज्य मराठी विकास संस्था, मराठी विश्वकोश मंडळ इ. संस्थांचे सदस्यत्वही त्यांना प्राप्त झाले. २०१२ मध्ये पहिल्या अखिल भारतीय मराठी संतसाहित्य संमेलनाचे आणि दुसऱ्या राज्यव्यापी शिक्षक साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले. त्यांना मिळालेल्या पुरस्कारांची संख्या पाऊणशेहून अधिक आहे.

**संतसाहित्याचे व्यासंगी अभ्यासक, सर्जनशील इतिहास संशोधक, तत्त्वज्ञानाचे अध्यापक, समीक्षक, कवी, नाटककार, प्रवचनकार, कीर्तनकार अशी बहुआयामी ओळख असणारे डॉ. सदानंद मोरे यंदा संत नामदेवांची कर्मभूमी असलेल्या घुमान येथे होत असलेल्या ८८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षस्थान भूषवत आहेत. संत तुकारामांचे वंशज म्हणून मिळालेला सांस्कृतिक वारसा आपल्या बहुविद्याशाखीय व्यासंगाने समृद्ध करणाऱ्या या सम्यक विचारवंताच्या कार्यकर्तृत्वावर त्यांच्याच एका जवळच्या मित्राने टाकलेला हा दृष्टिक्षेप.**



डॉ. मोरे यांच्या सर्वच साहित्याचा परामर्श येथे शक्य नाही, पण काही ठळक विशेष विचारात घेऊ. त्यांचे बहुतांश लेखन वैचारिक, ऐतिहासिक आणि बहुविद्याशाखीय आहे. 'मोरे खऱ्या अर्थाने साहित्यिक (तथा ललित लेखक) कुठे आहेत?' अशी निराधार कुजबूज अध्यक्षीय निवडणुकीच्या काळात झाली. पण प्रत्यक्षात मोरे यांचे तीन कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. 'वादळाची फुले झेलताना' हे त्यांच्या काव्याचे समग्र संकलनही प्रसिद्ध आहे. 'उजळल्या दिशा' आणि 'शिवचरित्र आणि एक' अशी दोन नाटकेही त्यांनी लिहिली आहेत. त्यांचे प्रयोगसुद्धा झाले आहेत. 'उजळल्या दिशा'साठी मोरे यांना पाच पुरस्कार मिळाले आहेत. 'गंधर्वगोहर' हे त्यांचे नाटक लिहून तयार आहे, तर महाराष्ट्रातील लैंगिकतेच्या राजकारणावरील कादंबरीलेखन चालू आहे. तेव्हा, सर्जनशील ललित लेखनाबाबत कोणाच्या प्रशस्तिपत्राची गरज मोरे यांना नाही. ललित लेखन हाच निकष असता तर न्या. म. गो. रानडे, शिवरामपंत परांजपे, दत्तो वामन पोतदार, न. र. फाटक, आचार्य शं. द. जावडेकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, गं. बा. सरदार इत्यादी दिग्गजांना संमेलनाध्यक्षपद प्राप्तच झाले नसते! दुसरे असे, की सर्जनशीलता ही वैचारिक व संशोधकीय साहित्यातसुद्धा दिसून येते. खरा इतिहासकार हा मूलतः प्रतिभावंत असावा लागतो. मोरे यांनी त्यांच्या इतिहासलेखनाद्वारे जी अन्वयार्थात्मक मांडणी केली आहे ती त्यांच्या सर्जनशीलतेची द्योतक आहे. डॉ. मोरे यांच्या अध्यक्षीय निवडीची यथार्थता ही केवळ व्यक्तिगत बाब नसून ती तात्त्विक बाब आहे, हे या निमित्ताने अधोरेखित करावेसे वाटते. विचारात व संशोधनातसुद्धा सर्जन व सौंदर्य असते, फक्त ते पाहण्याची दृष्टी हवी.

'द गीता : अ थिअरी ऑफ ह्युमन ॲक्शन' आणि 'कृष्ण : द मॅन अँड हिज मिशन' हे सदानंद मोरे यांचे प्रकाशित इंग्रजी प्रबंध. श्रीकृष्णांचे तत्त्वज्ञान भगवद्गीतेतून व्यक्त झाले आणि त्यांच्या साक्षात जगण्यातूनच या तत्त्वज्ञानाचा कर्माविष्कार झाला, हे या संशोधकीय मांडणीचे सार म्हणता येईल. मराठीतील अन्य काही पुस्तके आणि संपादित ग्रंथ, विशेषतः 'श्री तुकाराम गाथा' व 'जागृतीकार पाळेकर' ही संपादने त्यांच्या नावावर जमा आहेत. ते मराठी समाज व संस्कृतीशी इतके बांधले गेलेले आहेत की त्यांची दोन्ही नाटकेसुद्धा ती बांधिलकी पत्करूनच अवतरतात. 'उजळल्या दिशा' हे नाटक आंबेडकरी चळवळीशी, तर 'शिवचरित्र' हे नाटक शिवाजीविषयक मानसिकता व इतिहासलेखन परंपरेशी वैचारिक सर्जनशीलतेने भिडते. 'ॲग्रोवन' या मुख्यतः ग्रामीण भागातील शेतकरीवर्गासाठीच्या दैनिकात तुकारामांच्या अभंगांवर सदर चालवण्याच्या त्यांच्या समाजाभिमुख प्रयोगातून 'प्रसादाची वाणी... अर्थात तुका म्हणे' या त्यांच्या अलीकडच्या ग्रंथाची (२०१४) निर्मिती झाली आहे. दिल्लीच्या महाराष्ट्र सदनाची पुनर्बांधणी करून पूर्वीच्या महाराष्ट्र शासनाने जेव्हा तेथे काही पुतळे बसवले तेव्हा त्यात टिळक पुतळा मात्र नव्हता. यामागील इतिहासविषयक मानसिकतेवर भाष्य करणारा उपरोधिक ललित-वैचारिक लेख डॉ. मोरे यांनी साप्ताहिक 'साधना'मध्ये लिहिला होता. आता 'कर्मयोगी लोकमान्य' या ग्रंथात परिशिष्ट म्हणून तो समाविष्ट झाला आहे. या लेखातसुद्धा मोरे यांच्या सामाजिक-सांस्कृतिक बांधिलकीचे व मार्मिकतेचे दर्शन घडते.

॥ ३ ॥

डॉ. सदानंद मोरे यांच्या चार ग्रंथांचा विचार केल्याशिवाय त्यांच्या लेखनकर्तृत्वाचे यथार्थ आकलन होऊ शकणार नाही. त्यामुळे तसा विचार आता करू.

'कर्मयोगी लोकमान्य (चिकित्सक आकलन)' हा अलीकडेच (२०१४) प्रसिद्ध झालेला चरित्रग्रंथ. त्याची दोन ठळक वैशिष्ट्ये नमूद करतो. कर्मयोग हा लोकमान्यांच्या जीवनकार्याचा गाभा. त्यांच्या कर्मसाधनेचे दोन मुख्य आविष्कार म्हणजे ब्रिटिशांविरुद्धचा संघर्ष आणि मंडालेच्या तुरुंगवासातील ज्ञानसाधना. गीतार्थाचे कर्मपर रहस्य लोकमान्यांच्या उभ्या आयुष्यातून कसे आविष्कृत झाले याचे समाजकेंद्री चित्रण करणारे मोरेलिखित टिळकचरित्र हे आजवरच्या टिळकचरित्रांमधले आगळेवेगळे चरित्र म्हटले पाहिजे. टिळक व गांधी हे परस्परविरोधी द्वैत तर नव्हतेच, पण (दोघांमधील भेद गृहीत धरूनही) टिळकांचे काम गांधींनी कसे पुढे चालवले हे मोरे यांनी उलगडून दाखवले आहे. त्यांचे इतिहासभान किती सूक्ष्म आहे हेच त्यातून व्यक्त होते. टिळक-गांधी यांच्या ऐतिहासिक नात्याविषयी अनेकदा जी गल्लत केली जाते ती दूर ठेवून एका विशाल ऐतिहासिक प्रक्रियेतील एकमेकांशी जोडलेले दुवे म्हणून टिळक-गांधींकडे पाहण्याची मोरे यांची मर्मदृष्टी उल्लेखनीय आहे.

'साप्ताहिक सकाळ' या नियतकालिकातील सदरांद्वारे तीन भले थोरले ग्रंथ साकार करण्याची मोरे यांची किमया म्हणजे एक विक्रमच म्हणावा लागेल. वास्तविक पाहता वेगवेगळ्या वेळेला लिहिलेले वेगवेगळ्या विषयांवरचे हे तीन ग्रंथ आहेत. 'तुकाराम दर्शन' (१९९६), द्विखंडीय 'लोकमान्य ते महात्मा' (२००७) आणि 'गर्जा महाराष्ट्र' (२०१३) या तीन ग्रंथांचे विषय वरवर पाहता वेगवेगळे वाटतात, पण मराठी संस्कृतीचे समग्र आकलन आणि

अन्वयार्थ हाच या तीनही ग्रंथांचा मूलभूत विषय म्हणता येईल. त्या अर्थाने हे तीन ग्रंथ म्हणजे एका अघोषित ग्रंथमालेचे तीन भाग म्हणावे लागतील. पण एवढ्यानेसुद्धा ही प्रक्रिया पूर्ण होत नाही. मोरे यांचा महाराष्ट्रातील सामाजिक चळवळींचा नियोजित इतिहास पूर्ण झाला की खऱ्या अर्थाने त्यांच्या 'महाराष्ट्र चतुष्टया'ची सांगता होईल.

'तुकाराम दर्शन' हे चरित्र नाही. एका संताच्या साहित्याचा व विचारांचा तो समग्र आढावासुद्धा नाही. 'महाराष्ट्राचे संस्कृतिपुरुष' आणि 'मराठी संस्कृतीच्या टेहेळणीचा बुरूज' म्हणून डॉ. मोरे संत तुकारामांचा विचार करतात आणि १०८ मण्यांची (लेखांकांची) तुळशीमाळ गुंफतात. स्वाभाविकपणे तुकाराम या परिप्रेक्ष्यातून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाचे पुनर्लेखन ते करतात. महाराष्ट्राच्या परंपरेची आधुनिकतेशी गाठ बांधणारा सार्वकालिक महापुरुष म्हणून तुकारामांचे जे दर्शन मोरे यांनी घडवले आहे ते संतविषयक रूढ साहित्यापेक्षा आगळेवेगळे आहे. भारतीय अभिजात परंपरा आणि पाश्चात्त्य आधुनिक नवविचार या दोन विश्वांपलीकडचे व त्यांची सांधेजोड करण्याची क्षमता असणारे तुकोबांचे विश्व, राज्य व नागरी समाज या द्वैताला छेद देणारी भारतातील व मराठी राज्यपद्धती, वारकरी परंपरेमुळे इस्लामला आत्मसात करून पुढे गेलेली मराठी संस्कृती, संतपरंपरा व शाहिरी परंपरा यांचे जैविक नाते, शिवकालीन स्वराज्याला जीवनरस पुरवणाऱ्या तुकोबांच्या परंपरेने आधुनिक महाराष्ट्रातील प्रबोधनाला दिलेली प्रेरणा, बौद्ध व वारकरी परंपरांच्या आंतरिक नात्याची पुनःस्थापना करण्याची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची दृष्टी यांसारख्या मूलभूत मुद्द्यांच्या विशाल रंगपटावर मराठी संस्कृतीची तुकोबाकेंद्रित चर्चा डॉ. सदानंद मोरे यांनी केलेली आहे. ज्ञानोबा ते तुकोबा अशी वारकरी परंपरेतील कविता हा मराठी साहित्याचा मुख्य प्रवाह असून या प्रवाहाने मराठी साहित्याला निजरूप (identity) प्राप्त करून दिले, असा मोरे यांचा सिद्धांत आहे. या सिद्धांताचे सुसंगत, संशोधनपर

**'तुकाराम दर्शन' (१९९६), द्विखंडीय 'लोकमान्य ते महात्मा' (२००७) आणि 'गर्जा महाराष्ट्र' (२०१३) या तीन ग्रंथांचे विषय वरवर पाहता वेगवेगळे वाटतात, पण मराठी संस्कृतीचे समग्र आकलन आणि अन्वयार्थ हाच या तीनही ग्रंथांचा मूलभूत विषय म्हणता येईल. त्या अर्थाने हे तीन ग्रंथ म्हणजे एका अघोषित ग्रंथमालेचे तीन भाग म्हणावे लागतील. पण एवढ्यानेसुद्धा ही प्रक्रिया पूर्ण होत नाही. मोरे यांचा महाराष्ट्रातील सामाजिक चळवळींचा नियोजित इतिहास पूर्ण झाला की खऱ्या अर्थाने त्यांच्या 'महाराष्ट्र चतुष्टया'ची सांगता होईल.**



आणि सर्जक निरूपण इतके मौलिक ठरले, की साहित्य अकादमी पुरस्काराने ते गौरवले गेले. 'तुकाराम अभ्यास (Tukaram Studies) नावाचे स्वतंत्र आंतरविद्याशाखीय दालन उघडण्याची गरज' डॉ. मोरे यांनी व्यक्त केली आहे. पण खरे तर त्यांच्या ग्रंथाने या दालनाची पायाभरणी झालेलीच आहे. 'सांस्कृतिक आत्मलोपाची शंका भेडसावत असताना निर्वाणीच्या पेचप्रसंगात आपले जहाज भरकटू नये यासाठी तुकोबांसारखे दुसरे योग्य सुकाणू शोधून सापडणार नाही', असे डॉ. मोरे म्हणतात. 'तुकाराम दर्शन' बारकाईने वाचले तर त्यांच्या या विधानाचे तात्त्विक-ऐतिहासिक-समाजशास्त्रीय आकलन होऊ शकते.

'लोकमान्य ते महात्मा' या ग्रंथाची सांगड डॉ. मोरे यांनी त्यांच्या 'मनोगता'त 'तुकाराम दर्शन'शी कशी घातली आहे हे पाहण्याजोगे आहे : ''एका अर्थाने 'लोकमान्य ते महात्मा' हा 'तुकाराम दर्शन'चाच विस्तार आहे. पहिल्याच्या नावात तुकाराम आणि दुसऱ्याच्या नावात टिळक आणि गांधी यांची नावे प्रविष्ट झालेली असली, तरी ते तुकोबा किंवा टिळक-गांधींवरील ग्रंथ नसून महाराष्ट्रावरील आणि मराठी संस्कृतीवरील ग्रंथ आहेत. मराठी स्वभावाचे आणि संस्कृतीचे विविध पैलू तुकोबा, टिळक आणि गांधी यांना प्रतिसाद देताना, त्यांना स्वीकारताना वा नाकारताना कसे प्रगट झाले, याचे हे ग्रंथ आहेत. एक महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाचे तुकारामकेंद्रित पुनर्लेखन आहे, तर दुसरे याच इतिहासाचे टिळक-गांधी (द्वि)केंद्रित पुनर्लेखन आहे. पहिल्याचे मॉडेल वर्तुळाकार आहे, तर दुसऱ्याचे मॉडेल द्विकेंद्रित असल्यामुळे लंबवर्तुळाकार आहे.''

लोकमान्य ते महात्मा या नेतृत्वांतरामुळे घडलेले संक्रमण महाराष्ट्राला नीट पेलले नाही आणि महाराष्ट्राचे देशातील अग्रेसरत्व संपुष्टात आले; परिणामी, महाराष्ट्राच्या प्रगतीचा चढता आलेख उतरता झाला. या विदारक ऐतिहासिक सत्याची मूलगामी मांडणी मोरे यांनी केलेली आहे. १९१५ पासून विचार व कृतीच्यासुद्धा पातळीवर टिळक व गांधी

यांच्याभोवती जो महासंघर्ष उभा राहिला त्याचे 'महाभारत' मांडणारा हा महाग्रंथ आहे. टिळकांचे अनुयायी, ब्राह्मणेतर, हिंदुत्ववादी, कम्युनिस्ट, काँग्रेस, दलित इत्यादी गटातटांच्या या महाभारतातील भूमिकांचा व विरोधा-आंतरविरोधांचा बहुस्पर्शी वेध मोरे यांनी घेतला आहे. राजकारण हे या महासंघर्षाच्या अभिव्यक्तीचे एक क्षेत्र होते. पण धर्म, तत्त्वज्ञान, नीती, साहित्य, कला, क्रीडा अशा विविध क्षेत्रांमध्येसुद्धा हा संघर्ष कसा अभिव्यक्त झाला याची व्यापक वैचारिक कथा म्हणजे 'लोकमान्य ते महात्मा' हा ग्रंथ होय. टिळक आणि गांधी यांच्या गीताविषयक आणि तदनुषंगाने स्वातंत्र्यलढ्याविषयीच्या व जीवनाविषयीच्या भूमिका, या भूमिकांची तात्त्विक बैठक व व्यावहारिक आविष्कार, त्या भूमिकांमधील साम्य-भेद यांची उकल मोरे ज्या पद्धतीने करत जातात, त्यातून 'इतिहासकार हा तत्त्वज्ञ असावाच लागतो' या तत्त्वाचा प्रत्यय येतो. भूतकाळाविषयीच्या या चर्चेची पक्की गाठ ते वर्तमानाशी बांधतात आणि 'भूतकाळ व वर्तमानकाळ यांच्यातील सातत्यपूर्ण संवाद' या इतिहासाच्या व्याख्येचे उपयोजनच करतात. टिळकसमर्थकांना गांधींचे आणि गांधीसमर्थकांना टिळकांचे मोठेपण दाखवून देण्याची गरज पुन्हा निर्माण झाल्याचे ते नमूद करतात. त्यामुळे त्यांचेच शब्द वापरून असे म्हणता येईल, की तुकोबांच्या हरिहरैक्यभावाचे स्थितिकालानुरूप उपयोजन म्हणजेच 'लोकमान्य ते महात्मा' हे महाराष्ट्राचे महाभारत! यासाठी ज्ञानमीमांसेचे व पद्धतिशास्त्राचे नयवादी व आंतरविद्याशाखीय प्रतिमान ते उभे करतात. 'अनेक अभ्यासकांनी एकत्र येऊन करायचे कार्य त्यांनी एकट्याने पार पाडले', अशी य. दि. फडकेकृत प्रशस्ती यथार्थ आहे.

स्वतःला 'महाराष्ट्राच्या लोकव्यवहाराचे अभ्यासक' म्हणवणाऱ्या डॉ. सदानंद मोरे यांनी त्या पद्धतीनेच सातवाहन काळापासून आजवरच्या महाराष्ट्राची अस्तित्व-ओळख 'गर्जा महाराष्ट्र' या ग्रंथाद्वारे करून दिली आहे. ही ओळख भाषिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय अशा विविध अंगांनी करून दिलेली आहे. त्यासाठी त्यांनी राजारामशास्त्री भागवत, न्या. म. गो. रानडे, इतिहासाचार्य वि. का. राजवाडे, ज्ञानकोशकार डॉ. श्री. व्यं. केतकर, महर्षी वि. रा. शिंदे इत्यादी भाष्यकारांच्या मतांचा धांडोळा घेतला आहे. या मंडळींचे ज्ञानकारण, जातकारण व इतिहासभाष्य यांचा चिकित्सक परामर्श घेत महाराष्ट्राच्या इतिहास व संस्कृतीविषयीच्या सम्यक मांडणीचा उल्लेखनीय प्रयत्न त्यांनी केला आहे. या ग्रंथात समाविष्ट असलेला माझा अभिप्राय येथे उद्धृत करतो :

''मराठी माणसाचा न्यूनगंड व चुकीच्या अस्मितांचे धुमारे यांची कारणमीमांसा करण्यासाठी, इतिहासाबद्दलची अनभिज्ञता दूर करण्यासाठी आणि स्मरणरंजन व स्वप्नरंजनाची टोके टाळून इतिहासापासून योग्य ती प्रेरणा घ्यावी या उद्देशाने 'गर्जा महाराष्ट्र' हा ग्रंथ अवतरला आहे. हा कालक्रमाने वर्णिलेला महाराष्ट्राचा चाकोरीबद्ध इतिहास नाही. महाराष्ट्रेतिहासाच्या लेखनपरंपरेची समाजशास्त्रीय चिकित्सा करत प्राध्यापक डॉ. सदानंद मोरे हे इतिहासाची आणि इतिहासलेखनाची द्वंद्वात्मक जडणघडण चित्रित करतात. त्यासाठी त्यांनी भव्य सांस्कृतिक रंगपट वापरला आहे. डॉ. मोरे यांचे लेखन म्हणजे महाराष्ट्रविश्वरूपदर्शनच म्हणता येईल. डॉ. मोरे यांची अभ्यासाची बैठक पंडिती आहे, पण त्यांच्या शैलीत हरदासी रसाळपणा आहे. लावणी-पोवाड्याचा ठसकासुद्धा आहे. मराठ्यांच्या इतिहासाच्या अन्य अनेक अभ्यासकांसारखे संकुचित चौकटीत न अडकता ते आंतरविद्याशाखीय व तौलनिक दृष्टीच्या विशाल अवकाशात वावरतात. प्रा. मोरे त्यांच्या पोतडीतून तपशिलांच्या अनेक सरस आणि सुरस चीजा बाहेर काढतात, पण त्यात हातचलाखी मात्र नसते. तपशिलांची अक्षरशः रास ते मांडतात, पण तत्त्वाची कास ते सोडत नाहीत. नियतकालिकातील सदराला केवढी ग्रंथयोग्यता लाभू शकते याचे 'तुकाराम दर्शन', 'लोकमान्य ते महात्मा' आणि 'गर्जा महाराष्ट्र' या त्रिवेणीसंगमावरील दर्शन म्हणजे मराठी साहित्यविश्वातील एक अभंग लेणेच म्हटले पाहिजे. देहूकरांच्या या इतिहासदर्शनाचे अगणित लावण्य म्हणजे तमाम रसिकांनी व अभ्यासकांनी एकदा तरी अनुभवण्याची बाब आहे.''

॥ ४ ॥

मराठ्यांच्या इतिहासाविषयी पठडीबाज इतिहास-संशोधकांपेक्षा वेगळी मांडणी डॉ. मोरे सध्या करीत आहेत. त्यांच्या षष्ट्यब्दिपूर्तीच्या सत्कारप्रसंगी पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाच्या राजवाडे सभागृहात त्यांनी जे उद्गार काढले त्यामध्ये या मांडणीचे सार आलेले आहे ते असे :

''मराठ्यांचा इतिहास खूप उज्ज्वल आहे. पण इतिहासलेखन हे जातिभेदाने ग्रस्त आहे, त्यामुळे समग्र पद्धतीऐवजी जातींच्या अंगाने इतिहास मांडला जातो. निःपक्षपणे सर्व बाजू मांडणाऱ्यांना त्रास दिला जातो. जातीयवादामुळे आपणच आपले खच्चीकरण केले आहे. देशाचे नेतृत्व करण्याची शक्ती असूनही महाराष्ट्रातील लोकांनी स्वतःला सतत लहान केले. संत नामदेव भारतीय स्तरावर गेले. पेशव्यांचे राज्य कटकपर्यंत होते. इंग्रजांनी सत्ता

घेतली ती पेशव्यांच्या हातातूनच. भारत हा अखंड देश असून अब्दाली परका आहे व त्याच्याविरुद्ध लढले पाहिजे यासाठी मराठ्यांनी पानिपतचे युद्ध केले. महादजी शिंदे यांच्याकडे हिंदुस्थानची 'पाटिलकी' होती. दिल्लीवर मुगलांबरोबरच २०-२५ वर्षे मराठ्यांचा भगवा फडकत होता, पण हा इतिहास आपण लिहित नाही. कारण ब्राह्मणांना वाटते, की शिंद्यांचा इतिहास का सांगायचा, आणि ब्राह्मणेतरांना वाटते, की तो सांगावा तर महादजींचे श्रेय पेशव्यांना जाईल! शिवाजी महाराज मोठेच होते; पण आपण त्यांच्या इतके प्रेमात पडलो की दुसऱ्यांचा मोठेपणा विसरलो!''

डॉ. सदानंद मोरे यांची ग्रंथत्रयी आणि उपरोल्लेखित भूमिका यांच्या संदर्भाने मोरे यांच्या योगदानाबद्दल चार मुद्दे सूत्ररूपाने नोंदवतो.

१. महाराष्ट्रात इतिहासलेखन विपुल झाले, पण इतिहासचिंतन चिंताजनकरीत्या कमी झाले. महाराष्ट्राचा इतिहास आपण मराठ्यांच्या इतिहासापुरता बंदिस्त केला. शिवाजी महाराज किंवा फार तर संत ज्ञानेश्वर यांच्यापूर्वीचा महाराष्ट्राचा इतिहास आपल्या गावी तरी नसतो आणि असला तरी तो आपण एखाद्या स्वतंत्र बेटासारखा वेगळा काढतो. जणू तो महाराष्ट्राचा अनौरस इतिहास आहे! ही इतिहासांतर्गत अस्पृश्यता झुगारून देऊन एका भव्य रंगपटावर महाराष्ट्रेतिहासाची सम्यक् मांडणी करण्याचा जो अनेकांगी प्रकल्प डॉ. सदानंद मोरे यांनी उभारला, ते त्यांचे ठळक योगदान म्हणता येईल.

२. संकुचित प्रादेशिकतावाद आणि अभिनिवेशग्रस्तता टाळून महाराष्ट्रेतिहासाची जी कसदार मांडणी डॉ. मोरे यांनी मोठ्या आत्मविश्वासाने केली, ती महाराष्ट्राच्या केवळ इतिहासलेखनालाच नव्हे, तर राजकारण-समाजकारणाला आंतरिक बळ पुरवणारी आहे. तुकोबांची सर्वजनवादी आणि धगधगितोज्ज्वळ मशाल सदानंद मोरे यांनी आपल्या लेखनाच्याद्वारे हाती धरली आहे. तिचा प्रकाश आपल्याला दिसला नाही तर तो करंटेपणा म्हणावा लागेल.

३. भारतीय इतिहासलेखनविश्वात सध्या 'अठराव्या शतकाविषयीचा वादंग' म्हणून ओळखले जाणारे विचारमंथन चालू आहे. अठरावे शतक हे भारताचे तमोयुग असल्याच्या साम्राज्यवादी इतिहासकारांच्या मांडणीला संशोधकीय देशी आव्हान या निमित्ताने दिले जात आहे. मोरे यांच्या मांडणीचा विचार या नव्या प्रवाहाच्या अनुषंगाने करता येईल. भारतीय स्वातंत्र्यलढ्याबाबत डॉ. बिपन चंद्रांसारख्या इतिहासकारांनी आंतोनिओ ग्रामचीचे 'भूमिकायुद्धा'चे ('War of Positions' चे) प्रतिमान वापरले आहे. डॉ. मोरे यांच्या मांडणीची अर्थपूर्णता त्या संदर्भात अभ्यासण्याजोगी आहे. एकविसावे शतक हे आंतरविद्याशाखीय (Interdisciplinary) अभ्यासाचे आहे. मोरे यांचे समग्र साहित्य अशा अभ्यासावरच आधारलेले आहे.

४. संशोधकीय मांडणी ज्या काटेकोर लेखनपद्धतीच्या रूपाने केली जाते ती सर्वसामान्य वाचकांना फारशी भावत नाही. याउलट, लोकप्रिय पातळीवरचे भाष्य लोकरंजनवादी व सपक होण्याचा धोका असतो. पण भक्कम संशोधकीय पायावरचे लोकप्रिय पण संयत लेखन कसे करावे याचा एक वस्तुपाठच डॉ. सदानंद मोरे यांनी घालून दिला आहे. 'भारतीय इतिहासाची अनेक जगते' ('Many Worlds of Indian History') या अप्रतिम निबंधात सुमित सरकार या ख्यातनाम इतिहासकाराने जी चिंता व्यक्त केली आहे तिच्या निवारणासाठीचा सुवर्णमध्य मोरे यांच्या लेखनातून खुणावत आहे. त्याची दखल मात्र घ्यायला हवी.

॥ ५ ॥

संत नामदेवांनी वास्तव्य केलेली पंजाबातील पवित्र भूमी असलेल्या घुमान येथे ३ ते ५ एप्रिल या काळात यंदाचे साहित्य संमेलन भरत आहे. तेथे संतसाहित्याचा प्रतिभावंत अभ्यासक अध्यक्ष असावा हे उचितच आहे. डॉ. सदानंद मोरे अध्यक्षपदी विराजमान झाल्याने केवळ त्यांचा व्यक्तिगत सन्मान होणार नाही, तर महाराष्ट्राचा महाराष्ट्राबाहेरील भारताशी अर्थपूर्ण साहित्यिक-वैचारिक संवाद साधला जाईल. गर्वाच्या कोणत्याही आक्रमक घोषणा न देता दमदारपणे व कसदारपणे महाराष्ट्राची अस्तित्वओळख बाह्यजगताला सांगण्यासाठीचा तो एक विधायक सोहळा ठरेल. 'ज्ञानदीप लावू जगी' हे नामदेवांचे व्रत आचरण्याचा तो एक सामूहिक आनंदमेळा असेल. प्रांतिक अस्मिता, राष्ट्रीय एकात्मता आणि विश्वकल्याणाची उदात्त बुद्धी यांचा मेळ साधणारे ते एक सम्मीलन असेल. साहित्याची जत्रा आणि वारकऱ्यांची यात्रा यांचा तो अपूर्व मेळ असेल. साहित्यसंमेलनाध्यक्षांचे भाषण हे साहित्यचिंतकाचे महाभाष्य असावे अशी अपेक्षा असते. घुमान येथे ती अपेक्षा पुरी होईल याची मला खात्री वाटते. मित्रवर्य डॉ. सदानंद मोरे यांचा 'रिकामटेकडेपणा' दिवसेंदिवस वाढत जावो, हीच या निमित्ताने शुभकामना!

◆

**डॉ. राजा दीक्षित**
**भ्रमणध्वनी** : ९७६७७८८९५४
smrajadixit@gmail.com



**निमित्त : ज्ञानपीठ**


संजय भास्कर जोशी

एक कला असो, क्रीडा असो वा सामाजिक कार्य असो, अशा कोणत्याही क्षेत्रातले सर्वोच्च स्थानदर्शक पुरस्कार हे त्या एकट्या पुरस्कार मिळवणाऱ्यापुरते मर्यादित नसतात, तर त्या पुरस्कारविजेत्याच्या कर्तृत्वाचा अभिमान बाळगणाऱ्यांचाही तो सन्मान असतो. त्याच्या कार्याविषयी आस्था बाळगणाऱ्यांना, दीर्घकाळ त्या कार्याला दाद देणाऱ्यांच्या समूहाला दिलेली ती दाद असते. कारण पुरस्कारांच्या निवडीवर अशा सकारात्मक पर्यावरणाचा प्रभाव असतोच. याच अर्थाने श्रेष्ठ लेखक भालचंद्र नेमाडे यांना मिळालेला 'ज्ञानपीठ' पुरस्कार गेली पाच दशके त्यांच्या साहित्यावर प्रेम करणाऱ्या रसिकांचाही सन्मान आहे असे म्हणायला हवे. 'कोसला' ते 'हिंदू' हा भालचंद्र नेमाडे यांचा वाङ्मयीन प्रवास थक्क करणारा आहे, त्याचे एक वैशिष्ट्यपूर्ण कारण आहे. ते कारण असे, की लोकप्रियता आणि गुणवत्ता यांचे असे मिश्रण दुर्मीळ आहे. आपल्याकडे अनेक श्रेष्ठ आणि दर्जेदार साहित्यिक आणि साहित्यकृती उपेक्षेच्या अंधारात पडलेल्या असतात. सर्वसामान्य



# 'ज्ञानपीठ'ची समृध्द अडगळ

वाचकांना तर त्यांच्याविषयी पत्ताच नसतो. वर्षानुवर्षे अशा साहित्यकृतींची एखादी आवृत्तीदेखील संपता संपत नाही. दुसरीकडे अनेक लोकप्रिय साहित्यिक मात्र समीक्षक आणि जाणकारांच्या खिजगणतीतदेखील नसतात. त्यांच्या पुस्तकांच्या आवृत्त्या संपतात पण सार्वकालीन श्रेष्ठ वाङ्मयाच्या यादीत मात्र त्यांना स्थान लाभत नाही. श्याम मनोहर, किरण नगरकर, मकरंद साठे यांच्यासारखे अतिशय उत्तम आणि दर्जेदार साहित्यनिर्मिती करणारे साहित्यिक समीक्षकांच्या दृष्टीने श्रेष्ठ ठरतात पण मोठ्या प्रमाणावर वाचकवर्ग त्यांच्या वाट्याला येत नाही. याउलट, व. पु. काळे, सुहास शिरवळकर, रणजित देसाई, शिवाजी सावंत, विश्वास पाटील यांच्यासारख्या साहित्यिकांना उदंड वाचकवर्ग लाभतो पण त्यांच्या वाट्याला फारशी गंभीर समीक्षा मात्र येत नाही. समीक्षक त्यांच्याविषयी डाव्या हातानेच लिहितात. भालचंद्र नेमाडे यांचे वैशिष्ट्य म्हणजे एकीकडे तब्बल पन्नास वर्षे 'कोसला' या त्यांच्या पहिल्याच कादंबरीने वाचकांच्या मनावर घातलेले गारूड अबाधित आहे. आजही तिच्या आवृत्त्या दिमाखदार स्वरूपात येताहेत. 'हिंदू' या बहुचर्चित, बहुप्रतिक्षित चतुष्टयाचा पहिला खंड बाजारात येण्याची प्रचंड मोठा वाचकवर्ग प्रतीक्षा करत राहिला आणि हातोहात त्याच्या आवृत्त्या खपल्या आणि त्याच वेळी झाडून साऱ्या समीक्षकांनी अत्यंत आदराने नेमाडे यांच्या साहित्याची नुसतीच दखल घेतली नाही तर एकमुखाने ते गौरवले आहे. त्यांच्या





●

**मराठी कादंबरीच्या एका नव्या युगाचे प्रवर्तक असलेल्या आणि 'कोसला ते हिंदू' अशा पन्नास वर्षांच्या आपल्या सर्जनशील साहित्यनिर्मितीने मराठी साहित्यविश्व समृद्ध करणाऱ्या भालचंद्र नेमाडे यांना भारतीय साहित्य क्षेत्रात सर्वोच्च मानला गेलेला ज्ञानपीठ सन्मान जाहीर झाला आहे. या निमित्ताने भालचंद्र नेमाडे यांना ज्ञानपीठ मिळण्याचे मराठी साहित्यविश्वाच्या दृष्टीने कोणकोणते आयाम असू शकतात, हे अधोरेखित करणारा लेख.**

●

'कोसला' या कादंबरीची सर्वांगीण समीक्षा करणारे 'कोसलाबद्दल' नावाचे पुस्तक विख्यात आहे. सांगायचा मुद्दा वाचकप्रिय आणि समीक्षकप्रिय असे दुहेरी भाग्य लाभलेले नेमाडे हे दुर्मिळ साहित्यिक आहेत. गुणवत्ता आणि लोकप्रियता यांचे हे अजब मिश्रण आहे. खरे तर गेली अनेक वर्षे नेमाडे यांना हा पुरस्कार जाहीर होईल अशी मराठी रसिकांची इच्छा आणि अपेक्षा होतीच. साहजिकच ज्ञानपीठ या साहित्यक्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कारावर डॉ. भालचंद्र नेमाडे यांच्यासारख्या लेखकाचा हक्क वादातीत म्हटला पाहिजे.

पण जे वादातीत असते, किंवा तसे वाटते त्यावरदेखील अहमहमिकेने वाद घालणे हे मराठी माणसाचे एक लक्षण म्हटले पाहिजे. त्यानुसार नेमाडे यांना हा अभिमानास्पद पुरस्कार जाहीर झाल्यावरदेखील वाद सुरू झालेच. तसे नेमाडे आणि वाद यांचे एक पुरातन नाते आहेच. नेमाडे

त्यांच्या वादग्रस्त विधानांमुळे आणि खळबळजनक मतांमुळे कायमच चर्चेत असतात. नेमाडे नुसते चर्चेतच असतात असे नाही, तर अनेक दिशांनी त्यांच्यावर बाण सोडणाऱ्यांची, छुपे वा उघड हल्ले करणाऱ्यांची संख्या कमी नाही. अगदी पुण्यातल्या विनय हर्डीकरांपासून विलायतेतल्या सलमान रश्दींपर्यंत अनेकजण नेमाडे यांच्यावर हल्ले करत असतात. एवढे प्रेम, एवढा आदर आणि त्याचबरोबर एवढी टीका आणि हल्ले पचवलेला लेखक विरळा, असे म्हणावे लागेल. वास्तवतावाद, देशीवाद, प्रस्थापित आणि म्हातारे मराठी साहित्यिक, साहित्य संमेलने, मराठीतील लघुकथा अशा अनेक विषयांवर भालचंद्र नेमाडे यांची ठाम आणि टोकाची मते आहेत आणि त्यांनी ती वेळोवेळी अतिशय आक्रमक भाषेत मांडली आहेत. (आक्रमकता हा तर त्यांचा स्थायीभावच आहे. त्यांची समीक्षादेखील 'प्रक्षुब्ध समीक्षा' या गटात मोडावी लागेल. त्यासाठी 'टीकास्वयंवर'मधले श्रीकेक्षी किंवा पु. शि. रेगे यांच्याविषयीचे त्यांचे लेख वाचावेत.) प्रत्येक वेळी काही लोक त्यांच्या या मतांमुळे त्यांचे चाहते झाले पण दर वेळी त्यांच्या टीकाकारांत आणि हल्लेखोरांत मात्र वाढ होत गेलेली दिसते. कदाचित त्यामुळेच त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार देताना ज्ञानपीठ समितीतर्फे नामवरसिंहांनी 'मराठीतल्या राजकारणावर मात करून' हा पुरस्कार नेमाडे यांना मिळाल्याचे म्हटले असावे. पण तरीही या सगळ्यात सत्य हेच आहे, की एका मोठ्या भाबड्या समूहाला मात्र या राजकारणाचीही जाण नसते आणि नेमाडे यांच्या साहित्यातल्या श्रेष्ठ साहित्यगुणांचीही कल्पना नसते. त्यांना फक्त पांडुरंग सांगवीकर, चांगदेव पाटील, नामदेव भोळे आणि खंडेराव हे आपल्यापैकी एक वाटतात, आपले वाटतात आणि त्यांना या 'आपल्या' लेखकाला हा हिमालयाएवढा पुरस्कार मिळाल्याचा मनोमन आनंद वाटत असतो. त्यातून उरलेल्या एका छोट्या समूहाला, म्हणजे नेमाडे यांच्या आक्रमक मतांमुळे दुखावलेल्या या छोट्या समूहाला राग आलेला असतो, तर दुसऱ्या एका छोट्या गटाला, ज्यांना नेमाडे यांच्या साहित्यातले वाङ्मयीन श्रेष्ठत्व उमजलेले असते त्या गटाला श्रेष्ठ साहित्यिकाला हा पुरस्कार मिळाल्याचे समाधान वाटत असते. नेमाडे यांच्या या सन्मानाचे असे हे वेगवेगळे आयाम आहेत. कुणी भाबड्या आनंदाचे श्रावणसोहळे करत आहेत, कुणी आतल्या आत संतापाने धुमसत आहेत तर कुणी उच्च आनंदाने संतुष्ट आहेत.

**दोन**

मुळात एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी, की ज्ञानपीठ हा पुरस्कार आधी एखाद्या श्रेष्ठ साहित्यकृतीला दिला जात असे, तर आता साहित्यिकाच्या एकूण साहित्यसेवेला, एकूण साहित्यनिर्मितीला दिला जातो. लक्षात घ्या, आधी काय, किंवा आता काय, हा पुरस्कार नागरी सेवेला, सामाजिक कार्याला, उत्तम वागणुकीला किंवा आकर्षक सर्वमान्य व्यक्तिमत्त्वाला नाही. हा पुरस्कार साहित्याला आहे. बहुतेक वेळा हे आपण विसरून जातो. समीक्षेतदेखील असा एक प्रवाह आहे, की पुस्तकाचे मूल्यमापन करताना लेखकाचे चरित्र आणि व्यक्तिमत्त्व समीक्षेमध्ये येता कामा नये. केशवसुतांनी कवीबाबत 'होता कसा आननी' म्हटले होते ते याच अर्थाने. साहित्यकृती आणि साहित्यिक यांची गल्लत करणे त्या दोघांवरही अन्याय करणारेच असते. जे समीक्षेत खरे तेच पुरस्कारात का मान्य करू नये? ज्ञानपीठ काही वर्तणुकीबद्दलचा किंवा सामाजिक मतांबद्दलचा नागरी पुरस्कार नव्हे. विशिष्ट काळात तरुण साहित्यिकांमध्ये असणारे म्हाताऱ्या साहित्यिकांच्या विषयीचे मत एखाद्या साहित्यकृतीत व्यक्त केले असेल तर ते त्या साहित्यकृतीचा भाग, त्या साहित्यकृतीतल्या वाङ्मयीन वास्तवातला एक भाग म्हणायला हवे. नेमाडे यांचे 'कोसला ते हिंदू व्हाया मेलडी आणि टीकास्वयंवर' हे साहित्यिक कर्तृत्व वादातीत असेल तर ज्ञानपीठ पुरस्कारावर त्यांचा हक्कच आहे. इतकेच नव्हे, तर तो आपण सर्व मराठी रसिकांचा हक्क आहे असे म्हणायला हवे.

साहित्य संमेलने, देशीवाद किंवा लघुकथा याविषयीची नेमाडे यांची मते वादग्रस्त आणि टीकास्पद असतील तर त्यावर त्याच पद्धतीने टीका करायला हवी, वाद घालायला हवेत आणि सकारात्मक वृत्तीने चर्चा करायला हवी. त्यांचा संबंध जोडून ज्ञानपीठ पुरस्काराचे मोल कमी करण्याची काय गरज? आधीच हिंदी आणि कन्नडसारख्या भाषेतल्या साहित्यिकांना आपल्या दुपटीने ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. त्यात आपणच आपल्या वृत्तीने मराठीला मागे खेचणार असलो तर काय अर्थ आहे? वेळीच मराठीतल्या अनेक उत्तमोत्तम साहित्यकृतींचे इंग्रजी अनुवाद होणे यासारखे प्रकल्प खरे तर या निमित्ताने ऐरणीवर यायला हवे. एकजुटीने मराठी लेखक-प्रकाशकांनी अग्रक्रमाने असे प्रकल्प हाती घ्यायला हवे. अधिकाधिक पुरस्कारांवर मराठी साहित्यिकांनी हक्क सांगायला हवा. (याही पुढे जाऊन म्हणायचे, तर वेळीच इंग्रजी अनुवाद आणि उत्कृष्ट मार्केटिंग केले असते तर अरविंद आडिगाच्या 'व्हाइट टायगर' या

सामान्य पुस्तकापेक्षा 'कोसला' किंवा 'हिंदू' किती तरी जास्त श्रेष्ठ असल्याने मराठी लेखकाला बुकर (चाळीस लक्ष रुपये बरं का!) पुरस्कार मिळू शकला नसता का? - यासारखे वाद खरे तर उफाळून यायला हवेत, नाही का? असो.)

साहित्य संमेलने किंवा लघुकथा यासारख्या विषयांवर भालचंद्र नेमाडे यांची मते एकांगी पद्धतीने वाचून त्यावर धुरळा उडाला असावा असेही मानायला जागा आहे. साहित्य संमेलन आणि लघुकथा या दोन्हींवर त्यांच्या आता असलेल्या स्वरूपावर नेमाडे यांनी खरे तर टीका केली आहे असे मला वाटते. दोन्ही बाबतींत मूळ संकल्पनेवर त्यांच्या टीकेचा रोख नाही. साहित्य संमेलने आवश्यकच असतात आणि लघुकथा हा ताकदवानच फॉर्म आहे, असे मी स्वत: त्यांच्या तोंडून ऐकले आहे. फक्त ज्या सवंग पद्धतीने दोन्हीला सध्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे त्यावर त्यांच्या टीकेचा रोख आहे. प्रेमचंद, जीए यांच्यापासून अनेक श्रेष्ठ कथाकारांचा उल्लेख करून कथा या प्रकाराचे सामर्थ्य मान्य करून नेमाडे यांनी म्हटले आहे, की या साहित्यप्रकाराच्या क्षमता संपल्यासारखा निर्जीवपणे हा साहित्यप्रकार हाताळला जात असेल तर हा प्रकार आता बंद करून नवे प्रकार शोधायला हवेत. (प्रामुख्याने दिवाळी अंक भरणाऱ्या निकृष्ट कथांकडे त्यांचा रोख होता.) त्याचप्रमाणे आदर्श साहित्य संमेलनाचे स्वरूपही त्यांनी सांगितले आहेच. अर्थात त्यांची ही मते पटायला हवीत असे मात्र नाही. शिवाय त्यांच्या मतांत आणि मतांच्या अभिव्यक्तीत सातत्य आहे असेही नाही. मलाही वाटते, मोठ्या आणि दिमाखदार साहित्य संमेलनांचे आपले असे एक कार्य असतेच. मलाही वाटते, साहित्यकृतीचे मोठेपण तिच्या फॉर्मपेक्षा ती ज्या ताकदीने हाताळली जाते त्यावर अवलंबून असते. पण या साऱ्याचा संबंध ज्ञानपीठ पुरस्काराशी जोडणे अगत्याचे नाही. त्या पुरस्काराचा रीतसर आनंदोत्सव करायला हवा. आणि खरे सांगायचे तर महाराष्ट्रभर जागोजागी तो होतही आहेच. नेमाडे यांच्या ज्ञानपीठ पुरस्काराचा आनंदोत्सव मोठ्या प्रमाणावर सर्वत्र होत आहे याची दोन कारणे आहेत.

**तीन**

पहिले म्हणजे कोसला, बिढार वगैरे कादंबऱ्यांमुळे मराठी साहित्यात एक महत्त्वाची घटना घडली. ती अशी, की कोसला प्रसिद्ध झाल्यानंतर पुण्या-मुंबईत विशिष्ट मानसिकतेत अडकलेले साहित्य मोठ्या प्रमाणावर विकेंद्रित झाले. एकूणच साहित्याचा परीघ विस्तारला. गावोगावच्या उमद्या तरुणांना आपले जगणेदेखील मौलिक असू शकते याचा साक्षात्कार होऊन हा तरुण आपल्या जगण्याविषयी लिहायला लागला. 'शंभरातील नव्व्याण्णवांस' अर्पण केलेल्या या कादंबरीने त्या नव्व्याण्णवांपैकी वीस-पंचवीस तरी जणांना लिहिते केले. आणि हे वीस-पंचवीसजण कोकण, विदर्भ, मराठवाडा, जिल्ह्याची, तालुक्याची गावे, खेडीपाडी... असे महाराष्ट्रभर पसरलेले होते. त्यांना पांडुरंग सांगवीकर आपल्यापैकी एक वाटला. त्याची जगायची आणि बोलायची शैली आपली वाटली. त्याच्या जगण्यात ना शूरवीर नायकाची साहसे होती ना धनुष्याकृती भुवया आणि



**कोसला प्रसिद्ध झाल्यानंतर पुण्या-मुंबईत विशिष्ट मानसिकतेत अडकलेले साहित्य मोठ्या प्रमाणावर विकेंद्रित झाले. एकूणच साहित्याचा परीघ विस्तारला. गावोगावच्या उमद्या तरुणांना आपले जगणेदेखील मौलिक असू शकते याचा साक्षात्कार होऊन हा तरुण आपल्या जगण्याविषयी लिहायला लागला. 'शंभरातील नव्व्याण्णवांस' अर्पण केलेल्या या कादंबरीने त्या नव्व्याण्णवांपैकी वीस-पंचवीस तरी जणांना लिहिते केले.**

पुष्ट उरोज असलेल्या, बॅडमिंटन खेळणाऱ्या नायिका होत्या. होते ते साधे पण माणसाचे माणूसपण चॅलेंज करणारे पर्यावरण आणि त्या पर्यावरणाचा दंभस्फोट. त्याच पर्यावरणात आपले अस्तित्वभान शोधणारे हे शेकडो उमदे तरुण त्यामुळेच लिहायला लागले. साहजिकच नेमाडे हे त्यांचे हीरो होते आणि आहेत. आणि विशेष म्हणजे अशा उमद्या तरुणांमधूनच आज राज्य पुरस्कारांपासून साहित्य अकादमी पुरस्कार मिळवण्यापर्यंत पोचलेलेदेखील अनेक साहित्यिक आहेत. हा सर्व वर्ग आज आपल्या हीरोला मिळालेल्या सन्मानाने मनापासून आनंदित झालेला आहेच. मुख्य म्हणजे या वर्गातल्या अनेकांनादेखील नेमाडे यांची काही मते पटत नाहीत, पण सगळीच मते कायम पटावीत असे थोडेच आहे, हेही उभयपक्षी समजून घेतलेले आहे. आधीच्या पिढीला चॅलेंज करत, आव्हान देतच पुढच्या पिढीने आपले स्थान निर्माण करायचे असते, हे तर नेमाडे यांनीच या वर्गाला सांगितले, शिकवले आहे. स्वत: नेमाडे यांनी आयुष्यभर तेच केले आहे. त्यामुळे हा वर्ग आनंदोत्सव करत आहे.

दुसरे कारण म्हणजे एकीकडे आक्रमक, वादग्रस्त आणि आग्रही मते मांडणारे आणि नवनव्या वादात आवेशाने उतरणारे नेमाडे एक माणूस म्हणून निराळेच आहेत. महाराष्ट्रातल्या तरुण लेखक आणि वाचकवर्गात विशेषत: हे मत प्रसिद्ध आहे. अनेक तरुण लेखकांना आणि वाचकांना भालचंद्र नेमाडे यांचे 'रा. रा. ....' असा मायना असलेले पत्र रवाना झाले की तिकडे त्या नुकत्याच मिसरूड फुटलेल्या किंवा नुकतेच पोर झालेल्या त्या लेखकाचे किंवा वाचकाचे डोळे डबडबलेले असतात. प्रदीर्घ काळ प्राध्यापकी केलेल्या नेमाडे सरांचे अनेक विद्यार्थी त्यांनी कसे आडवे-तिडवे वाचायला लावले, साहित्याविषयीची जाण कशी वाढवली याच्या आठवणी सांगत असतात. असे अनेकजण नेमाडे या प्रेमळ पण उग्र, आदिम साहित्यप्रेमाने आदरणीय वाटणाऱ्या म्हाताऱ्यावर मनोमन प्रेम करत असतात. असाही मोठा वर्ग नेमाडे यांना मिळालेल्या या सर्वोच्च पुरस्काराने आनंदाने गदगदून गेलेला आहे.

**चार**

स्वत: केलेल्या साहित्यसेवेबरोबरच एकूण त्या भाषेतील साहित्यक्षेत्राला दिलेले योगदान हा खरे तर ज्ञानपीठासारख्या सर्वोच्च पुरस्काराचा एक निकष असतो. आणि ते योग्यच आहे. भालचंद्र नेमाडे यांचे या बाबतीतले स्थान निर्विवाद मोठे आहे. कविता, कादंबरी आणि समीक्षा या साहित्यप्रकारांत केलेल्या विपुल आणि श्रेष्ठ कामगिरीबरोबरच मराठी साहित्यक्षेत्रावर उमटलेला त्यांचा ठसा अमिट आहे, विलक्षण आहे. कवितेच्या प्रांतात केशवसुत किंवा मर्ढेकर यांच्याबाबत जसा 'युगप्रवर्तक' हा शब्द वापरला जातो तसा तो नेमाडे यांच्याबाबत वापरला जातो किंवा काय माहीत नाही, पण साचलेल्या मराठी साहित्याला मोकळे करायचे काम नेमाडे यांनी त्या काळात मोठ्या जोमाने आणि निर्णायकरीत्या केले यात संशय नाही. 'कोसला' ही भन्नाट कादंबरी लिहून आधी त्यांनी घाट, भाषा, शैली आणि आशयाच्या बाबतीत क्रांती केली आणि त्यानंतर अनियतकालिकांच्या चळवळीने कविता आणि समीक्षा या प्रांतातही नवे वारे आणले. 'कोसला' किंवा 'चांगदेव चतुष्ट्या'वर आतापर्यंत इतक्या प्रकारे लिहून झाले आहे की नव्याने त्यावर लिहायची गरज (किंवा सोय) उरली नाही हे खरे, पण नेमाडे यांच्या लेखनाने नवनवे प्रयोग करणाऱ्यांना उमेद दिली हे त्यांचे मोठेच काम आहे. वास्तववाद, नैतिकता आणि देशीवाद या त्रिसूत्रीवर ठाम राहत नेमाडे यांनी ही प्रचंड साहित्यनिर्मिती केली आहे. या तिन्हीवर सातत्याने सकारण आणि विनाकारण हल्ले होत असतानाही एकाकीपणे पण समर्थपणे किल्ला लढवत आपल्या भूमिकेवर ठाम राहिलेला हा निष्ठावान साहित्यिक आहे. साचलेपणाविरुद्ध बंडखोरी आणि परंपरांविषयी आस्था असे हे अजब मिश्रण आहे. जागतिकीकरणाच्या सुरुवातीच्या मोहमयी रूपावरचे बुरखे आता टराटरा फाटत आहेत आणि अशा काळात नेमाडे यांच्या देशीवादाचे नव्याने मूल्यमापन करायला हवे. नव्याने तो समजून घ्यायला हवा. वेळ पडली तर तो न नाकारता त्यात 'मॉडिफिकेशन्स' करायला हवीत. पण मुळात यासाठी मोकळेपणाने त्याच्याकडे बघायला हवे. काय आहे, की अशा बाबतीत जी आधी संधी असते तेच कालांतराने आक्रमण होऊ शकते आणि आधी जे बंधन असते तेच नंतर संरक्षण होऊ शकते. जागतिकीकरण आणि देशीवाद यांच्याकडे या अर्थानेदेखील बघायला हवे. आणि या अर्थाने नव्या पिढीने नेमाडे यांच्याच खांद्यावर उभे राहून सुधारित असा 'नवदेशीवाद' शोधायला हवा. (मीच घेतलेल्या) एका मुलाखतीत नेमाडे म्हणाले होते, ''आम्ही आमच्या आधीच्या पिढीशी जोरदार बंडखोरी केली, पण आमच्या नंतरच्या पिढीने आमच्याविरुद्ध पुरेशी बंडखोरीच केली नाही याची मला चिंता वाटते.'' हे विधान विचार करण्यासारखे आहे. गंमत म्हणजे देशीवादावरदेखील गंभीर वादविवाद झडले ते काही अपवाद वगळता बहुतांश त्यांच्याच पिढीतल्या लोकांकडून. हे चित्र मात्र बदलायला हवे. नव्या पिढीने उमदेपणाने किंवा अपरिहार्यतेने जर आता जागतिकीकरणाचा स्वीकार केलाच असेल तर त्या परिप्रेक्ष्यात देशीवाद नव्याने समजून आणि तपासून घ्यायला हवा. थोडे बारकाईने पाहिले तर नेमाड्यांना अभिप्रेत असलेली वास्तवता आणि नैतिकता याही बाबतीत असेच म्हणावे लागेल. लघुकथा या प्रकाराच्या क्षमता संपत आल्या म्हणून नव्या शक्यता शोधायला हव्या, असे जर नेमाडे म्हणत असतील, तर नेमाडे यांना अभिप्रेत असलेल्या नैतिकता आणि वास्तवता यांच्याही वाङ्मयीन क्षमता आता संपल्या, असे म्हणत नव्या पिढीने नव्या शक्यता शोधायला हव्या. बदललेल्या पर्यावरणात नैतिकतेच्या व्याख्या बदलत असतील आणि वास्तवतावाद जर व्यामिश्र आशयाच्या अभिव्यक्तीला अपुरा ठरत असेल तर दोन्ही बाबतींत नव्या पिढीने नव्या शक्यता आजमावायला हव्यात. आणि त्यासाठी नेमाड्यांचे आशीर्वाद मागण्याची गरज नाही. कारण स्वत: नेमाड्यांनी त्यांच्या आधीच्या पिढीची फारशी पर्वा केल्याचा इतिहास नाही. कदाचित भालचंद्र नेमाडे यांना अभिप्रेत असा जबरदस्त कादंबरीकार त्यांना नाकारूनच

जन्माला येणार असेल, आणि त्याचीच त्यांना आस असेल. फक्त त्या नव्या कादंबरीकाराची नेमाड्यांसारखीच एकाकी, निष्ठावान आणि उग्र तपस्या करायची तयारी मात्र हवी. लोकापवादाला आणि विरोधाला भीक न घालता आपल्या भूमिकेवर ठाम राहायची मानसिकता हवी. कारण नेमाडे यांनी दशकानुदशके हे सारे अतिशय निष्ठेने केले आणि म्हणूनच मराठी साहित्याला एका वेगळ्या वळणावर नेऊन ठेवले. हे त्यांचे काम मोठेच आहे.

दुसरे म्हणजे वर विस्ताराने सांगितल्याप्रमाणे तरुणवर्गाला आत्मभानासह लिहिते करणे हे त्यांचे मराठी साहित्यक्षेत्राला फार मोठे योगदान आहे. साहित्याचे असे विकेंद्रीकरण होणे आवश्यकच होते आणि नेमाडे यांनी ते प्रभावीपणे केले आहे. (मात्र, दुर्दैवाने त्यातही अनेकजण केवळ अंधानुकरणाने ग्रस्त होऊन दुय्यम लिहीत राहिले हा भाग वेगळा.) गावोगावी असे लिहिते तरुण निर्माण करणे हे 'थोर'च म्हटले पाहिजे.

तिसरे म्हणजे जी. ए. कुलकर्णी किंवा श्याम मनोहर यांसारख्या श्रेष्ठ लेखकांनी अत्यंत अभिजात दर्जाची उत्कृष्ट साहित्यनिर्मिती करताना जो लौकिक वानप्रस्थाचा मार्ग स्वीकारला तो नेमाडे यांनी कधी अंगीकारला नाही. त्या अर्थाने जीए किंवा श्याम मनोहर यांची वाङ्मयीन गुणवत्ता वादातीत असली तरी प्रकटपणे त्यांनी साहित्यक्षेत्रावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केला नाही. किंवा त्यांनी तो मार्गच टाळला असे म्हणता येईल. उलट, भालचंद्र नेमाडे यांनी भाषणे, मुलाखती, परिषदा वगैरे मार्गांनी सातत्याने साहित्यक्षेत्राशी संपर्क ठेवला. विविध व्यासपीठांवर ते मुक्तपणे आपली मते मांडत राहिले. गंमत म्हणजे एरवी अखिल भारतीय साहित्य संमेलनाविरुद्ध बोलणारे भालचंद्र नेमाडे स्वत: युनिक फीचर्सच्या 'ई साहित्य संमेलना'चे अध्यक्ष होते. तर अशा विविध मार्गांनी नेमाडे यांनी साहित्यक्षेत्राशी सातत्याने संपर्क ठेवलेला दिसतो.

अशा तीनही प्रकारे एकूण साहित्यक्षेत्रावरचा भालचंद्र नेमाडे यांचा प्रभाव मोठा आहे. ज्ञानपीठ पुरस्कार देताना श्रेष्ठ साहित्यनिर्मितीबरोबरच याचाही विचार केला गेला असणारच.

**पाच**

अंतर्नाद मासिकातर्फे मराठीतल्या वीस श्रेष्ठ पुस्तकांची यादी करण्यात आली होती आणि त्या वीस पुस्तकांवर दीर्घ लेख छापले होते. अर्थातच त्यात 'कोसला' होतीच. अंतर्नादचे संपादक भानू काळे यांनी या वीस पुस्तकांपैकी कोणत्या पुस्तकावर तुला लिहायला आवडेल असे मला विचारताच मी क्षणार्धात 'कोसला'ची निवड केली होती आणि उत्साहात तो लेख लिहिला होता. (त्याच लेखात मी 'कोसला' आणि 'कॅचर इन द राय' या दोन कादंबऱ्यांची तुलनाही केली होती. त्या लेखावर नेमाडे यांचे कौतुक करणारे 'रा.रा....' अशा मायन्यासह प्रोत्साहनपर पत्रही आले होते.) नंतर 'हिंदू'वरदेखील प्रथम मी 'अंतर्नाद' मध्ये आणि नंतर 'ललित' मध्ये लिहिले. असे वेळोवेळी नेमाडे यांच्या पुस्तकावर लिहिताना मला एक गोष्ट जाणवली आहे. एकदा नेमाडे यांनी एका मुलाखतीत असे म्हटले होते, की मी माझ्यानंतर तरी जबरदस्त कादंबरीकार मराठीत निर्माण होईल एवढा बंदोबस्त माझ्या कादंबऱ्या लिहून करणार आहे. हे विधान मला वाटते त्यांनी 'झूल' लिहिल्यानंतर केले होते. मला जाणवत गेलेली गोष्ट अशी, की तो जबरदस्त कादंबरीकार कुठेच क्षितिजावर दिसत नसल्याने आपणच तो व्हायचे या जिद्दीनेच त्यांनी 'हिंदू'च्या महत्त्वाकांक्षी चतुष्टयाचा घाट घातला असावा. कारण मला तो जबरदस्त कादंबरीकार त्यांच्या जागीच दिसत आहे. मला वाटते, हा ज्ञानपीठ पुरस्कार त्या जबरदस्त कादंबरीकाराला मिळाला आहे.

अशा या जबरदस्त कादंबरीकाराने ज्ञानपीठ मिळाल्यावर जाहीर केले आहे, की 'हिंदू' लिहून झाल्यावर मी कादंबरीलेखन बंद करून फक्त कविता लिहिणार. मराठी कवितेच्या रसिकांना हीदेखील एक सुवार्ताच आहे. साठोत्तर कवितेत उमदेपणाने खळबळ माजवणारा हा तरुण कवी आता नव्वदोत्तर कवींच्या साथीत पुन्हा एकदा मराठी कवितेला साहित्याच्या केंद्रस्थानी आणेल असे म्हणायला हरकत नाही. बरे, या उमद्या म्हाताऱ्याचे व्यक्तिमत्त्व असे आहे, की नव्वदोत्तर कवीदेखील आनंदाने त्यांना आपल्या टोळक्यात सामील करून घेतील.

तेव्हा 'हिंदू'चे पुढचे भाग लवकरात लवकर लिहून होवोत आणि त्यानंतर 'मेलडी', 'देखणी'नंतरच्या अनेक उत्तमोत्तम कविता आपल्याला वाचायला मिळोत यासाठी या उग्र, आदिम, श्रेष्ठ लेखकाला किमान शंभर वर्षांचे लिहिते आयुष्य लाभो, हीच इच्छा आपल्यासारख्या रसिकांच्या मनात असल्यास नवल नाही.

◆


**संजय भास्कर जोशी**
भ्रमणध्वनी : ९८२२००३४११
sanjaybhaskarj@gmail.com





हरी नरके

**मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने शासनाला आपला अहवाल सादर केला. यात मराठीचे वय दोन हजार वर्षांहून अधिक असल्याचे अनेक पुरावे सादर करण्यात आले आहेत. हा प्रस्ताव साहित्य अकादमीने स्वीकारला असून तशी शिफारस केंद्र सरकारकडे केली आहे. त्यामुळे मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.**



# होय, मराठी अभिजातच..

दहा वर्षांपूर्वी केंद्र सरकारने तमिळ भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला. त्यानंतर संस्कृत, तेलुगू, कन्नड, मल्याळम आणि उडिया या भाषांनी हा दर्जा पटकावला.

महाराष्ट्र शासनाच्या प्रा. रंगनाथ पठारे समितीने जुलै २०१३ मध्ये मराठीच्या प्राचीनत्वाचे अनेक पुरावे मराठी अहवालातून केंद्र शासनाला सादर केले. या अहवालाचा इंग्रजी अनुवादही समितीने नोव्हेंबर २०१३ मध्ये ग्रंथरूपाने सादर केला. आता चार वर्षांच्या आपल्या प्रयत्नांना यश आले आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा आपला प्रस्ताव साहित्य अकादमीच्या भाषातज्ज्ञ समितीने स्वीकारला असून तशी शिफारस त्यांनी केंद्र सरकारकडे केली आहे. त्यामुळे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

नामदेव, ज्ञानेश्वर, तुकाराम, महात्मा फुले, ताराबाई शिंदे, सावित्रीबाई फुले, आगरकर, टिळक, रानडे, लोकहितवादी, बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे, साने गुरुजी, खांडेकर, लक्ष्मीबाई टिळक, मालती बेडेकर, गडकरी, अत्रे, चिं. वि. जोशी, उद्धव शेळके, नारायण सुर्वे, शिवाजी सावंत, पु.ल., विंदा, कुसुमाग्रज, नामदेव ढसाळ, बाबूराव बागुल, विजय तेंडुलकर, नेमाडे आदींच्या मराठीचं श्रेष्ठत्व स्वयंभू आहे.

या विश्वात खूप जैवविविधता आहे. माणूस हा विचारशील प्राणी आहे. अर्थातच प्रत्येक माणूस आपल्या भाषेतून विचार करतो. भाषा ही माणसाची अस्मिता नि एक प्रकारचं ओळखपत्र असतं. आपापल्या मायबोलीचा प्रत्येकाला अभिमान असतो. माणूस भाषेच्या माध्यमातून ज्ञाननिर्मिती करतो. साहित्य, विचार, तत्त्वज्ञान यांच्याद्वारे संस्कृतीची जनुकं एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे वाहून नेण्याचं

मोलाचं काम होत असतं. संशोधक असं सांगतात, की लक्षावधी वर्षांच्या मानवी प्रवासात सुमारे ७० हजार वर्षांपूर्वी माणसाने भाषा पहिल्यांदा जन्माला घातली. पुढे जगभरात हजारो भाषा निर्माण झाल्या. आज जगभरात प्रचंड मोठी भाषिक विविधता असून तिचं जतन करण्याची गरज आहे. जगात आज छोट्या-मोठ्या २० हजार भाषा असून त्यातल्या मोठ्या प्रमाणात बोलल्या जाणाऱ्या भाषांची संख्या सुमारे २००० आहे. त्यातल्या ३० टक्के भाषा एकट्या भारतात आहेत. १९०७ साली ग्रिअर्सनच्या नेतृत्वाखाली पहिलं भारतीय भाषा सर्वेक्षण झालं. २०१३ साली डॉ. गणेश देवी यांच्या पुढाकाराने नवं सर्वेक्षण झालेलं आहे.

केंद्र सरकारने अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी चार निकष तयार केलेले आहेत-

१. भाषेचे वय १५०० ते २५०० वर्षे असावे.

२. त्या भाषेत श्रेष्ठ दर्जाचे साहित्य असावे.

३. भाषा स्वयंभू असावी.

४. भाषेने स्वत:च्या मूळ रूपांपासून आजपर्यंत केलेल्या प्रवासात अंतर अथवा खंडितता आली असेल तरीही भाषेची चौकट कायम असावी.

मराठी भाषा हे सगळे निकष पूर्ण करते असे आमच्या अहवालात आम्ही दाखवून दिलेले आहे व त्यामुळे आता मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या दर्जामुळे मराठी या ज्ञानभाषेची श्रीमंती आणि जीवनाच्या सर्व अंगांना कवेत घेण्याची समृद्ध क्षमता यांना उजाळा मिळेल. अभिजात भाषा म्हणजे काय याबद्दलचे कुतूहल या निमित्ताने जागे होत आहे. अभिजनांची भाषा म्हणजे अभिजात भाषा, असा अर्थ सर्वदूर पोचलेला आहे. उच्चकुलीन लोक जी बोलतात तीच भाषा अभिजात असते, अशी समजूत आजही आपल्या समाजात दृढ झालेली आहे. खुद्द ज्ञानेश्वरांनीच म्हटले आहे, की तरि आतां पवित्र तयाचेचि कुळ! अभिजात्य तेचि निर्मळ!

अभिजात दर्जाच्या निमित्ताने आपल्या या समजुतीला मोठा तडा जाणार आहे. अभिजात म्हणजे अभिजनांची भाषा नव्हे, तर श्रेष्ठ साहित्य ज्या भाषेत आहे अशी लोकभाषा, ही नवी धारणा समाजात रुजविण्याची धडपड आमच्या या प्रयत्नांमागे आहे. प्रा. रंगनाथ पठारे समितीच्या सुमारे ५०० पृष्ठांच्या अहवालात ही बाब पुराव्यानिशी सिद्ध करून दाखवलेली आहे आणि देशविदेशांतील भाषातज्ज्ञांनी त्यावर शिक्कामोर्तब केलेले आहे.

मराठीला हा दर्जा मिळावा यासाठीच्या चर्चेला सर्वप्रथम सुरुवात झाली ती 'लोकराज्य'मधील २०११च्या दिवाळी अंकातील माझ्या लेखाने. तोवर दबक्या आवाजात मराठी भाषा हे निकष पूर्ण करीत नसल्याने तिला हा दर्जा मिळूच शकत नाही अशी कुजबूज सुरू होती. आजही काही ढुड्ढाचार्य तसेच म्हणत आहेत. हा दर्जा मिळाल्याने काय साध्य होईल, असे आम्हाला विचारले जाते. त्याचं उत्तर असं आहे- ज्ञानभाषा मराठीची श्रेष्ठता आणि अफलातून सर्जनशीलता यावर मान्यतेची मोहोर उमटेल. पादलिप्त, हाल, गुणाढ्य, वाक्पतिराजा, विमलसुरी, प्रवरसेन, धनपाल, पुष्पदंत, हरिभद्र, उद्योतन, कौतुहल, राजशेखर, चक्रधर, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, फुले, आंबेडकर, आगरकर, टिळक, रानडे अण्णाभाऊ साठे, साने गुरुजी, बहिणाबाई, राजवाडे, केतकर, जी.ए., सुर्वे, भाऊ पाध्ये, दुर्गाबाई, माडगूळकर, खांडेकर, कुसुमाग्रज, विंदा, तेंडुलकर, उद्धव शेळके, शिवाजी सावंत, नेमाडे, चित्रे, कोलटकर, ढसाळ, एलकुंचवार आदींची दोन ते अडीच हजार वर्षांची मायमराठी 'अमृतातेहि पैजा' जिंकणारी आहे अशी ग्वाही जगभर फिरेल. मराठी शिक्षणाला ऊर्जा मिळेल. मराठी ग्रंथविश्व गतिमान होईल, अर्थपूर्ण होईल. मराठीच्या ५२ बोलींच्या अभ्यासासाठी विद्यार्थी, शिक्षक, संस्था, विद्यापीठे आदींना भरीव मदत करता यावी यासाठी केंद्राकडून राज्याला ५०० कोटींचे दरवर्षी अनुदान मिळेल. इतर भाषांच्या आक्रमण

**अभिजात भाषा म्हणजे काय याबद्दलचे कुतूहल या निमित्ताने जागे होत आहे. अभिजनांची भाषा म्हणजे अभिजात भाषा, असा अर्थ सर्वदूर पोचलेला आहे. उच्चकुलीन लोक जी बोलतात तीच भाषा अभिजात असते, अशी समजूत आजही आपल्या समाजात दृढ झालेली आहे. अभिजात दर्जाच्या निमित्ताने आपल्या या समजुतीला मोठा तडा जाणार आहे. अभिजात म्हणजे अभिजनांची भाषा नव्हे, तर श्रेष्ठ साहित्य ज्या भाषेत आहे अशी लोकभाषा, ही नवी धारणा समाजात रुजविण्याची धडपड आमच्या या प्रयत्नांमागे आहे.**

आणि अतिक्रमणाने मरगळलेली आमची युवा पिढी मराठीचा न्यूनगंड झटकून मराठीच्या अस्मितेची पताका खांद्यावर घेईल. इतर अनेक बाबींना चालना मिळेल. मराठीचे गोमटे व्हावे, हा ध्येयवाद या सगळ्या धडपडीमागे आहे.

मराठी ही जगातील दहाव्या क्रमांकाची भाषा आहे. आपले कोशवाङ्‌मय शिवरायांच्या राजभाषा व्यवहार कोशापासून सुरू होते. श्री. व्यं. केतकर, महादेवशास्त्री जोशी, तर्कतीर्थ, लक्ष्मणशास्त्री जोशी, वाडेकर, गर्गे आदींनी बलदंड काम करून आज कोशवाङ्‌मयात मराठीला जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर नेऊन ठेवले आहे. ४०० ते ५०० दिवाळी अंक मराठीत निघतात. देशातील २५ टक्के ग्रंथालये एकट्या महाराष्ट्रात आहेत. बारा कोटी मराठी लेकरे जगातील शंभर देशांत काम करतात. देशातील सर्वांत समृद्ध वैचारिक वाङ्‌मय, विनोदी साहित्य, आधुनिक नाटक, दर्जेदार चित्रपट आणि संशोधन यात आपण अग्रेसर आहोत. मराठीत आजवर एक लाखापेक्षा अधिक ग्रंथ प्रकाशित झाले असून दरवर्षी त्यात दोन ते अडीच हजारांची भर पडत असते. मराठी भाषकांची दरवर्षी सुमारे अडीचशे साहित्य संमेलने होतात.

जगातील कथासाहित्याचा जन्म भारतात झाला. बृहत्कथेचा लेखक गुणाढ्य आपल्या वाशिमचा. वत्स आणि गुल्मक हे त्याचे मामा. त्याने दोन हजार वर्षांपूर्वी पंचतंत्र, वेताळपंचविशी, सिंहासनबत्तिशी असे विपुल कथालेखन केले. ते पैशाची या लोकभाषेत होते. अकराव्या शतकात सोमदेवाने ते संस्कृतात भाषांतरित केले. महाभारतात अनेक मराठी शब्द असल्याचे तज्ज्ञांनी दाखवून दिले आहे.

आमच्या संशोधनाचे मुख्यालय भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था हे होते. संस्थेतील हजारो प्राचीन हस्तलिखितांपैकी किमान ८५ हस्तलिखिते यासाठीचा पुरावा म्हणून महत्त्वाची ठरलीत. मराठीतला पहिला ग्रंथ 'हाल सातवाहनाचा गाथा सप्तशती' हा आहे. तो गोदावरीच्या परिसरात पैठणच्या आसपास लिहिला गेलाय.

विदर्भ, खानदेश, तापी, गोदावरी, कोकण, अश्मक आणि कुंतल इथल्या लोकांच्या प्राचीन बोलींनी मराठी बनलीय. ती संस्कृतपासून जन्माला आलेली नसून ती संस्कृतपेक्षा जुनी आहे. नात्याने ती संस्कृतची मुलगी नसून मावशी आहे. आजची मराठी वैभवशाली बनवण्यात इतर प्राकृत भाषा- पैशाची, शौरसेनी, मागधी, अर्धमागधी, पाली, तसेच दक्षिणेकडच्या आपल्या शेजारी भाषा आणि पर्शियनसोबतच संस्कृतनेही हातभार लावलेला आहे. आम्ही त्याबद्दल कृतज्ञच असले पाहिजे.

आंबा पाडाला आला असे आपण म्हणतो. आपली भाषा पाअड म्हणजेच प्राकृत, महाराष्ट्री प्राकृत आहे. जी खळाळत्या पाण्यासारखी असते, जी लोकजीवनात पदोपदी दिसते, बोलली जाते ती भाषा.

महाराष्ट्री प्राकृत, अपभ्रंश आणि मराठी या तीन वेगळ्या भाषा असल्याचा समज प्रचलित आहे. ल. रा. पांगारकरांनी १९३२ साली तो खोडून काढला. या तीन वेगळ्या भाषा नसून आपल्या मराठीची ती आद्यकाळ, मध्यकाळ आणि अर्वाचीन काळातील तीन नावे आहेत. महाकवी दंडींनी आपली भाषा महाराष्ट्री प्राकृत असल्याचे नमूद केलेच आहे. उच्चारप्रक्रिया, प्रत्ययप्रक्रिया व शब्दसिद्धी ही आपल्या भाषेची तीन प्राणभूत अंगे मराठीने अपभ्रंशकडून घेतल्याचे सर्वमान्य आहे. डॉ. ए. एम. घाटगे या जागतिक कीर्तीच्या भाषातज्ज्ञांनी





महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेचा
अरविंद वामन कुलकर्णी
समीक्षा पुरस्कार प्राप्त

समीक्षेचा अंत:स्वर

- व. मि. कुलकर्णी

पृ.२३४/ किंमत २०० रु/ पद्मगंधा प्रकाशन, पुणे

हरिभद्राच्या ‘समरादित्याची कथा’तील महाराष्ट्री अभिजात असल्याचे प्राकृत शब्दकोशाच्या प्रस्तावनेत दाखवून दिलेले आहे. नोबेलविजेत्या गाब्रियल गार्शिया मार्केझने वापरलेला जादुई वास्तववाद १२०० वर्षांपूर्वी मराठीत हरिभद्राने आणलेला होता.

मराठीच्या दोन ते अडीच हजार वर्षे वयाचे अनेक पुरावे आहेत. जुन्नरजवळच्या नाणेघाटातील ब्राह्मी लिपीतील दोन हजार दोनशे वर्षांहून जुन्या शिलालेखात महारठीनो असा उल्लेख मिळतो. पाली भाषेतील बौद्ध धर्मग्रंथ विनयपिटकात आणि श्रीलंकेतील सिंहली दीपवंश व महावंशमध्ये महारठ्ठची नोंद आहे. गाथा सप्तशतीचे लेखन दोन हजार वर्षांपूर्वी झालेले आहे. संपादक स. आ. जोगळेकरांनी या ग्रंथाला लिहिलेली ४६४ पृष्ठांची प्रस्तावना जिज्ञासूंनी अवश्य पाहावी (पद्मगंधा प्रकाशन, पुणे). तमिळमधील संगम साहित्य २३०० ते २६०० वर्षांचे आहे. त्यात मराठी गवंड्यांचा उल्लेख मिळतो. वररुचीच्या ‘प्राकृत प्रकाश’ या व्याकरणग्रंथात तो सर्व प्राकृत भाषांचे व्याकरण सांगून झाल्यानंतर ‘शेषं महाराष्ट्रीवत’ असा नियम देतो. हेमचंद्राची देशी नाममाला प्राकृत व्याकरणाचा महत्त्वपूर्ण पुरावा सादर करते.

धर्मपंडितांना यज्ञमंडपात प्राकृतात बोलायला मनाई करणारा आदेश होता, असे राजारामशास्त्री भागवत यांनी दाखवून दिले आहे. संस्कृतचा दरारा असतानाही कालिदास, शूद्रक आणि इतर अनेक संस्कृत नाटककारांनी आपल्या पात्रांच्या तोंडी पद्यभाग महाराष्ट्री प्राकृतात दिलेला आहे. पतंजली, कौटिल्य, टॉलेमी, वराहमिहीर, ह्युएन त्संग, अल्बेरूनी आदींचे पुरावे या बाबतीत महत्त्वाचे आहेत. संत एकनाथांनी मराठीत लिहिले. तिला ते प्राकृत म्हणतात. ‘संस्कृतवाणी देवे केली, मग प्राकृत काय चोरापासून झाली?’ असा संतप्त सवाल ते विचारतात. महाराष्ट्री स्वतंत्र व संस्कृतइतकीच श्रेष्ठ असल्याचा एकनाथांचा दावा सर्वथैव उचित ठरतो. १८६३ साली गोडबोले यांनी मराठीचा कोश तयार केला आणि त्याला ‘महाराष्ट्र भाषेचा कोश’ असं म्हटलं. मायकेल विट्झेल यांच्या ‘ट्रेसिंग दि वैदिक डायलेक्ट’च्या आणि उत्खननातील पुराव्यांच्या आधारे पुरातत्त्वशास्त्रज्ञ डॉ. मधुकर ढवळीकर यांनी महाराष्ट्रीचे वय संस्कृतपेक्षा जास्त असल्याचे सिद्ध केले आहे. राजारामशास्त्री भागवत, ज्ञानकोशकार केतकर, पांगारकर, मिराशी, ग्रिअर्सन, स्टेने कौनो, झ्युल ब्लोक, फेल्डहाऊस, तुळपुळे, ब्रह्मानंद देशपांडे, अशोक केळकर, गणेश देवी, अरुण जाखडे आदींच्या मौलिक संशोधनाच्या नव्या प्रकाशात मराठीचे प्रमाणक परिवर्तन (पॅराडाइम शिफ्ट) या अभिजात दर्जामुळे होणार आहे.

प्रत्येक मराठी घरात सांगितली जाणारी ‘चिऊताई चिऊताई, दार उघड’ ही चिमणी-कावळ्याची गोष्ट सर्वप्रथम ‘लीळाचरित्रा’त आलेली असली तरी ती लोकजीवनात त्याआधी किमान हजार-बाराशे वर्षे प्रचलित होती. आजवर मराठीचे वय चोरले गेले आहे. ज्ञानेश्वरी आणि लीळाचरित्रासारखे जागतिक साहित्यातले महत्त्वाचे ग्रंथ ज्या मराठीत ७०० ते ८०० वर्षांपूर्वी लिहिले गेले तिचे वय ८०० वर्षे आहे असे म्हणणे म्हणजे नुकतीच जन्माला आलेली बालभाषा लगेच श्रेष्ठ ग्रंथ प्रसवत होती असे म्हणण्यासारखे आहे. हे म्हणणे पटणारे नाही.

मराठी भाषेची आणि साहित्याची श्रेष्ठता स्वयंसिद्ध आहे. आता गरज आहे ती मराठी माणसांनी आपला ऐतिहासिक न्यूनगंड आणि भाषिक करंटेपणा झटकून मराठीचे लॉबिंग आणि मार्केटिंग करण्याची. बारा कोटी लेकरे एकमुखाने मराठीच्या बाजूने बोलू लागली तर मराठीला जागतिक भाषा होण्यापासून जगातली कोणतीही शक्ती रोखू शकणार नाही. अर्थात मराठी माणसांची अभिरुची इतकी संपन्न आहे की मराठीला वेगळ्या विरोधकांची गरजच नाही. शिक्षणासाठी प्रमाण मराठी आवश्यक असली तरी कोणतीही मराठी बोली ही अशुद्ध नाही, हलकी नाही. बोलींची विविधता हे आपले वैभव आहे. कोणतीही भाषा अशुद्ध कशी असेल? सातासमुद्रापलीकडे १०० देशांमध्ये जिची पताका फडकत आहे अशा धर्मभाषा, राजभाषा, ज्ञानभाषा मराठीबाबत आपण आग्रही राहायला हवे.

आपण कोणत्याही भाषेचा द्वेष किंवा आकस बाळगायला नको, पण आपल्या अभिजात मराठीचा आग्रह मात्र आपण धरायलाच पाहिजे. अभिजात दर्जामुळे मराठीला सन्मानाचे दिवस येतील, ग्रंथविश्व गतिमान होईल आणि मराठी शाळा बाळसे धरू लागतील असा मला विश्वास वाटतो.

◆

**प्रा. हरी नरके**
भ्रमणध्वनी : ९४२१०८१२१४
harinarke@gmail.com

(प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखालील अभिजात मराठी भाषा समितीचे प्रा. हरी नरके हे समन्वयक असून, डॉ. श्रीकांत बहुलकर, डॉ. मैत्रेयी देशपांडे, डॉ. कल्याण काळे, प्रा. आनंद उबाळे, डॉ. मधुकर वाकोडे आणि सतीश काळसेकर आदी सदस्य आहेत.)

**मराठी कवितेच्या प्रवाहात आज अनेक समकालीन कवी-कवयित्री आपल्या अनुभूतीची ओंजळ रिती करून हा प्रवाह अधिक खोल व व्याप्त करत आहेत. जीवनाच्या व्यामिश्रतेला सामोरे जात जगण्याच्या मुळांना, पर्यायाने व्यापक मानवी जाणिवांना भिडण्याचा प्रयत्न ते करताना दिसत आहेत. अशा काही आश्वासक समकालीन कवी-कवयित्रींनी स्वतःच्याच कवितेवर केलेले भाष्य व जाणकारांनी त्यांच्या कवितेचा घेतलेला परामर्श या मालिकेतून मांडत आहोत.**
**या अंकात कवी श्रीधर नांदेडकर.**

आपलं सगळ्यांचं रुजणं, उगवणं, वाढणं, कोमेजणं आपल्या वाट्याला आलेल्या जमिनीवर मुख्यतः अवलंबून असतं. कलेच्या जगात माझ्या वाट्याला भाषेची जमीन आली. भाषेत उगवणाऱ्या सगळ्या कलावंतांसाठी भाषा आईची भूमिका पार पाडते. रुजणं, उगवणं, वाढणं आणि कोमेजून जाण्याच्या प्रसंगी सांभाळणं हे भाषा आपल्यासाठी आजन्म करते.

कवी म्हणून माझ्या वाट्याला सातशे वर्षांची मशागत झालेली जमीन आलीय. माझं भाषेत उगवणं मी गवताच्या पात्यासारखं मानतो. अगदी स्वाभाविकपणे हे घडलं.

तुमच्या सर्जनशीलतेचा प्रवास तुमच्या बालपणाशी नाळेसारखाच जोडलेला असतो. भासमय, आभासी जगाचं वारं माझ्या बालपणावर फिरलं नाही हे सुदैव.

बालपणाच्या रम्य काळात मला गोष्टी ऐकण्याचं वेड लागलं ते आईच्या रसाळ निवेदनशैलीमुळे. मला जातं न् ओवी कळाली, गाणं न् त्यातली लय कळाली ती आईमुळे. माझे आई-वडील फारसे शिकलेले नव्हते, तरीही त्यांनी मला वाचनाची गोडी लावली.

वडिलांची बदली नेहमी एका धरणावरून दुसऱ्या धरणावर व्हायची. एका कामगाराच्या जीवनातील अपार कष्ट त्यांच्या वाट्याला आले. त्यांचं जगणं एका आत्ममग्न, निःस्वार्थी वारकऱ्याचं जगणं होतं. आम्ही ज्या ज्या वस्त्यांवर राहिलो तिथल्या घरांमधून जाड दोरी असलेल्या किणकिणत्या आवाजाची एक टाळ आम्ही अलंकारासारखी मिरवली. आमचं बालपण टाळ-मृदंग आणि भजनाच्या आर्त स्वरांनी भारलेलं होतं. म्हणजे लयीचा भोवरा माझ्या भोवती असा सतत गरगरत होता. पुढे हळूहळू शब्दांचे नाद जाणवायला लागले. अजून 'अर्थाचा' स्पर्श झाला नव्हता. तो पुढे झाला.

सुरुवात अगदी स्पष्ट आठवते. पहिल्या वर्गाचा निकाल जाहीर होण्याच्या आत दुसरीचं नवं कोरं मराठीचं पुस्तक पाहण्याची फार उत्सुकता असायची. त्यातल्या गोष्टी, रंगीत चित्रं, कविता मनाला भुरळ पाडायच्या. मला बालपणात पुस्तकांच्या जगाशी नातं जोडण्याची अमूल्य संधी मिळाली. पुढच्या लांबवरच्या प्रवासाची ही न संपणारी शिदोरी होती.

तुम्हाला कोणते शिक्षक लाभले आणि तुम्ही कोणत्या मित्रांच्या सहवासात एक मोठा कालखंड घालवला याचा परिणाम तुमच्या सर्जनशील जडणघडणीवर होणं अगदी स्वाभाविक असतं.


सुदैवाने मला चांगले शिक्षक लाभले, चांगले मित्र मिळाले आणि आजवरचा लेखनप्रवास मी त्यांचा सहवासामुळेच करू शकलो. मी नेहमी एका समानधर्मी मित्राचा शोध घेत राहिलो. काळाच्या ओघात काही निसटले, काहींचा ऋणानुबंध आजपर्यंत जपता आला. जेव्हा कुणीच नव्हतं अशा एका मोठ्या काळाच्या तुकड्यात मी पुस्तकांशी घट्ट मैत्री केली.

महाविद्यालयात कथाकथन, नाटक, वक्तृत्व, वादविवाद अशा सगळ्या स्पर्धांत मी भाग घेत राहिलो; परंतु अजूनही कवितेने मला खुणावलं नव्हतं. एका काव्यवाचन स्पर्धेत मी मित्राची कविता वाचली. त्या कवितेला बक्षीस मिळालं. मला खूप अपराधी वाटलं. असं वाटलं की आपल्याला स्वतःचा 'शब्द' सापडला पाहिजे. एका छोट्याशा वहीत १९८८ मधे मी पाहिली कविता लिहिली. प्रा. मधुकर राहेगावकर यांना त्या झपाटलेल्या विद्यार्थिदशेतल्या कविता दाखवल्यावर त्यांनी काही कवितांवर ✓(बरोबर) अशा छोट्या खुणा केल्या. त्या कविता बाळबोध होत्या हे तर उघडच होतं. अर्थात हे आज कळतं, तेव्हा कळत नव्हतं. तेव्हा मी त्या खुणांचा अर्थ 'तू कविता करतो आहेस ही जीवनातील अगदी बरोबर गोष्ट निवडली आहेस' असा घेतला. मी स्वतःच्या अनुभवांकडे सतत पाहत होतो. मी माझ्या मनोवस्थांना तुटलेल्या पंखाच्या पक्ष्यासारखं शब्दांत पकडू पाहत होतो. मी स्वतःचा शब्द शोधत होतो.

औरंगाबादला विद्यापीठात शिकण्यासाठी आल्यावर दिलीप लाठी, मंगेश बनसोड, संजय वरकड, भास्कर बलखंडे, मनोज बोरगावकर, सिद्धार्थ भगत असा आमचा वाङ्मयप्रेमी मित्रांचा गट होता. दिलीप लाठीने मला दलित साहित्याशी ओळख करून दिली. आम्ही सगळे त्या वेळी नामदेव ढसाळ, भालचंद्र नेमाडे, मनोहर ओक, अरुण कोलटकर, दिलीप चित्रे, चंद्रकांत पाटील आणि सतीश काळसेकर यांच्या कवितांचं सामूहिक वाचन

# मी कवितेच्या डोळ्यांत पाहतो

## श्रीधर नांदेडकर





**श्रीधर नांदेडकर हे समकालीन महत्त्वाचे कवी असून त्यांचे 'सुफी प्रार्थनांच्या किनाऱ्यांवरून' आणि 'परतीचा रस्ता नाहीय' हे दोन कवितासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत.**

करायचो. हे रात्र-रात्र चालायचं. कविता अशी एकाच वेळी गर्दीला कवेत घेत आणि एकटेपणाला धीराने उभं राहण्याचं बळ देते. असा हा भावोत्कट प्रवास माझ्या कवितेला हळूहळू पुढे नेत राहिला.

विद्यापीठात गुरुवर्य रवींद्र किंबहुने एम. ए.च्या पहिल्या वर्षी 'रॉबर्ट ब्राउनिंग'ची कविता समजावून सांगायचे. देहभान हरपून मी ऐकत राहायचो. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने फार प्रभावित झालो होतो. त्यांनीही मला लगेच स्वीकारलं. त्यांनी मला अरुण कोलटकरच्या कवितेचं जग उलगडून दाखवलं. असंख्य पुस्तकांची महती सांगितली. ते नेहमी म्हणायचे, सगळे थोर कवी आपल्या कवितेत खूप रिकामा अवकाश ठेवतात. आपल्या कल्पनाशक्तीने वाचकाने हा अवकाश भरायचा असतो. कविता वाचणं ही एक सर्जनशील कृती ठरते ती यामुळेच.

कवितेला बौद्धिकता फारशी पेलवत नाही. चांगल्या कवितेचा पाया 'भावना' आहे असं सांगणारे बशर नवाज, प्रत्येक वाचक एक दुसरा कवी असतो असं सांगणारा ऑक्तोवियो पाझ, प्रत्येक कलाकृती एक 'पासपोर्ट' असते; ती तुम्हाला एका दुसऱ्या जगात प्रवेश करण्याची अनुमती देते असं सांगणारे विजयकुमार, अशा असंख्य भल्या लेखक-कवींनी माझी कवितेची समज वाढवली आहे. या सर्वांनी मला माझ्या कवितेकडे जाणारी पाऊलवाट शोधण्यासाठी खुणेचं निशाण दाखवलं आहे.

कवितेविषयीची धारणा ही काळाच्या ओघात बदलते; परंतु मानवी जीवन आणि विश्वाच्या संगतीचा सखोल वेध घेणं, सत्याचा पाठलाग करणं आणि भोवताल व्यापून असणाऱ्या भ्रष्टतेचं दर्शन घडवणं हे कवी म्हणून मी केलंच पाहिजे अशी माझी काव्यविषयक धारणा आहे.

आपल्या काव्यप्रवासाला समृद्ध करणारं एकच एक सूत्र असू शकत नाही, असं सांगून गुरुवर्य चंद्रकांत पाटील यांनी माझ्या वाङ्मयीन आकलनाच्या कक्षा विस्तारित करण्याचे असंख्य पर्याय माझ्यासमोर ठेवले. जागतिक स्तरावर विविध भाषांमधील श्रेष्ठ कवींची कविता त्यांनी मला वाचायला दिली. जाणिवेच्या कक्षा रुंदावण्यासाठी याचा मला फार लाभ झाला.

या सगळ्या पार्श्वभूमीवर मी गवताच्या पात्यासारखा उगवलो. भोवतालाचं ऊन जसजसं प्रखर होत जाईल तसं हे पातं काळाच्या एका तुकड्यावर करपून, कोमेजून जाईल आणि नष्ट होईल याची नम्र जाणीवदेखील मला कवितेनेच करून दिली आहे.

कवितेशी माझं नातं काय आहे, मी कविता का वाचतो, मला कविता का सुचते, अशा प्रश्नांचा अदमास घेताना हे नातं एका समानधर्मी मित्राचं आहे, जो आपल्या अंतरंगातील सगळ्या कोलाहलाचा साक्षीदार असतो असं जाणवतं.

मी कविता वाचतो तेव्हा माझ्या जगासारखंच एक प्रतिजग मी शोधू पाहतो. स्वतःचा शोध लागण्याचं रहस्य कवितेच्या जगात दडलेलं आहे, अशा विश्वासाने मी कवितेचा वेध घेतो.

या जगात सुकून गेलेली नदी त्या पलीकडच्या जगात खळखळून वाहायला लागावी म्हणून मी कवितेच्या जादूचा पाठलाग करतो

माझ्या जळत्या स्वप्नांवर धुडुप्प करून घोंगडी झाकणारी एक व्यक्ती सतत साद घालते आणि कवितेच्या जगात जाऊन मी डोळ्यातलं पाणी पुसतो.

कवितेत कलावंताने कोरलेला एक दगडी डोळा दिसतो आणि दृश्यांची एक न संपणारी माळ नजरेसमोरून सरकत राहते. त्या दृश्यांच्या मालिकेत माझी हरवलेली

माणसं गवसतील म्हणून मी आर्ततेने कवितेच्या डोळ्यांत पाहतो.

*जन्माचा दूख धरते*
*दुःखाची धामीण*
*मग जन्माला येतं*
*कवितेचं करुण संगीत*

अशा ओळी लिहिताना दुःखाचा पुनर्जन्माकडे करुणेने पाहण्याचा एक आदिम वेडसरपणा जपण्यासाठी कवितेच्या तापलेल्या भूमीवर मी अनवाणी चालत राहतो.

पाचवीला पुजल्यासारखे निराशेचे दिवस पुन्हा पुन्हा झडप घालतात, अस्वस्थ करतात. मी शपथेवर सांगतो, मी जगण्याच्या आगीतून जीव वाचवून पळतो आणि कवितेच्या विहिरीत एक मासा होऊन भिरभिरतो.

एखादी कविता आकार घेत असते तेव्हा अबोध मनात रॉबर्ट फ्रॉस्टचं वाक्य फेर धरत असेल, की लिहिताना कवीच्या डोळ्यांत पाणी आलं नसेल तर वाचताना वाचकाच्या डोळ्यांत पाणी येणार नाही. कविता फुटून बाहेर पडते तेव्हा ती माझ्या व्यक्तित्वाचा अंश घेऊन येते. पण माझी अशी श्रद्धा आहे, की आपल्याच नाही तर अनेक भाषांच्या नद्यांमधलं ओंजळभर पाणी रुजण्या-उगवण्यादरम्यान आपला खारीचा वाटा उचलत असतं तेव्हा एक कविता मातीतून तरारून कोंबासारखी वर येते आणि सूर्याच्या किरणांनी झळाळून निघते.

नात्यांचा कोलाहल, सगळ्या दिशांनी बंदुकीच्या गोळ्या सुटलेल्या असताना जीवनेच्छा जपणारी शक्ती, शोषितांच्या दुःखाचा सहप्रवासी होण्यासाठी करुणेचं पाणी ओंजळीत घेऊन धावत राहणं, आपल्यातल्या दंभाच्या ठिकऱ्या उडवणं, गमावलेल्या माणसांसाठी करुणा भाकणं, ज्ञानदेवाच्या समाधीचा मूक साक्षीदार होणं, हे माझ्या कवितेतून येतं तेव्हा मी एका मोठ्या परंपरेच्या महामार्गावर चालणाऱ्या दिंडीतला एक सामान्य यात्रिक आहे याचं भान सुटू न देण्याचा आटोकाट प्रयत्न करतो.

मी हजारो कुटुंबांना स्थलांतरित होताना पाहिलं आहे. अनेक गावांना आपलं सर्वस्व पाण्याला सोपवावं लागलेल्या दुर्दैवी क्षणांचा मी कोवळ्या वयातला साक्षीदार राहिलो आहे. मी अनेक नद्यांच्या काठावरून भटकंती केलेली आहे. म्हणून माझ्या कवितेत स्थलांतराची, विस्थापनाची वेदना व्यक्त होत राहते. नदीकाठी मोडलेल्या खोप्यांची, विस्कटलेल्या निष्पाप संसारांची, दूर गेलेल्या माणसांची, पाण्यात बुडालेल्या घरांची दृश्यं माझ्या कवितेत घर करून बसतात.

एखाद्या कवितेचं बीज आपल्या मनोभूमीत पडतं आणि कवितेचा जन्म होतो, या संपूर्ण प्रक्रियेची अद्‌भुत अनुभूती माझ्या पुन्हा पुन्हा प्रत्ययाला येते. कवितेचा हा जादुई रस्ता तुम्हाला परतीचा रस्ताच शिल्लक ठेवत नाही. तुम्ही कवितेच्या म्हणजेच दुःखाने होरपळलेल्या माणसांच्या जंगलात कायमचे हरवून जाता. तिथून परत न येण्याची शपथ तुम्हाला कवितेनेच घातलेली असते. म्हणून तुमच्या कवितासंग्रहाला अपरिहार्यपणे शीर्षक असतं- 'परतीचा रस्ता नाहीय.'

मी धरणावर होतो तेव्हा आमच्या कामगारांच्या चाळीत माजिद मामूंचं गरीब कुटुंब आमच्या शेजारीच होतं. ते कारकून होते. त्यांनी माझ्याकडून चौथ्या इयत्तेत असताना शिष्यवृत्तीचा अभ्यास करून घेतला होता. मला त्या वेळी शिष्यवृत्ती मिळाली. वडिलांनी माजिद मामूंना विचारलं, की तुम्हाला फी किती देऊ? तर ते म्हणाले, पैसे के लिए नहीं पढ़ाया बच्चेको। तुम हमारे दोस्त हो। पुढे माजिद मामूंची बदली दुसऱ्या धरणावर झाली, तेव्हा जाताना वडिलांनी त्यांना भेट म्हणून एक बकरीचं पिल्लू घेऊन दिलं.

ही बकरी हुंदडत हुंदडत मर्ढेकरांच्या कवितेत गेली आणि तिथून उसळी घेऊन ती माझ्या कवितेत आली. कविता असा दशकांचा आणि शतकांचा प्रवास करून हाती लागते. या हाती लागलेल्या कवितेच्या गळ्यातली दोरी मी काढून घेतो. तिला तुम्हा सगळ्यांकडे सुपूर्त करतो. तुम्ही तिला सांभाळाल असा मला विश्वास वाटतो. या विश्वासावरच कवी आणि कविता जिवंत राहते.

◆

**श्रीधर नांदेडकर**
भ्रमणध्वनी : ९४२३२३३६३१

प्रभा गणोरकर

# श्रीधर नांदेडकरांची कविता
# आत्मपिडेकडून सर्वव्यापी करुणेकडे...

श्रीधर नांदेडकर यांची पहिली कविता १९८८ साली प्रकाशित झाली. त्यांचा पहिला संग्रह २००५ साली प्रकाशित झाला आणि दुसरा संग्रह २०१४ साली प्रकाशित झाला. कविता लिहिण्याचा आणि त्या पुस्तकरूपाने वाचकांसमोर येण्याचा हा वेग त्यांच्या काव्यवृत्तीवरही प्रकाश टाकणारा आहे असे मला वाटते.

'शोधणं/ स्वतःची वाट स्वतःचा अर्थ/ अक्षरांच्या गूढ वळणदार चक्रव्यूहात वाचवणं/ ओल हरवलेल्या माणसांच्या/ आपुलकीच्या शब्दांसाठीची व्यर्थ धडपड गुंतवणं/ फार धडपड करून/ ह्या सताड भूमीत शरीरासकट मन सांभाळणं/ निःशब्द भोवतालात/ हे जख्मी एकटेपण दडवणं/ पक्ष्यांसारखी शुभ्र/ पराभवाची माळ मांडणं/ आतल्या सगळ्या घालमेली/ कुणाला तरी समोर गृहीत धरून स्वतःशीच...'



'सुफी प्रार्थनांच्या किनाऱ्यावरून' या संग्रहातल्या एका कवितेतल्या त्यांच्या या काही ओळी त्यांच्या निर्मितिप्रक्रियेवर, त्यांच्या संवेदनस्वभावावर आणि त्यांच्या आंतरिक कोलाहलावर एकाच वेळी प्रकाश टाकतात त्या उजेडात त्यांची कविता जाणून घ्यावी लागते. 'सुफी प्रार्थनांच्या किनाऱ्यावरून' या संग्रहात हे 'शोधणं', 'गुंतवणं', 'सांभाळणं', 'दडवणं', 'मांडणं' प्रत्येक कवितेतून सुरू असते आणि ते चालले असतानाचे जगणे वेदना देणारे आणि आर्त असते. या 'शोधण्यात' स्वतःचा अर्थ शोधताना स्वतःचं विच्छेदन' अटळ असते, ते 'आरशासमोर उभे राहाणे असते' आणि स्वतःला पाहिल्यावर 'आपल्या असंख्य चुकांचं अपराधीपण' जे जाणवते तेही वेदनादायकच असते. नांदेडकर या पहिल्या संग्रहात आत्मशोध, अपराधभाव आणि आत्मपीडा या चक्रातून जात असतात, तेव्हा खिन्नता, नैराश्य, 'काळाच्या वाटोळ्या, नात्यांच्या चक्राकार, विश्वाच्या वर्तुळाकार, सुखदुःखाच्या गोलाकार खरखरीत सहाणेवर' गिरक्या घेत झिजत असल्याचा प्रत्यय या जाणिवांनी त्यांची कविता भरून येते. त्यांच्या कवितेतली खिन्नता, नैराश्य आणि अर्थशून्यतेचा प्रत्यय अस्तित्ववादी अधिक वाटतो, सौंदर्यवादी नाही.

*'ह्या जमिनीवरून झेपावता येत नाही*
*दुसऱ्या प्रदेशात*
*पाठ फिरवता येत नाही*
*इथल्या भल्या बुऱ्या माणसांकडे*
*म्हणून ह्या साऱ्यांचा निमूट स्वीकार...'*

**श्रीधर नांदेडकरांच्या कवितेतून आजच्या मराठी कवितेतून जवळजवळ अदृश्य झालेली व्याकुळता अखंड स्पंदन पावताना जाणवते. जगताना, मानवी नाती अनुभवताना, ती तुटलेली अनुभवताना असहायता, नाइलाज, तडजोड, दारिद्र्य, तगमग, कासाविशी, दुरावण्यातली तडफड, एकाकीपणाचे भय अशा भावना-संवेदना-जाणिवांचे घुसळून टाकणारे आवर्त त्यांच्या कवितेत भिरभिरत असतात. त्यांच्या ठायी एक अनोखी, जीवन समजून घेण्याची धडपड करणारी, ते उमजल्याची जाणीव व्यक्त करणारी संवेदनशीलता आहे.**

ही अवस्था तात्कालिक नाही, काही तात्कालिक कारणांमुळे निर्माण झालेली नाही. काही बाह्य, सुखकारक गोष्टी समोर आल्या तर ती नष्ट होईल असेही नाही. आजच्या भोवतीच्या वास्तवाशी तिचा काही संबंध नाही किंवा नव्वदोत्तर काळाच्या पर्यावरणामुळे ती निर्माण झालेली नाही. एका विशिष्ट कविवृत्तीशी तिचा संबंध आहे. 'ह्या जगातल्या असंख्य यांत्रिक हालचाली' निमूट बघत राहणारा हा कविस्वभाव आहे. मृत्यूची ओढ, मृत्यूचे चिंतन हा या वृत्तीचा एक अटळ भाग आहे. एक प्रकारची उदासीनता, खिन्नता त्यामुळे झाकळून येते. 'एक कृष्णविवर असतं', 'ह्या जमिनीवरून' अशा काही कवितांतून ती उमटते. 'सुफी प्रार्थनांच्या...'मध्ये आधिभौतिक पातळीवर जाऊ पाहणारी तगमग आणि तडफड व्यक्त होते; परंतु कवीने महत्प्रयासाने, बहुधा दैवी संगीताच्या आणि कोवळ्या हळुवार आठवणींच्या आधारे स्वतःला या अवस्थेतून बाहेर काढले असावे, असे वाटायला लावणाऱ्या काही खुणा काही कवितांमध्ये आढळतात. घरापासून, आपल्या माणसांपासून, नाइलाजाने जावे लागत असण्याची असहायता, त्यातून येणारे दुःख; आपल्या माणसांनाही त्या दुराव्यामुळे, निरोप घ्यावा लागल्याने होणाऱ्या यातनांचेही दुःख, नंतरचे एकाकीपण, खिन्न रितेपण, 'अनोळखी जमिनीशी नातं' सांगत 'इथं तिथं कुठंच जगणं सोपं नसतं' याची जाणीव अशा परस्परांमध्ये सरमिसळून गेलेल्या सावल्यांसारख्या जाणिवांनी 'सुफी प्रार्थनांच्या...' या संग्रहातल्या कविता पिळवटून आल्या आहेत.

श्रीधर नांदेडकर यांच्या कवितांमागे मानवी नात्यांचा संदर्भ वारंवार दिसतो. 'मी आणि इतर' यांच्यातले दुखरे ताण आणि आत्मीयतेचे बंध यांचे उभे-आडवे धागे अनेक कवितांतून विणले गेले आहेत. किंबहुना, 'नात्यांची लांबलचक साखळी/ काळजात तोलून/ मी तेवतो/ एकांताच्या अंधुक गाभाऱ्यात / हेलावतो/ निरर्थकतेच्या हादऱ्यानंतर थरथरतो/ तेव्हा किंचित करकरतात/ नात्यांचे पीळ....'

मैत्रीची नाती दुरावतात ती 'अहंकाराच्या सुऱ्यानं स्वतःला भोसकून/ एकेक नातं हरवण्याची पर्वा केली नाही म्हणून'. पण त्या नात्यांच्या दुरावण्यामुळे

*'आता ह्या अंगणात रुजत नाही*
*हट्टानं लावलेलं गर्द सावली देणाऱ्या झाडाचं रोपटं*
*हिरवं कोवळं गवत टाकलं समोर*
*तर टपोर काळ्या डोळ्यांची गाय फिरवते पाठ...'*

मैत्रीच्या नात्याचे तुटणे म्हणजे आपल्याला सारेच परके होत जाणे, स्वतःही. यामुळे येणाऱ्या अपराधभावांचे उल्लेख काही कवितांमध्ये आढळतात. 'सुफी प्रार्थनांच्या...' मधल्या 'घर', 'मित्रांसाठी', 'वडील म्हणजे खुणेचं झाड', 'नात्यांची लांबलचक साखळी', 'मेणबत्ती', 'बघता बघता कोरड्या...', 'माझ्या माणसांचे आवाज', 'न संपणाऱ्या तडफडत्या दिवसांना', 'मी तुला केवळ जन्म दिलाय', 'शनिवार', 'सगळ्या शक्यतांचा मावळ होतो'- अशा अनेक कवितांमधून मित्र, वडील, पत्नी, मुलगी, मुलगा अशा अनेक आत्मीय नात्यांचे हळुवार पण कासावीस करणारे बंध गुंफले गेले आहेत. त्यामुळे हा पहिला संग्रह अधिक आत्मनिष्ठ वाटतो. माणसामाणसांमधली नाती हा अस्तित्वाचा अंशच असतो, असे आतून वाटणारा हा कवी आहे. नांदेडकरांनी एका कवितेत म्हटले आहे त्याप्रमाणे 'माझ्यात नातेसंबंधांचं एक निष्पाप गाव' असल्याची भावना आणि त्या नातेसंबंधांमध्ये गुंतलेल्या विश्वास, श्रद्धा, प्रेम, वात्सल्य, करुणा, दुरावण्यातल्या यातना अशा विविध सूक्ष्म छटा त्यांच्या दोन्ही संग्रहांतून तरलपणे व्यक्त झाल्या आहेत.

*'नव्या पुस्तकाला खिळखिळं होताना मी पाह्यलंय*

*तसं नात्यांचंदेखील होतं हे कळतं*
*म्हणून संताप होत नाही, असहाय वाटतं*
*तरीही आपण ज्यांचा स्वीकार केलाय*
*त्यांच्यासाठी आपल्या तळव्यात जमवायलाच हवी*
*मायेची ऊब...'*

पुढे पुढे ही 'मायेची ऊब' फक्त आपल्या माणसांपुरती राहत नाही, ती व्यापक होते आणि अक्षरशः सर्वांना कवेत घेताना दिसते. 'सुफी प्रार्थनांच्या...'मध्ये एक कविता आहे. छोटीशीच पण लक्षवेधी...

*'ईश्वर*
*माझ्या उंबरठ्यातून आत ये*
*किंवा थोडासा बाजूला हो*
*बाहेरच्या माणसांना आत येऊ दे*
*तू माझ्यासाठी मरणकळा दाबशील तोवर*
*मला असंख्य माणसांना*
*कडकडून मिठी मारायचीय.'*

याच संग्रहातल्या 'पृथ्वी' या कवितेपासून जणू ही सुरुवात झाली आहे. ती मुळातूनच वाचण्यासारखी आहे.

*'स्वतःच्या गतीवर तुझा विश्वास आहे...*
*म्हणून झाडं निर्धास्त पसरतात आपल्या फांद्या*
*पक्षी झुलतात डोलघरटच्यांतून*
*आणि हुंदडतात असंख्य प्राण्यांचे कळप*
*... तेव्हा मला अपराधी वाटतं त्या काचेच्या घरात...*
*पृथ्वी, तुझ्या अस्तित्वावर उमटणारा अग्नी, जलप्रलय*
*लाव्ह्याचा उद्रेक पाहतो*
*आणि सलते मनात*
*माझ्या छोट्या दुःखाची गोष्ट.'*

जणू हा तो साक्षात्काराचा क्षण आहे, स्वतःच्या काचेच्या घरात बसून राहण्याची अपराधी जाणीव होण्याचा, स्वतःचे दुःख 'छोटे' आहे याचे सलते भान येण्याचा. यानंतरची नांदेडकरांची कविता 'जणू सारा जाळ, सारं अरण्य ओलांडून माणसांच्या वस्तीजवळ' आलेली आहे. तिला भोवतालच्या 'आभासी दुनियेचं' भान आलं आहे.

'लिहित्या हाताला गवताचा वास असो कायम'- असा आशीर्वाद आहे. मी या कविता वाचते तेव्हा त्या माझ्या संवेदनशीलतेला अनेक दिशांनी भिडतात. कवीचे कवितेशी, काव्यपरंपरेशी असणारे नाते; तिचे सामर्थ्य, जगणे, मृत्यू, भवताल, जाणिवांचे आंदोलन, जगण्यातली अपरिहार्यता आणि त्यातूनच हळूहळू जगण्यातील अस्सलतेला भिडणे असा प्रदीर्घ आत्मिक प्रवास मला या कवितांमधून जाणवत गेला.

'सुफी प्रार्थनांच्या किनाऱ्यावरून' नंतर 'परतीचा रस्ता नाहीय' हा प्रवास ही एक झेप आहे. आधीचे वास्तवदेखील वास्तवच आहे, पण ते आंतरिक वास्तव आहे. 'मी'शी अधिक निगडित. त्यात मुख्यतः माणसांशी आलेल्या, स्वतःच्या किंवा इतरांच्या चुकांमुळे निर्माण झालेल्या दुराव्याच्या वेदना आहेत. दुसऱ्या संग्रहातही आतले वास्तव आहे तसे ते नाहीसे होणारे नसतेच. पण तेवढेच ते नाही. आता,

*'माझ्या पावलांनी वेग धरलाय*
*नुसता रस्ता माझा नाही*
*रस्त्याच्या काठावर*
*झाड असेल तर झाड*
*माणूस असेल तर माणूस माझा आहे...'*

हा माणूस, मग तो 'मीरभाई', 'देवाचा चकवा असा वारकरी असो', नदीकाठी भटकणारी, भाकरीसाठी भरकटणारी माणसे असोत, भाजीच्या लालभडक पाण्यात घागरी बुडवून खाणारा लुकमानभाई असो; 'धरण-१', 'धरण-२', 'ही अंधाराची खाडी', 'पंख शोधणारा माणूस', 'किती कहाण्यांची बोचकी...' 'यास्मिन'- अशा कित्येक कवितांमधून आलेली अनेक प्रकारची माणसे, मुले, स्त्रिया- त्यांची दुःखे, वेदना, अभाव, पराभव, उद्ध्वस्त होणे, त्यांच्यातील माणुसकी, जगण्याशी ते करीत असलेली तडजोड, त्यांचे आकांत हे सारे कवी स्वतः आतून अनुभवतो आहे; असा प्रत्यय या कविता देतात. या साऱ्यांशी जोडून घेण्यातून या कविता येतात. त्याचबरोबर कवितेमुळे कवी या साऱ्यांशी जोडला जातो. खरे म्हणजे कवीला हे हवे आहे, पण ते होत नाही.

*'असं होत नाही, असं होत नाही की*
*सगळी माणसं शहराबाहेरच्या*
*रानातल्या झाडांखाली बसून*
*आपापल्या डोहासारखी आपापली कविता सांभाळतील*
*एक कवी दुसऱ्या कवीच्या खांद्यावर*
*विश्वासानं हात ठेवील*
*असं सगळ्या भाषांमध्ये होईल*
*असं होत नाही.'*

श्रीधर नांदेडकरांच्या कवितेतून आजच्या मराठी कवितेतून जवळजवळ अदृश्य झालेली व्याकुळता अखंड स्पंदन पावताना जाणवते. जगताना, मानवी नाती अनुभवताना, ती तुटलेली अनुभवताना असहायता,

नाइलाज, तडजोड, दारिद्र्य, तगमग, कासाविशी, दुरावण्यातली तडफड, एकाकीपणाचे भय अशा भावना-संवेदना-जाणिवांचे घुसळून टाकणारे आवर्त त्यांच्या कवितेत भिरभिरत असतात. त्यांच्या ठायी एक अनोखी, जीवन समजून घेण्याची धडपड करणारी, ते उमजल्याची जाणीव व्यक्त करणारी संवेदनशीलता आहे.

*'एकदा झाडावरून खाली पडून फुटून गेलेल्या अंड्याकडे*
*आणि एकदा एकमेकांकडे पाहणाऱ्या*
*पारव्यांचे डोळे तळहातावर ठेवून पाहावे लागतात*
*पोटात आग पडल्यावर, आपल्या ताटात गरम भाकरी वाढून*
*धगीत घामानं डबडबलेला चेहरा पुसणारा विरलेला पदर*
*लक्षात ठेवावा लागतो...'*

तसे पाहिले तर ही दोन्ही दृश्ये नेहमीची परिचित आहेत; पण ती पाहणारी नजर क्वचित आढळते, जी नांदेडकरांजवळ आहे. 'सुफी प्रार्थनांच्या' या पहिल्या संग्रहात काहीशी आत्ममग्न वाटणारी त्यांची दृष्टी दुसऱ्या संग्रहात भोवतीचे वास्तवही सूक्ष्मपणे पाहते आहे याचे प्रत्यंतर देणाऱ्या अनेक कविता दाखवून देता येतील.

*'बाभळीच्या काट्यात अडकलेलं*
*कुडतं काढा झाडावरचं*
*आन् मला माझ्या पोराच्या घामाचा वास घेऊ द्या*
*त्याच्या कुडत्यानं हे अभागी कपाळ पुसू द्या...'*

हा आक्रोश केवळ 'सामाजिक जाणीव' नावाच्या उपशीर्षकाम न मावणारा आहे. ही सामान्य माणसाला 'कवी' बनवणारी सर्वव्यापी करुणा आहे. नांदेडकरांची कविता आत्मनिष्ठेकडून आणि आत्मपीडेकडून व्यापक करुणेकडे वळते हे त्यांच्यातल्या विकासाचे आणि वाढीचे चिन्ह आहे. त्यामुळेच जगातले दुःख टिपून घेताना दुःख निर्माण करणाऱ्या मानवी-अमानवी घटकांचे भानही ते प्रकट करतात. 'अभद्र काळ', 'ज्यात मी माझे पाय ओढतो कसेबसे तो तुमचा काळ', 'कुटुंबाच्या स्वप्नांना चूड लावणारं भ्रष्टाचं भूत', 'गंजलेली नैतिकतेची तलवार', 'निर्मम काळाचा काळोख', 'वस्तूंचा ध्यास घेतलेली माणसं', 'आपल्या झगमग जिंदगीला वाकुल्या दाखवणारे गाडगीमडकी विकणाऱ्या भटक्यांचे बिनतक्रार संसार'- अशा प्रतिमांमधून ते घटक लक्षात येतात. 'मातीला पाठमोरी' झालेली आणि इथे आल्यावर इथल्या धुळीला शिव्या देणारी माणसे, 'नदीकाठी भटकणारी', 'ज्यांच्याकडे पसाभर जमीन आणि फुटकी भांडीकुंडी होती' अशी माणसे, 'अंगावर जेमतेम कपडे असलेली लहान मुले', 'हातापायांच्या काटकुळ्या झालेली गरीब धरणग्रस्त माणसे', अशा अनेक उल्लेखांतून भोवतीच्या भयाण वास्तवाविषयीची त्यांची सजगता प्रकट होते. तरीही 'सामाजिक जाणिवे'च्या कवितेचा उंच, अभिनिवेशी आणि सरधोपट 'आवाज' या कवितेत उमटलेला नाही हे तिचे लक्षणीय वैशिष्ट्य आहे.

'कविता' ही नांदेडकरांच्या काळजातली दुखरी नस आहे. ती त्यांचे बळही आहे. त्यांची भूमीही.

*'गुरुत्वाकर्षण आहे कवितेचं*
*नाही तर निसरड्या पहाडांवर, असं*
*पाय रोवून उभं राहता आलं नसतं...',*

'परतीचा रस्ता..'मधील 'रस्ता', 'कोणती अवदसा आठवली', 'शब्दांचा गंडा मनगटावर बांधून घेण्याआधी', 'मरणाच्या बैलगाडीत...', 'निघताना काही ठरवलं नव्हतं', 'भाकरीच असते कविता म्हणजे', 'सगळी माणसं कवितेच्या गुहेत थांबतील' इत्यादी अनेक कवितांमधून त्यांचे कवितेशी असणारे अनेकपदरी नाते स्पष्ट होते.

*'ज्ञानेश्वरानं भाषेचा दिवा ठेवला*
*आणि स्वतःसाठी भुयारातला अंधार...*
*याच भाषेतून तुकारामाचं विमान उडालं,*
*तर या नदीच्या पात्रात*



**घरापासून, आपल्या माणसांपासून, नाइलाजाने जावे लागत असण्याची असहायता, त्यातून येणारे दुःख; आपल्या माणसांनाही त्या दुराव्यामुळे, निरोप घ्यावा लागल्याने होणाऱ्या यातनांचेही दुःख, नंतरचे एकाकीपण, खिन्न रितेपण, 'अनोळखी जमिनीशी नातं' सांगत 'इथं तिथं कुठंच जगणं सोपं नसतं' याची जाणीव अशा परस्परांमध्ये सरमिसळून गेलेल्या सावल्यांसारख्या जाणिवांनी 'सुफी प्रार्थनांच्या...' या संग्रहातल्या कविता पिळवटून आल्या आहेत.**

*स्वतःच्या शिदोरीतली भाकरी सोडून दिली...*
*अठरा वर्षे दिवा विझला नाही*
*चारशे वर्षे भाकरी संपली नाही...'*

ही नदी किंवा भाषेतले भिरभिरते मासे किंवा अरुण कोलटकरच्या भिजक्या वहीतल्या कासवाचा अश्रू यांच्याशी आतड्याने जुळलेल्या या कवीला

*'कोणती अवदसा आठवली, की*
*माझ्या भाषेतल्या काही लोकांनी*
*जरीकाठाचे सदरे लेऊन*
*व्यासपीठावर गाणी म्हणली...*
*आणि एका नदीसारख्या*
*परंपरेच्या काठावर नंगानाच करून*
*फुलं उधळून घेतली*
*अंगावर टाळ्यांची'*

असा संताप येतो तो का ते समजून घेता येते. 'भाडोत्री कवींच्या जळत्या रिंगणातून डोंबाऱ्याचा सूर मारून निघशील, तर कवितेची पाऊलवाट तुला जखमी जनावरच्या डोळ्यातल्या पाण्याजवळ घेऊन जाईल...' असा 'रस्ता' कवी दाखवून देतो आहे, स्वतःलाच.

'सुफी प्रार्थनांच्या किनाऱ्यावरून'मध्ये सतत नको असताना घर सोडून जावे लागण्याची, आपली माणसे दूर जाण्याची तगमग, एकाकीपणा तीव्रतेने व्यक्त होतो. पुढे असहायतेची ही जाणीव कमी होते. स्वतःपेक्षा इतरांच्या दुःखाने अधिक अस्वस्थता येते. 'हजार दृश्यं रक्तात लुकलुकत' राहतात ती उमटू लागतात मनाबाहेर. 'प्रेम' मुखर होऊ लागते. 'जमीन आणि पाण्याच्या दरम्यान', 'काजव्यासारखं प्रेम उडून जातं अचानक', 'तुझ्या कपाळावर लिहिलेली गोष्ट', 'तहान', 'मी हे शरीर' अशा काही कविता साचेबद्ध प्रेमकवितांहून वेगळ्या, अधिक तरल, अलवार असे प्रेम व्यक्त करतात.

नांदेडकरांची कविता साधी वाटते, पण तशी ती नाही. अनुभूती, भावना, जाणिवा, विचार यांचे प्रतिमांमध्ये रूपांतर करण्याच्या त्यांच्या क्षमतेमुळे त्यांची कविता अनेकपदरी आणि भरीव, दाट होत जाते. बैल, रावा, दिवाभीत असे प्राणीही त्यांच्या जाणिवांना स्पर्श करतात. मासे, पक्षी, मांजर, चिमणी, मुंगूस, बकरी अशी सृष्टी; 'मुंबईचा काळीज कुरतड्या कवी, ज्याच्या बिछान्याखाली शंभर कविता निजल्या होत्या', 'चौथ्या मजल्यावरून जमिनीकडे झेपावून तुकडे झालेल्या बाहुलीचा बाप', 'फेरीवाल्याच्या भोवती घिरट्या घालणारा अनोळखी मुलगा', 'राकेस', नावाचा विठ्ठलासारखा काळाकुट्ट लहानगा ईश्वर', अशी दुःखाचे दशावतार दाखवणारी मानवी सृष्टी यांनी नांदेडकरांचे भावविश्व गजबजलेले असते. ते गदगदत राहते अखंड आणि कवितेच्या रूपात उभे होते. 'करुणेच्या पाण्याचा आवाज' या कवितेत भरून राहातो. तो पुढे वाचकाच्याही मनात वाहू लागतो.

पण एवढेच नाही. या सर्वस्पर्शी कारुण्यामागे कवीची काही एक स्पष्ट आणि निःसंदिग्ध, ठाशीव भूमिकाही आहे.

*'मुलांना नुसती शस्त्रं दाखवून निर्भय*
*बनवण्याचे मनसुबे*
*रचता येत नाहीत*
*जगण्यावरच्या श्रद्धेसाठी*
*त्यांना झरे, झाडे, पाखरं,*
*दाखवावी लागतात...'*

त्यांची स्वतःची जगण्यावरची श्रद्धा केवळ स्वतःपुरती उरत नाही. ती काही मूलभूत नैतिक सवाल उभे करते.

*'चेंगराचेंगरी होते तेव्हा तुम्ही तुमच्या हातातलं मूल सोडून देता का?*
*आग लागते तेव्हा बिछान्यातल्या*
*मुलीचं काय करता?*
*दोन दिवसांचं बकरीचं पिल्लू हौदात पडतं तेव्हा?*
*....जिला मी माझी ताकद मानतो आणि*
*हे जग कमजोरी मानतं*
*ती जिवाशिवाच्या भेटीची*
*आळवणी करणारी कविता*
*धूर आणि विष पसरलेल्या हवेत*
*श्वासासाठी धडपडताना*
*सगळे कविलोक काय करायचं ठरवताहेत?*
*हातातलं मूल, बिछान्यातली पोर, बकरीचं पिल्लू...*
*दम तोडणारी कविता*
*शपथेवर सांगतो,*
*मी कोणाचंच बोट सोडणार नाही.'*

आजच्या काळात एका कवीने दिलेले हे उत्तर आश्वासक आहे.

◆

**डॉ. प्रभा गणोरकर**
भ्रमणध्वनी : ९५४५४६१७३७

**महाराष्ट्र साहित्य परिषदेची प्रकाशने**

## मराठी वाङ्मयाच्या संशोधकांना उपयुक्त शाळा आणि महाविद्यालये तसेच ग्रंथालयांनी अवश्य संग्रहात ठेवावी अशी

# महाराष्ट्र साहित्य पत्रिका सूची (१९१३ ते २००४)

सूचीकार : **डॉ. मीरा घांडगे**

पृष्ठे (रॉयल) २५६+४, मूल्य रु. ४००/-, सवलतीत रु. ३००/-
मनीऑर्डर किंवा डी. डी. ने पाठविल्यास रजि. बुक पोस्टाने घरपोच

मराठी भाषेच्या संशोधक - विद्यार्थ्यांना भाषा आणि साहित्यातील संशोधनाची दिशा आणि पद्धती सांगणारा ग्रंथ. महाराष्ट्र साहित्य परिषदेने पुनर्मुद्रित केलेला आणि मराठीतील तीस अधिकारी व्यक्तींचे विविध विषयांवरील अभ्यासू व संपादित लेख समाविष्ट असलेला ग्रंथ.

# भाषा व साहित्य : संशोधन

संपादक : **डॉ. वसंत स. जोशी**

प्रथम आवृत्ती : १९८१. भाग १ ला सुधारित दुसरी आवृत्ती : २००६ मध्ये प्रसिद्ध झाली.
पृष्ठे : ४५० (डेमी) मूल्य रु. ५००/-, भाग २ रा मूल्य रु. ३००/-, भाग ३ रा मूल्य रु. २००/-

मागणीसाठी संपर्क : **महाराष्ट्र साहित्य परिषद,**
टिळक रस्ता, पुणे ४११०३०. दूरभाष : ०२०-२४४७५९६३



भाषण

अरुणा ढेरे



# स्त्रियांचं साहित्य मुक्तीचा 'शुकशकुन' प्रत्यय

**महाराष्ट्र साहित्य परिषदेचे २३वे विभागीय मराठी साहित्य संमेलन १९ व २० डिसेंबर २०१४ रोजी दापोली येथे पार पडले. ज्येष्ठ कवयित्री डॉ. अरुणा ढेरे यांनी या संमेलनाचं अध्यक्षस्थान भूषवलं. या वेळी अध्यक्षीय भाषणात त्यांनी 'स्त्रियांचं साहित्य' या विषयाला केंद्रस्थानी ठेवून मांडलेले विचार येथे प्रसिद्ध करत आहोत.**

रसिकहो, महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या या विभागीय संमेलनाचं अध्यक्षपद आपण मला प्रेमाने देऊ केलं आहे. उपचारांपलीकडच्या या प्रेमाचा आनंद प्रथम व्यक्त करूनच मी बोलण्याची सुरुवात करते आहे.

कोकणभूमीला स्वत:ची एक स्वतंत्र प्रादेशिक संस्कृती आहे. एका बाजूने रसरंगगंधांनी डवरलेली सृष्टी आणि दुसरीकडे खडतर, अभावांनी भरलेली अशी माणसांची आयुष्यं. कोकणची संस्कृती आणि साहित्य या दोन्हींमधून वाट काढत पुढे चाललं आहे. इथली दैवतं, इथल्या सांस्कृतिक परंपरा, इथला ऐतिहासिक वारसा यांचं महाराष्ट्र संस्कृतीच्या घडणीत स्वतंत्र आणि वैशिष्ट्यपूर्ण असं योगदान आहे. किंबहुना अभिजात संस्कृती असं आपण जिला म्हणतो, तिच्या समृद्धीला अनेक प्रादेशिक संस्कृती-परंपरांचा मोठा हातभार लागलेला असतो. या प्रादेशिक संस्कृती-परंपरा सांभाळणं ही आज अवघड पण अत्यावश्यक अशी गोष्ट आहे.

मग त्या छोट्या-मोठ्या कला असतील किंवा कारागिरीचे लहान-मोठे उद्योग असतील... जशी पिंगुळीची चित्रकथींची कला आहे, कोकणचे दशावतार आणि नमनखेळे आहेत, जशी सावंतवाडीची लाकडी खेळणी आहेत. किंवा विशेष दैवतं असतील. जशी सांतेरी आहे, रवळनाथ आहे. शिवाय आता सगळं सगळीकडे पिकवता येतं, बनवता येतं असं म्हटलं, तरी अजून बीड-उस्मानाबाद किंवा अमरावती-चंद्रपूरला काजू नाही पिकत. आंबे आणि फणस, नारळ आणि काजू आणि आमसुलं-सोलं काही खानदेशात नाही ताजी मिळत. इथली सोलकढी, इथल्या फेण्या, इथली खांडवी, इथली मासळी... शेवटी त्या त्या प्रदेशात निर्माण होणाऱ्या अन्नाची चव तिथेच असते. मसाले आणि वाटण-घाटण तिथलं तिथेच असतं. तिथल्या हवेचा, मातीचा वास त्या अन्नाला असतो. त्या त्या पर्यावरणातले माणसांचे वेष बनतात; राहणीमान, घरं आणि स्वभाव आणि भाषा बनते, श्रद्धा-समजुती बनतात. शेवटी संस्कृती म्हणजे तरी काय? हे सगळं मिळून माणसांचं जे जगणं असतं त्या जगण्याचा आविष्कार म्हणजे संस्कृती.

अशा प्रादेशिक वैशिष्ट्यांसह संस्कृती टिकणं, भाषा टिकणं महत्त्वाचं आहे. सध्याच्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत तर जगभरातल्या शेकडो लहान-मोठ्या भाषा मरू घातल्या आहेत, सांस्कृतिक सपाटीकरणाच्या लाटेत शेकडो लोकसमूहांची प्रादेशिक वैशिष्ट्यं नष्ट होत चालली आहेत, याचं भान प्रादेशिक साहित्यातून नेहमीच प्रकट होत आलं आहे.

सृष्टीशी असलेला मानवी संवाद संपता कामा नये. बदलत चाललेल्या नैसर्गिक, सांस्कृतिक आणि मानवी संबंधांच्या पर्यावरणातल्या प्रदूषणाकडे डोळेझाक करता कामा नये यासाठी प्रादेशिक संस्कृतींनी जागं राहायला हवं आहे, आणि याची जाणीव जागी ठेवण्याचं काम प्रादेशिक साहित्य आजवर करत आलेलं आहे. मग ते कवी केशवसुत, आरती प्रभू, माधव किंवा वसंत सावंत असोत, वि. स. खांडेकर, गो. नि. दां. असोत, काळे आणि कर्णिक असोत, बाळकृष्ण प्रभुदेसाई किंवा पेंडसे, दळवी असोत... नावं अनेक आहेत आणि ती आजच्या शरयू असोलकर, प्रवीण बांदेकरांपर्यंत किंवा वीरधवल परब, अनिल धाकू कांबळे, अजय कांडरांपर्यंत येत राहणारी आहेत.

यांच्यासारख्या लिहित्या लेखकांनी, खरं म्हणजे कोणत्याही सर्जनशील आणि गांभीर्याने लेखन करणाऱ्या लेखकांनी माणसाचं जगणं हेच आपल्या लेखनाचं केंद्र मानलं आहे, आणि जगणं म्हणजे प्रवाहीपण, जिवंतपण. या जिवंतपणाच्या बाजूने, नेहमी सच्चा साहित्यकार उभा असतो, लेखक उभा असतो. विनाश अटळ आहे; पण विनाश घडवून आणणाऱ्या निर्मम आणि अविवेकी आग्रहांनी जगण्यातल्या कोवळ्या, सत्त्वशील, समृद्ध आणि सुंदर गोष्टी नष्ट करू पाहणाऱ्या प्रत्येक आक्रमणाविरुद्ध सच्चा लेखक उभा असतो. मग तो लेखक स्त्री असो वा पुरुष असो.

नैसर्गिक पर्यावरणाइतकंच सांस्कृतिक जैववैविध्य टिकणंही आवश्यक पण अवघड झालं आहे. जिथे माणसांचा माणसांशी रोजच्या जगण्यातून संबंध जुळतो अशा जागा सार्वजनिक आयुष्यातून मिटत चालल्या आहेत. चांभार आणि सुतार, भाजीवाले आणि दूधवाले यांना हद्दपार करत, छोटे दुकानदार, छोटे उद्योग नाहीसे करत एक नवी मॉल संस्कृती उदयाला आली आहे. आपण सगळे तिथे माणूस नसतो, फक्त ग्राहक असतो. आपल्या संवेदनांना बधिर करणाऱ्या या आपल्या जगण्याविषयी दलाई लामांनी एका कवितेतच म्हटलं आहे-

*लक्ष द्या... वाटलं तर बदला... किंवा विसरून जा...*

*आपल्या काळात इमारतीची उंची वाढली*
*पण माणुसकीची कमी झाली.*
*रस्ते रुंद झाले पण दृष्टी अरुंद झाली,*
*खर्च वाढला आणि शिल्लक कमी झाली*
*घरं मोठी पण कुटुंबं छोटी झाली*

*सुखसोयी पुष्कळ पण वेळ दुर्मिळ झाला*
*माहितीचे डोंगर जमले पण नेमकेपणाचे झरे आटले*
*तज्ज्ञ वाढले आणि समस्याही वाढल्या.*
*औषधं भरपूर पण आरोग्य कमी झालं*
*आपण बोलतो फार... प्रेम क्वचितच करतो,*
*आणि तिरस्कार मात्र सहज करतो.*
*राहणीमान उंचावलं पण जगणं दळभद्री झालं.*
*आपल्या जगण्यात वर्षांची भर पडली*
*पण वर्षांत जगण्याची मात्र नाही.*

*आपण भले चंद्रावर जाऊन आलो...*
*पण शेजारच्या नव्या माणसाला भेटणं काही होत नाही.*
*बाहेरचा परिसर आपण जिंकत चाललो आहोत,*
*पण आतल्या हरण्याचं काय ?*

*आपली आवक वाढली पण नियत कमी झाली.*
*संख्या वाढली पण गुणवत्ता घसरली.*
*हा काळ उंच माणसांचा पण खुज्या व्यक्तिमत्त्वांचा !*
*उदंड फायद्यांचा पण उथळ नात्यांचा.*
*जागतिक शांतीच्या गप्पांचा पण घरातल्या युद्धाचा.*
*मोकळा वेळ हाताशी, पण त्यातली गंमत गेलेली.*
*विविध खाद्यप्रकार, पण त्यात सत्त्व काही नाही.*

*दोन मिळवती माणसं, पण त्यांचे घटस्फोट वाढलेले.*
*घरं नटलेली पण घरकुलं दुभंगलेली.*
*दिखाव्याच्या खिडकीत खूप काही मांडलेलं*
*पण कोठीची खोली रिकामीच !*

*हे पत्र तुमच्यापर्यंत पोचवणारं तंत्रज्ञान आज आहे*
*आणि आज आहे तुमचं स्वातंत्र्यही*
*या पत्राकडे लक्ष देण्याचं किंवा न देण्याचं !*
*यातलं काही वाटलं तर बदला किंवा*
*अगदी विसरून जा.*

सृष्टीशी एके काळी माणसाचा फार आत्मीय असा संबंध होता. निसर्गचक्र आपण शाळेत शिकतो आणि शिकवतोही. पण विज्ञानाने आणि नव्या तंत्रज्ञानाने जी प्रगतीची नवी वाट धरली आहे, ती वाट प्रशस्त करण्याच्या भरात, त्या रस्त्याचं रुंदीकरण करण्याच्या सपाट्यात आपण त्या वाटेवरचे, सृष्टीशी असलेल्या हिरव्या आणि जिवंत नात्याच्या पालवीचे आणि सावलीचे महावृक्ष तोडून टाकतो आहोत. आपल्या मुलांना, आपल्या प्रियजनांना भौतिक विकासाच्या आणि सुखाच्या सर्व गोष्टी देण्यासाठी आपण तत्पर असतो, धडपडत असतो, पण त्यांच्या भावनिक वाढीकडे, संवेदनात्मक विकासाकडे आपण लक्ष देत नाही.

१९९२ साली ब्राझील इथे वर्ल्ड समिटपुढे १२ वर्षांच्या सेव्हर्न सुझुकी या कॅनेडियन मुलीने मुलांच्या वतीने भाषण केलं. ती म्हणाली, की आमच्या भविष्यासाठी आम्ही झगडतो आहोत. आणि भविष्य गमावणं म्हणजे निवडणूक हरणं किंवा स्टॉक मार्केटमधे काही पॉइंट्स गमावणं नव्हे.

जगभरातल्या भुकेल्या मुलांचं प्रतिनिधित्व मी करतेय. राहायला सुरक्षित जागाच न मिळाल्यामुळे मरण पावत असलेल्या पृथ्वीवरच्या प्राण्यांची बाजू मी मांडतेय. हवेतल्या घातक वायूंमुळे मी श्वास घ्यायला घाबरतेय. काही वर्षांपूर्वी वडलांबरोबर मी व्हँकुव्हरला मासे पकडायला गेले होते. आता तिथले मासे कर्करोगाने आजारी आहेत. प्राणी आणि झाडं झपाट्याने नाहीशी होतायत.

जंगली श्वापदांचे आवाज आणि पक्ष्यांची किलबिल ऐकता यावी आणि फुलपाखरांची भिरभिर पाहता यावी हे माझं स्वप्न आहे. पण ते फक्त स्वप्नच राहणार आहे का ?

ओझोनच्या थराला पडलेली छिद्रं कशी बुजवणार आहात तुम्ही? आटलेले झरे पुन्हा कसे प्रवाहित करणार आहात? दुर्मिळ प्राण्यांना परत कसं जिवंत करणार? ओसाड, दूषित जमिनीत झाडं कशी उगवणार, वाढवणार? श्रीमंत देश आज संपत्तीचा अपव्यय करतात पण गरीब देशांना निरपेक्ष मदत करत नाहीत.

जो पैसा तुम्ही युद्धावर खर्च करता तो जगातली गरिबी हटवण्यासाठी आणि पर्यावरण वाचवण्यासाठी खर्च केला असता तर ही पृथ्वी खरोखरच सुंदर झाली असती.

शाळेत, अगदी बालवाडीत तुम्ही आम्हाला शिकवता, की इतरांशी भांडू नये, मन लावून कोणतंही काम करावं, दुसऱ्याचा नेहमी आदर करावा, स्वच्छता राखावी, मुक्या प्राण्यांना त्रास देऊ नये, इतरांना मदत करावी, हाव धरू नये.

हे तुम्ही आम्हाला शिकवता, पण त्याच गोष्टी तुम्ही का करता? आम्ही तुमचीच मुलं आहोत, पण तुमच्या दृष्टीने आम्हाला खरंच महत्त्व आहे का? तुम्ही जे वागता त्यामुळे आम्हाला रडू येतं. आमच्यावर तुमचं प्रेम आहे असं तुम्ही नेहमी सांगता. मग जे सांगता ते कृतीत आणा, असं मी तुम्हाला विनवून सांगतेय.

आज मी इथे आले आणि असं वाटलं, की सेव्हर्न सुझुकीने विचारलेल्या प्रश्नांशी सामना करण्यासाठी सिद्ध होऊ पाहणारी, स्वत:च्या अंगभूत क्षमता वाढवू पाहणारी एक जागृत आणि सर्जनशील पिढी निर्माण करण्याची तळमळ लागलेल्या व्यासपीठावर आपण आलो आहोत.

जिथे विज्ञान आणि तंत्रज्ञानाची उच्च शिखरं गाठण्याची ईर्ष्या तर निर्माण केली जातेय, पण त्याचबरोबर समाजभान आणि आत्मभानही जागवण्याचे प्रयत्न आहेत, जिथे विकासाच्या नव्या अनंत दिशांचं दिग्दर्शन होतंय आणि त्याचबरोबर मूल्यशिक्षणाचं भानही राखलं जातंय, सृजनशीलतेचं महत्त्व जिथे ओळखलं जातंय अशा जागा, अशी केंद्रं, अशी व्यासपीठं आपण निर्माण केली पाहिजेत.

व्यासांसारख्या महामनीषी प्रज्ञावंताने महाभारतात एक फार लक्षणीय प्रसंग उभा केला आहे. व्यास एखाद्या कुशल आणि प्रतिभावंत छायाचित्रकारासारखे आहेत. भारतीय युद्धानंतरच्या संहाराचं दृश्य कॅमेऱ्याच्या लाँग शॉटसारखं ते आधी उभं करतात. रणांगणावर मृत सैनिकांचे- दोन्हीकडच्या सैनिकांचे देह पडलेले आहेत, बाणांनी घायाळ होऊन मरून पडलेले घोडे आणि हत्ती आहेत. तुटून पडलेले मानवी अवयव आहेत. रथ आहेत, ध्वज आहेत, शस्त्रं आहेत, अलंकार आहेत आणि त्या मरणाच्या पसाऱ्यात आपल्या प्रियजनांना शोधणारे शोकाकुल लोक आहेत. भक्ष्यावर तुटून पडलेली गिधाडं आणि कावळे आहेत, कुत्री आणि कोल्हे आहेत तसे भुरटे चोरही आहेत.

व्यासांच्या शब्दांतून हे सगळं संहाराचं दृश्य वाइड अँगलमधे दिसतं आणि मग हळूहळू फोकस करून तो दृष्टीचा कॅमेरा झूम-इन होत होत एका हत्तीशी येतो. हत्तीच्या गळ्यातली घंटा तुटून पडली आहे आणि त्या घंटेच्या लहानशा पोकळीत एका चिमणीने अंडी घातली आहेत. विराट संहार आहे, पण त्या संहाराच्या गाभ्यातच नवनिर्माणही आहे, सर्जनही आहे. जीवन थांबत नाही. संहार कितीही मोठा असला तरी नवीन जगणं सुरू असतं.

आज तुम्ही मला या संमेलनाचं अध्यक्षपद दिलं आहे. संयोजकांनी मला असं म्हटलं, की तुम्ही स्त्रियांच्या साहित्यावर बोला, कारण तुम्ही महिला अध्यक्ष आहात.

महाश्वेतादेवींची भारतीय युद्धानंतरचीच एक कथा आहे. युद्धानंतर आपापल्या सैनिक नवऱ्यांना शोधायला आलेल्या तरुण बायका आहेत. विधवा झाल्याचं लक्षात आलेल्या बायका. द्रौपदी त्या पाच-सात बायकांना ठेवून घेते. गर्भार उत्तरेचं मन त्यांच्यामधे रमेल म्हणून ठेवून घेते. पण पावसाळ्याची चाहूल लागते आणि त्या म्हणतात, 'आम्ही परत जातो.' 'कशाला जाता? तुमचे नवरे तर आता नाहीत.' 'पण म्हणून काय झालं? पूर्वीही ते सैन्याबरोबरच तर असायचे. पण घर नाहीये का आमचं? आता शेतीची कामं करायला हवीत. घरी मुलं आहेत, म्हातारी आहेत. आता थांबून चालणार नाही. पेरण्यांचे दिवस आलेत.'

-बायका अशा पेरण्यांच्या दिवसांसाठी चिवटपणे उभ्या राहतात. कितीही पडझड झाली तरी 'अजून येतो वास फुलांना, अजून माती लाल चमकते, खुरट्या बांधावरी चढोनी अजून बकरी पाला खाते,' या मर्ढेकरी विश्वासावर जगतात. महाश्वेतादेवींच्या कथेतून तेच बाईचं चिवटपण आणि जगण्यात मुळं खुपसून असणं आपल्याला कळून येतं.

स्त्रियांच्या लेखनाचे विषय मर्यादित असले- आणि ते मर्यादित होते याच्या कारणांचाही मोठा इतिहास आहे- तरी ते

लेखन असं- जगण्यात मुळं खुपसून असणारं लेखन आहे.

सांस्कृतिक समृद्धीचं लक्षण म्हणून सतत आपण विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा आणि त्यातून निर्माण झालेल्या सोयी-सुविधांचा उल्लेख करतो. पण खरं पाहता माणसाचं सजग, संवेदनापूर्ण असं आंतरजीवन आणि तिथली सृजनशीलतेची गजबज हेच सांस्कृतिक समृद्धीचं मुख्य लक्षण आहे. त्यामुळे हे जणू ओळखल्यासारखा स्त्रियांच्या लेखनाचा सारा मोहरा भौतिक जग, विज्ञान-तंत्रज्ञान, राजकारण आणि अर्थकारण यांच्या पलीकडच्या अधिक गंभीर अशा मानवी संबंधांकडे आणि आपल्याच आतल्या जगाकडे वळलेला दिसतो.

काळाच्या एका विराट पटावर स्त्रियांचं लेखन किंवा स्त्रियांची एकूणच अभिव्यक्ती पहा. केवळ मराठी नव्हे, केवळ भारतीय नव्हे, एकूणच जगभरातल्या स्त्रियांची अभिव्यक्ती पहा. त्या प्रचंड काळाच्या विस्तारात काय दिसतं? काय म्हणता येतं?

सुरुवातीचा काळाचा तुकडा असा होता, की आदिकाळापासून पुरुषाला सोयीचं असणारं आणि बाईने नकळत स्वीकारून टाकलेलं तिचं, म्हणजे स्त्रीचं दुय्यम स्थान-कुटुंबातलं, समाजातलं- एकूणच जगण्यातलं- तिला इतकं त्या स्थानालाच बांधून ठेवणारं झालं होतं की त्या एका दुय्यम स्थानालाच पुरुषसत्तेने कधी देवी म्हटलं आणि कधी दासी, हेसुद्धा तिच्या लक्षात आलं नाही.

या संस्कृतिदत्त स्थानापासून सुटका आणि स्वत:ची स्वत:ला झालेली ओळख यामधे संस्कृतीचाच नाही तर सगळ्या कलांचाही इतिहास वेगवेगळ्या प्रकारे, वेगवेगळ्या पातळ्यांवर गुंतलेला आहे. आधुनिक काळाचं एक सर्वांत मोठं लक्षण म्हणजे आधी समंजस पुरुषांच्या मदतीने आणि नंतर स्वत:ची स्वत:च बाई हा इतिहास वाचायला शिकली, स्वत:ला वाचायला शिकली आणि मग एका जुन्या कवीने- कवी बींनी म्हटल्याप्रमाणे-

दुर्बळपण पहिले गेले । क्षुद्रपणातुन मी सुटले ।
जीर्ण बंध सगळे तुटले । मी माझी मज सापडले (पिंगा)

अशी वेळ आली.

हे सगळं घडणं अगदी बारीक तपशिलांनी शब्दांत मांडणाऱ्या बायका गेल्या शंभर वर्षांत तुम्हाला जगभरात दिसतील. खरं तर केवढी मोठी घटना आहे ही! आणि वाङ्मयेतिहास लिहिणाऱ्यांना किंवा सांस्कृतिक इतिहासज्ज्ञांना त्याची दखलही घ्यावीशी वाटली नाही गेल्या २५-३० वर्षांपर्यंत?

अख्ख्या मानवजातीचा विचार करता तिच्यामधली अर्धी प्रजात, शंभर वर्षांच्या लहानशा कालखंडात- म्हणजे मानवजातीचा लाखो वर्षांचा इतिहास आणि स्त्रीच्या दुय्यम स्थानाचा हजारो वर्षांचा काळ बघता- एका अगदी लहानशा कालखंडात जी आधी, मोजके अपवाद वगळता, सामाजिक संदर्भात स्वत:बद्दल विस्मृत आणि केवळ स्वीकारशील अशीच जगत होती, ती जागी होते आणि तिला स्वत:ची स्वत:ला माणूस म्हणून ओळख मिळते ही केवढी मोठी गोष्ट आहे! आत्मसाक्षात्कार असा मोठा शब्द त्याला अध्यात्माच्या परिभाषेत आहे.

जगण्याच्या संदर्भातला- सांस्कृतिक संदर्भातला स्त्रीला झालेला आत्मसाक्षात्कारच म्हणायचा की हा ! मी आहे, स्त्री-जातीचा जीव आहे मी, मी माणूस आहे हे तिला कळलं आणि मग त्या जिवाची सर्व बाजूंनी ओळख ती सांगत राहिली. त्या जिवाची स्पंदनं ऐकत-ऐकवत राहिली. तोपर्यंत ती स्पंदनं दाबून ठेवणाऱ्या, दडपणाऱ्या सगळ्या सामाजिक-सांस्कृतिक व्यवहारांविषयी भल्या-बुऱ्या प्रतिक्रिया देत राहिली.

हे आधी उरलेल्या अर्ध्या प्रजातीला-पुरुषजातीला धक्कादायक वाटलं, धोकादायकही वाटलं. शिवाय कोणतीही स्थिर गोष्ट किंवा स्थिर वाटणारी, स्थिर मानलेली गोष्ट हलायला लागली की भीती वाटते, नको वाटतं, असुरक्षित वाटतं. तशा प्रतिक्रियाच मोठ्या प्रमाणात उमटल्या. विरोध, उपहास, चेष्टा, राग, संताप, नकार, कोडी करणं, पेच घालणं, अडथळे निर्माण करणं... - पण कालांतराने हेही मावळलं. पहिल्या प्रतिक्रियांमधला समजुतीचा भाग अधिक जोरकसपणे पुढे आला, विस्तारला, थोडा थोडा स्वीकार करता यायला लागला. स्त्रीचे आधीचे प्रश्न यातून बरेचसे मिटले. तशा नव्या गुंतागुंती, नवे प्रश्नही निर्माण झाले. आधीचे प्रश्न ज्या पर्यावरणाशी जोडलेले होते ते पर्यावरण बदललं आणि समाजाची मानसिकता त्यानुसार थोडीफार बदलली. म्हणून मग सतीची प्रथा गेली, पातिव्रत्याचे रूढ संकेत मोडले, बालविवाह गेले, जरठ-कुमारी विवाह आणि केशवपन गेलं. संमती वय, घटस्फोट अगदी लिव्ह-इन रिलेशनपर्यंत आपण येऊन ठेपलो. वेगवेगळ्या क्षेत्रांतल्या संधी तिच्यासाठी निर्माण केल्या गेल्या, कायदे आले, अधिकार मिळाले, पुष्कळसं स्वातंत्र्य मिळालं.

पण या स्वातंत्र्यानेच नवे प्रश्न निर्माण झाले. उदा. स्त्रियांचं आर्थिक स्वातंत्र्य. २००१ च्या जनगणनेनुसार भारतात अर्थार्जन करणाऱ्या बायका फक्त २५% आणि त्यातही कष्टकरी वर्गातल्या, मजूर वर्गातल्या स्त्रिया ७०% आहेत. म्हणजे आर्थिकदृष्ट्या कमावत्या बायका एकुणात फक्त २५% आणि त्यांनाही आर्थिक स्वातंत्र्य जवळजवळ नाही. (मी आयटीतल्या कमावत्या आणि १% बायकांची गोष्ट करत नाहीये.) मी त्या बायकांची गोष्ट करते ज्यांच्यात राणी बंग, स्मिता कोल्हे, भारती आमटे, नीलिमा मिश्रा, विद्याताई बाळ काम करताहेत, करू बघताहेत.

असं संशोधनाअंती बोललं जातं, की सायटिकाच्या वेदना तुलनेने कमी असूनही पुरुष सहन करू शकत नाहीत, पण

बाळंतपणाच्या वेदना त्याहून कितीतरी असह्य असतात त्या बायका सहन करतात. एकाग्रता आणि धारणाशक्ती बाईकडे जास्त आहे. याचा विकासासाठी किंवा समाजपोषक गोष्टींसाठी उपयोग करून घेणं मात्र समाजाला जमलेलं नाही. विसावं शतक हे जेवढं प्रचंड विज्ञान-तंत्रज्ञान विकासाचं शतक आहे तेवढंच ते शोषक, आक्रमक, मानवताविरोधी वाटचाल वेगाने करणारं शतक आहे.

आणखीही एक लहानसा मुद्दा या लेखिकांच्या संमेलनाच्या निमित्ताने समोर ठेवते. आज सार्वत्रिक सपाटीकरणाची लाट आली आहे आणि अनेक भाषा मरू घातल्या आहेत. पण भाषा आणि स्त्रिया यांचा पूर्वापारचा फार निकट संबंध होता. जसा पर्यावरण आणि स्त्रियांचा होता तसा. आपण हे दोन्ही संबंध कधी लक्षात घेतले नाहीत आणि या तीनही परस्परसंबंधित घटकांवर अत्याचारच करत आलो आहोत. खरं तर बायकांची बोलण्याची क्षमता पुरुषांपेक्षा किती तरी पट जास्त आहे. पुरुष दिवसाला साडेचार हजार शब्द सरासरी बोलतो आणि बाई वीस हजार शब्द- असं संशोधन सांगतं. शिवाय जगण्याला धरून भाषा टिकवण्याचं जास्त श्रेय बाईचं. तिची भाषेतली अभिव्यक्तिक्षमता पुरुषापेक्षा जास्त आहे. पण तिचं लिहिणं कुठे आहे? अशा आज पुष्कळ म्हणजे पुष्कळच जणी आहेत, ज्यांचं जगणं लिहिलं गेलेलंच नाहीये.

थोड्याशा शहरी, मध्यमवर्गीय, उच्चवर्णीय बायका कदाचित आज स्वातंत्र्य, सुरक्षितता आणि सुख शोधत आपापल्या वाटेवरचे प्रश्न- मग ते नातेसंबंधातले असोत की समाजव्यवस्थेतले असोत, त्यांच्या मुळाशी जात जगणं समजून घेत लिहीत राहिल्या आहेत आणि आणखीही पुष्कळ साठ-सत्तर-ऐंशी टक्के बायका ज्या (रझिया पटेलच्या शब्दांत सांगायचं तर) 'हिसाब, हुनर और हिंमत चाहिये' असं म्हणत त्याच दिशेने जाण्यासाठी तेच स्वातंत्र्य, सुरक्षितता, सुख मिळवण्यासाठी धडपडतायत, तहानलेल्या आहेत त्यांचं जगणं आणि ज्यांना अजून ही दिशाच दिसलेली नाही, हे शब्दच माहीत झालेले नाहीत- मग अर्थ तर कोसो दूर, आणि कृतीची शक्यता बहुधा नाहीच, अशाही पुष्कळजणी आहेत. त्यांचं जगणं कुठे साहित्यात आलंय ?

'स्त्रियांना आता सगळ्या प्रकारचं स्वातंत्र्य मिळालंय. म्हणून तर त्या वाट्टेल तशा वागतायत आणि वाटेल तसं लिहितायतही. आणखी काय हवंय त्यांना?' असं म्हणणाऱ्यांनी या वास्तवाकडे एकदा गंभीरपणे पाहिलं पाहिजे. आजच्या चंगळवादाने घेरलेल्या वर्तमानात केवळ स्त्रियाच नव्हेत तर सर्वच स्त्री-पुरुषांचा मिळूनचा समाज सर्जनकेंद्री नव्हे तर संपत्तिकेंद्री आणि संहारकेंद्री जगाची नव्याने रचना करू बघतो आहे. त्या आवेशाच्या भरात ज्या ज्या जुन्यावर त्याने प्रहार केले आहेत त्यात समाजपोषक अशा कित्येक मूल्यांचा घात झाला आहे आणि त्यांची जागा भ्रष्टतेने, सवंगतेने घेतली आहे. त्या भ्रष्टतेचा, त्या सवंगतेचा, त्या निर्मम बाजारूपणाचा मोह पडलेली आणि दंभ चढलेली माणसं -त्यात स्त्रिया आहेत तसे पुरुषही आहेत- अशी माणसं विचारपूर्वक आणि संवेदनात्म जगणंच विसरून चालली आहेत. ही अस्थिरता आणि विचारशून्यता नुसतीच अस्वस्थकारक नाही तर भयावहही आहे.

म्हणून सर्वांनीच हे लक्षात घेतलं पाहिजे, की स्त्रियांच्या साहित्याबद्दल आणि स्त्रियांच्या स्वातंत्र्याबद्दल बोलताना जे मुद्दे विरोधासाठी सोयीचे म्हणून आपण पुढे आणतो ते वस्तुत: सर्वच समाजाला वेळीच आत्मपरीक्षण करण्यासाठी भाग पाडणारे मुद्दे आहेत, आणि स्वातंत्र्याचा प्रश्न हा त्या पलीकडे जाऊन लक्षात घेण्याचा प्रश्न आहे, काळाच्या मोठ्या पटावरचा प्रश्न आहे.

मुळात स्वातंत्र्याचा अर्थ काय हेही स्त्रिया आजवर शोधत आल्याच आहेत. असं नाही की ही आज घडलेली-आधुनिक संकल्पनेची गोष्ट आहे. खरं तर मुक्ती ही स्वातंत्र्य कल्पनेच्याही पलीकडे आहे, आणि मुक्तीचा अर्थ तर अनादी काळापासून स्त्री-पुरुष शोधताहेत. स्त्रीच्या बाबतीत तर बंधनं- बाहेरची बंधनं आणि मर्यादा नाकारण्यातच तिची बरीचशी शक्ती खर्च झाली. तरी तिने सगळे प्रयोग कधी धिटाईने आणि कधी नाइलाजाने जाहीरपणे वर्षानुवर्षं करून पाहिले आहेतच की. तिने शोधलं आहे की तिच्या असण्याचा अर्थ काय? ती फक्त देवी आहे का? ती फक्त दासी आहे का? ती आई, मुलगी, बहीण, बायको, सासू, नणंद किंवा जाऊ एवढीच आहे का? या भूमिका तिने तपासून पाहिल्या आहेत आणि तिच्या लक्षात आलं आहे की हे तिच्या मूळ असण्याचे अंश आहेतच. पण मूळची ती अशी आणि एवढीच नाही.

तिने मग तिचं स्वत:चं अस्तित्व तपासलं आहे. देह स्त्रीचा आहे म्हणून ती स्त्री आहे का? तिने देहाचं महत्त्व नाकारून पाहिलं आहे. आमच्या संत स्त्रियांची रचना पहा. त्यांचे शब्द वाचता-ऐकताना लक्षात येतं की त्यांचा विठ्ठल तो नव्हेच बहुधा जो तुम्हा-आम्हाला वाटतो. या तर स्वत:ला शोधत निघाल्या आहेत. अध्यात्माची रूढ परिभाषा या वापरताहेत, जशा आज कुणी मल्लिका, प्रज्ञा, नीरजा, प्रतिमा जोशी, प्रभा गणोरकर, आशा बगे वापरताहेत तशीच- त्यांना उपलब्ध असलेली एक भाषा. पण त्यांचा शोध वेगळाच आहे. म्हणून मग सुरुवात झाली आहे ती 'स्त्रीजन्म म्हणवुनी न व्हावे उदास' इथपासून. तो उदासपणा वाटू न देणाऱ्या संतांची सोबत महत्त्वाची आहे, हे कृतज्ञतेने सांगण्यापासून झाली आहे.

मग 'स्त्रियेचे शरीर, पराधीन देह, न चाले उपाव विरक्तीचा' असं बहिणाबाईंचं म्हणणं, 'देहावरी तुझी सत्ता असे जाण, माझेवरी तुझी अगदी नाही' असं विठाबाईचं म्हणणं ही एक



**सांस्कृतिक समृद्धीचं लक्षण म्हणून सतत आपण विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा आणि त्यातून निर्माण झालेल्या सोयी-सुविधांचा उल्लेख करतो. पण खरं पाहता माणसाचं सजग, संवेदनापूर्ण असं आंतरजीवन आणि तिथली सृजनशीलतेची गजबज हेच सांस्कृतिक समृद्धीचं मुख्य लक्षण आहे. त्यामुळे हे जणू ओळखल्यासारखा स्त्रियांच्या लेखनाचा सारा मोहरा भौतिक जग, विज्ञान-तंत्रज्ञान, राजकारण आणि अर्थकारण यांच्या पलीकडच्या अधिक गंभीर अशा मानवी संबंधांकडे आणि आपल्याच आतल्या जगाकडे वळलेला दिसतो.**

बाहेरच्या नकारांपासून झालेली सुरुवात आहे. स्वत:च्या शोधाची सुरुवात आणि त्या बायका तेवढ्यावरच थांबलेल्या नाहीयेत. त्या पोचल्यायत 'अवघा रंग एक झाला, रंगी रंगला श्रीरंग' इथपर्यंत. 'देव खाते, देव पिते, देवावरी मी निजते' असं म्हणता म्हणता 'जनी म्हणे विठाबाई, भरुनी उरले अंतर्बाही' इथपर्यंत.

आणि हा जो एक प्रवास आहे बायकांनी केलेला, तो एका काळापुरता नाहीच आहे. तो दर कालखंडात पुन्हा पुन्हा करावा लागणारा प्रवास आहे. पुन्हा या आताच्या काळात रजनी परुळेकर काचांचे तुकडे धगीवर वितळवत, जोडत, काचकमळं बनवणाऱ्या आणि ज्योतीकडे एकाग्रपणे पाहत तिच्याभोवती जमलेल्या बायकांचं गाणं गातच आहेत. कमल देसाईंची हॅट घालणारी बाई एका स्वप्नाच्या नादात, शोधात निघतेच आहे. आशाताईंची कथा-कादंबरी सगळ्या अस्थिरतेतल्या पडझडीनंतरच्या स्थिरतेचा ध्यास घेतेच आहे. एखादी मेघना पेठे इतरांनी शोधलेल्या वाटांवरून चालताना जेव्हा आपलं दु:ख निवत नाही तेव्हा आपल्या सुखाची हरणवाट आपणच शोधायला हवी म्हणत लिहितेच आहे.

ही म्हणजे शुकतालिका न्यायाची चित्रं आहेत. पोपट फांदीला उलटा लोंबकळतो आहे आणि त्याला कळत नाहीये की फांदी सोडली तरी तो पडणार नाहीये. तो उडू शकतो म्हणून. पण आजच्या लेखिकांकडे- कथाकार, कादंबरीकार, ललित गद्यकार, कवयित्री- सगळ्याजणींच्या लेखनाकडे पहा. सगळ्या गंभीर, प्रामाणिक, आत्मप्रत्ययाचं लेखन करणाऱ्या या सगळ्याजणींचे 'शुकशकुन' तुम्हाला त्या लेखनात दिसतील. फांदी सोडून आपण पडत नाही तर उडतो. हे लक्षात येण्याचे शकुनक्षण त्या प्रत्येकीच्या लेखनात विखुरलेले आहेत आणि त्या क्षणामागची सगळी आकांताची धडपडही त्यांच्या लेखनात आपल्याला दिसते.

ती फांदी कशाची आहे..., परंपरेची, पुरुषसत्तेची, शोषक व्यवस्थेची की स्वत:च्या अज्ञानाची?-इथपासून आधी समजून घेणं आहे आणि मग फांदी सोडणं आहे. उडण्याची प्रत्येकीची शक्ती निराळी असली तरी त्यासाठी मोजलेली किंमत आणि अनुभवलेला उडण्याचा अर्थ यांचं महत्त्व सगळ्या लिहित्या लेखिकांसाठी खूपच मोठं आहे.

शिवाय या लेखिकांनी पुष्कळच काही करून ठेवलं आहे. माणसांमाणसांतली ओल कमी होण्याचे कोरडे ऋतू दीर्घ होत असताना, मनातल्या भूमिगत प्रवाहांचा त्यांनी चालवलेला शोध; जात, वर्ग, धर्म यांचा त्यांनी केलेला सूक्ष्म विचार; त्यांनी शोधलेले जुन्या-नव्याचे ताण, भावात्मता आणि बौद्धिकता यांची सांगड घालत त्यांनी उघड केलेल्या लेखनाच्या वेगवेगळ्या शक्यता, त्यांनी रूढ संकेत नाकारून उभी केलेली स्वतंत्र, कणखर नैतिकता, लोककथांचे, पुराणकथांचे त्यांनी लावलेले नवे अन्वय, आपल्या कारावासाचं स्वरूप समजून आल्यावर त्यांनी घेतलेला सुटकेचा अथक शोध, त्यांनी दूर केलेली स्वत:वरची आवरणं आणि रोमँटिसिझमची पुनर्रचना करण्याचं त्यांचं साहस, पुरुषसापेक्षातच फक्त नव्हे तर एकूणच परावलंबन नाकारून एकटेपणाच्या जाणिवेचा त्यांनी केलेला निखळ करारी स्वीकार आणि निर्मितिशक्तीचा शोध घेता घेता कलानुभवातून, सौंदर्यानुभवातून त्यांनी केलेला जीवनाविषयीच्या आस्थेचा सूक्ष्मसुंदर विस्तार...

मग त्या लोकप्रतिभेचं महानपण घेऊन आलेल्या बहिणाबाई चौधरी असोत, आत्मचरित्राचा मानदंड निर्माण करणाऱ्या लक्ष्मीबाई टिळक असोत, स्त्रीजीवनाविषयी मर्मदृष्टी असणाऱ्या मालतीबाई बेडेकर असोत, समीक्षक आणि कथालेखक कुसुमावती देशपांडे असोत किंवा दुर्गाबाई-इरावतीबाईंसारख्या प्रज्ञावती असोत किंवा गौरी देशपांडे, इंदिरा संत, आशा बगे, उषा किरण, आत्राम ते प्रज्ञा पवार, प्रतिमा जोशी... नावं घेता येऊ नयेत इतकी ही गजबज आश्वासक आहे.

या आश्वासकतेची आठवण करून देण्यासाठी हे संमेलन उपयोगी व्हावं आणि लेखक-लेखिका, स्त्री-पुरुष, जात-धर्म, प्रदेश-देश या सगळ्यांपलीकडे असलेल्या निर्मितीच्या पवित्र क्षेत्रात अवघा रंग एक व्हावा, असं घडण्याकडे आपण जात राहावं अशी इच्छा आहे.

शिवाय प्रादेशिकतेचा अहंकार नसलेल्या पण जगण्याशी घट्ट जोडलेल्या नव्या कसदार साहित्याचं मोल आपल्या सर्वांच्याच ध्यानात यावं आणि उद्याचा एखादा मोठ्या ताकदीचा कवी-लेखक आपल्यामधून पुढे यावा यासाठी हे संमेलन यशस्वी व्हावं-ठरावं अशीही इच्छा आहे.

◆

**डॉ. अरुणा ढेरे**
दूरध्वनी : ०२०-२४२२०२८०



# व्यापक वाङ्‌मयीन दृष्टीकोन बाळगणारा समीक्षक
# म. द. हातकणंगलेकर

जन्म : १ फेब्रुवारी १९२७, मृत्यू : २४ जानेवारी २०१५

**म. द. हातकणंगलेकर यांच्या निधनाने मराठी समीक्षेच्या विश्वातील एक संयत, स्वागतशील व मर्मग्राही समीक्षक काळाच्या पडद्याआड गेला आहे. हातकणंगलेकरांच्या साहित्यिक कार्यकर्तृत्वावर तसेच व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारा हा लेख.**

**रणधीर शिंदे**

म. द. हातकणंगलेकर यांचे २४ जानेवारी २०१५ रोजी वयाच्या ८८व्या वर्षी निधन झाले. महाराष्ट्रातील साहित्यिक-सांस्कृतिक व शैक्षणिक जीवनाशी ते दीर्घकाळ संबंधित होते. सांगली येथील विलिंग्डन महाविद्यालयातून इंग्रजी भाषा साहित्याचे प्राध्यापक व प्राचार्य म्हणून ते निवृत्त झाले होते. हातकणंगलेकर यांनी विविध प्रकारचे लेखन केलेले असले तरी त्यांची मराठी जगताला ओळख आहे ती समीक्षक म्हणून. म. द. हातकणंगलेकरांची समीक्षा ही विविधस्वरूपी आहे. 'साहित्यातील अधोरेखिते' या ग्रंथाच्या छोट्याशा प्रास्ताविकात त्यांनी म्हटले आहे, की इंटर आर्ट्सला असताना राम गणेश गडकरी यांचे 'एकच प्याला' हे नाटक अभ्यासाला होते. या नाटकावरची अतिशय अभ्यासपूर्ण टिपणे त्यांनी काढली होती. त्या वेळी ती टिपणे पाहून त्यांच्या वर्गातील एका मित्राने त्यावर लिहिले होते, 'तुम्ही पुढे टीकाकार होण्याची शक्यता आहे.' हातकणंगलेकरांची समीक्षा साहित्यातील अधोरेखिते (१९८०), मराठी कथा : रूप आणि परिसर (१९८६), साहित्यविवेक(१९९७), भाषणे आणि परीक्षणे (२००३), स्मरणे आणि क्षणचित्रे या ग्रंथांत समाविष्ट आहे. याशिवाय त्यांचे 'साहित्यसोबती', 'आठवणीतील माणसं' हे व्यक्तिचित्रांचे संग्रह प्रसिद्ध आहेत, तर 'उघडझाप' हा आत्मचरित्रपर लेखांचा संग्रह आहे. याशिवाय त्यांनी काही महत्त्वाची संपादने केली आहेत. चर्चासत्रांतील निबंध, परीक्षणे, वाङ्‌मयीन लेख असे त्याचे स्वरूप आहे. त्यात त्यांच्या प्रस्तावनांचा समावेश आहे.

हातकणंगलेकरांनी प्रामुख्याने कथासाहित्याची समीक्षा सातत्याने लिहिली. 'मराठी कथा : रूप आणि परिसर' या आणि त्यांच्या इतरही समीक्षाग्रंथांत हे लेख समाविष्ट आहेत. मराठीतील विविध कथाकारांवर त्यांनी विस्ताराने लिहिले. त्याचबरोबर कथा या साहित्य प्रकाराचे सैद्धान्तिक विवेचन करणारे व सामर्थ्य विशद करणारे लेख लिहिले. हे करत असताना त्यांच्या समीक्षेत आंतरिक अशी तौलनिक दृष्टी आहे. विशेषत: मराठी कथाकारांची तुलना त्यांनी पाश्चात्त्य चेकॉव्ह, टॉलस्टॉय, ओ हेन्री या कथाकारांशी केली आहे. अर्धशतकातील मराठी कथेच्या विविध वळणांचा, अंत:प्रवाहांचा धांडोळा त्यांच्या समीक्षेत आहे. जागतिक कथेच्या दृष्टीने मराठी कथा क्षीण असल्याचे त्यांनी नोंदविले आहे. या दृष्टीने त्यांनी नवकथा, नागरकथा आणि ग्रामीण कथेवर लिहिले. गंगाधर गाडगीळ, प्रभाकर पाध्ये, दि. पु. चित्रे, श्री. दा. पानवलकर यांच्या कथेवर लिहिले. जी. ए. कुलकर्णी व श्री. दा. पानवलकरांच्या कथासाहित्यावर विस्ताराने लिहिले. जी.ए तर त्यांचे आवडते कथाकार. 'कथासाधना' या लेखात त्यांनी जी. ए. कुलकर्णी यांच्या कथेची सामर्थ्ये विशद केली आहेत. जी.एं.ची एकेक महत्त्वाची कथा घेऊन त्यावर भाष्य केले आहे. जी. एं.च्या कथेतील नियतीचे, मृत्यूचे, गूढतेचे चित्रण; दु:खानुभूतीच्या विविध परी, शापित वात्सल्य व कथारूप या सूत्रानुरोधाने त्यांनी जी.एं.च्या कथेचे वेगवळेपण सांगितले आहे. हे सांगत असताना जी. एं.च्या कथेतील सजातीय प्रतिमांचे जाळे आणि त्यांच्या कथेची रंगनिदर्शक नावे यासंबंधीचे

मार्मिक भाष्य ते करतात. नोव्हें. ते डिसें. १९७०च्या 'समाजप्रबोधन पत्रिके'त त्यांचा 'मराठी कथेच्या वेदना आणि विभ्रम' हा दीर्घलेख प्रसिद्ध झाला. तो पुढे 'मरण आणि वेलबुट्टी' या नावाने पुस्तिकेच्या रूपातही प्रकाशित झाला. या प्रदीर्घ लेखात सत्तरच्या दशकात प्रकाशित झालेल्या आठ कथाकारांच्या कथेविषयी त्यांनी लिहिले आहे. या काळातील मराठी कथेतील विविधतेचे व सामर्थ्यस्वरांचे विवरण या लेखात आले आहे.

कादंबरीवरील समीक्षेत त्यांनी भालचंद्र नेमाडे, रंगनाथ पठारे, सुभाष भेंडे, मधु मंगेश कर्णिक यांच्या कादंबरीवर लिहिले आहे, तसेच लोकप्रिय मराठी कादंबरीची मीमांसाही केली आहे. भालचंद्र नेमाडे यांची 'कोसला' ही कादंबरी अस्तित्ववादाचा निखळ देशी अवतार वाटतो, असे त्यांनी म्हटले आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी समीक्षा हा त्यांच्या चिंतनाचा एक महत्त्वाचा विशेष होता. बा. सी. मर्ढेकर, प्रभाकर पाध्ये, शरच्चंद्र मुक्तिबोध, दि. के. बेडेकर ते दि. पु. चित्रे, भालचंद्र नेमाडे यांच्या समीक्षेबद्दल त्यांनी लिहिले आहे. यात मराठीतील सैद्धातिक व प्रत्यक्ष स्वरूपाच्या समीक्षाकामगिरीचा विचार त्यांनी केला आहे. नवे साहित्य हा त्यांच्या नेहमी कुतूहलाचा विषय राहिला. आपल्या काळातील नव्या, प्रयोगशील साहित्याला त्यांनी सातत्याने प्रतिसाद दिला, त्याचे कौतुक केले. सामाजिकदृष्ट्या नव्या अनुभवांना प्रवेशित करणाऱ्या साहित्याची भलावण केली.

हातकणंगलेकर यांच्या एकूण समीक्षेत आस्वादात्मकता मोठ्या प्रमाणात आहे. साहित्याचा मन:पूर्वक आस्वाद घ्यावा व तो वाचकांना समजून सांगावा अशी नम्र धारणा त्यामध्ये आहे. मात्र, हे करीत असताना ही आस्वादात्मकता केवळ वरवरची वा शब्दबंबाळ स्वरूपाची नाही, साहित्याचा केवळ गौरव करणारी नाही, तर साहित्याच्या विश्लेषणाकडे जाणारी, त्यासंबंधी काही एक आकलन मांडू पाहणारी समीक्षा आहे. वाचकांना साहित्याच्या आकलन-विश्लेषणास मदत करणारी ही समीक्षा आहे. तीकडे जाण्याची पाऊलवाटच एका अर्थाने या समीक्षेने उपलब्ध करून दिली असे म्हणता येईल. हातकणंगलेकरांच्या साहित्यावरील आंतरिक प्रेमाचे ती द्योतक आहे. त्यामुळे त्यांच्या समीक्षेची भाषा ही रूक्ष वा तांत्रिक स्वरूपाची नाही. अतिशय सोपी भाषा ते वापरतात. प्रतिमा, दृष्टान्त व काही वेळा ती गौरवपर रूप धारण करते.

या प्रकारच्या आस्वाद-समीक्षारूपाबाबत रा. भा. पाटणकर व त्यांच्यात एक वादही झाला. पाटणकरांच्या तिखट शब्दांतील वादचर्चेला हातकणंगलेकरांनी स्वभावाला अनुसरून नम्र अशा भाषेत उत्तर दिले. 'आस्वादक समीक्षेची किंचित कैफियत' या शीर्षकातूनही तो भाव सूचित होतो. या लेखात त्यांनी म्हटले होते, 'साहित्य आणि ललित कथा यांचे स्वरूप बऱ्याच प्रमाणात अंत:प्रेरणेने जाणावयाचे असते. त्याची वस्तुनिष्ठता ही पदार्थविज्ञानातले सत्य नसते असे मानणाऱ्या कलाप्रेमी माणसांचा एक मोठा वर्ग आहे. भाषा हे सत्यशोधनाचे साधन असले, तरी भाषा आणि केवळ परिभाषेत सर्व काही पकडता येते असे त्यांना वाटत नाही. आस्वादकाच्या भूमिकेवर त्यांचे समाधान असते.' या अवतरणातून हातकणंगलेकरांच्या समीक्षेचे स्वरूप ध्यानात यायला हरकत नसावी. वाङ्मयीन पर्यावरणातील अशा एका मोठ्या वाचकवर्गाचे प्रतिनिधित्व करणारी ही समीक्षा आहे. या कल्पनेत काही एक सुबोधपणा वाटत असला तरी हातकणंगलेकरांच्या भूमिकेशी व वाचकवर्गाशी ते सुसंगतच म्हणावे लागेल. त्यामुळे तांत्रिक, क्लिष्ट भाषेत जे साहित्य-स्वरूप पकडता येत नाही ते आस्वादपातळीवर पकडण्याचा प्रयत्न हातकणंगलेकरांच्या समीक्षेत आहे. त्यामुळे त्यांच्या समीक्षालेखांच्या शीर्षकांपासून ते त्यांच्या एकत्रित संस्कारात ही आस्वादरूपे मोठ्या प्रमाणात आढळतात. हे दु:ख आणि ते दु:ख, मरण आणि वेलबुट्टी, आजच्या कथेच्या वेदना आणि विभ्रम, खाली उतरलेलं आकाश, पिंपळातले सोने, गाडगीळ यांच्या विनोदातील ऊन आणि सावल्या या लेखशीर्षकांतून हातकणंगलेकरांचे समीक्षास्वरूप ध्यानात येते. भाषेत काव्यात्मकता, काही ठिकाणी अलंकारिता व वाङ्मयीन व्यासंगातून प्रकटलेली शब्दरूपे जाणीवपूर्वक येतात. भाषा अधिक सफाईदार व तत्क्षणीचा आस्वाद लालित्यपूर्ण भाषेत नोंदविणारी ठरते.

म. द. हातकणंगलेकर यांनी काही आत्मपर व व्यक्तिचित्रणपर स्वरूपाचे लेखन केले आहे, 'उघडझाप' हा हातकणंगलेकर यांचा आत्मपर लेखांचा संग्रह. सलग अशा इतिहासक्रमात ती सांगितली गेलेली नाही. त्यामुळे त्यांनी यास आत्मचरित्र म्हणण्याऐवजी आत्मपर लेखसंग्रह म्हटले आहे. हातकणंगलेकरांच्या आयुष्यातील विविध टप्प्यांचे, घटनांचे, व्यक्तींचे चित्रण या आत्मपर लेखनात आहे. हे सारे लेखन भूतकाळाशी निगडित आहे. त्यांच्या तरल, संवेदनशील मनातील या पूर्वस्मृती आहेत. बालपणापासून ते अमृतमहोत्सवी वयापर्यंतच्या आठवणी या लेखनात आहेत. भावजीवनात घर करून राहिलेल्या अनेक प्रसगांची ही साखळी आहे. हातकणंगलेकर यांच्या लेखनाचा महत्त्वाचा विशेष म्हणजे गतस्मरणरंजन. या गतस्मरणरमणीयतेने त्यांचा सतत पाठलाग केलेला असावा. आठवणींचे मोहोळ, आठवणींच्या जगात, पूर्वस्मृतीची अपूर्वाई, स्मरणगाथा हे शब्द त्यांच्या लेखनात वारंवार येतात. या दृष्टीने ते लेखन केलेले आहे. 'अर्धशतकातील स्मरणे' या लेखात त्यांनी म्हटले आहे, 'मन किती मागे धावते! धुक्यात हरवलेल्या आठवणींचा परिसर! मन हळवे, भावुक बनते का? बनते. त्यात कमीपणा, ओशाळवाणेपणा वाटण्याचे काही कारण दिसत नाही.' या दृष्टीने हा सारा आठवप्रपंच त्यांनी या लेखनातून मांडलेला

आहे.

काही लपवावे हा हेतू मनात न ठेवता त्यांनी अतिशय संयमपूर्ण व संक्षिप्तपणे हे लेखन केलेले आहे. यात बालपण, कुटुंबातील वातावरण, आप्तांची मरणसाखळी, वडलांचे मनाला चटका लावणारे अपघाती मरण व शाळा-कॉलेजातील वातावरण त्यांनी सूचित केले आहे. त्यांच्या भावजीवनाचा अतूट भाग असलेल्या वडील, आत्ती ते मित्रांची रेखीव व्यक्तिचित्रणे या लेखनात आहेत. अतिशय ओघवत्या प्रवाही गद्यभाषेत त्यांनी या आठवणी सजीव केल्या आहेत. आप्तांच्या मरणदर्शनामुळे मरणाविषयी त्यांच्या मनात एक अढी निर्माण झाली होती. मनाला उमटणारे चरे याविषयीचे निवेदन तीमध्ये आहे. सहवासात आलेल्या व्यक्तींबरोबरचे विश्रब्ध वार्तालाप त्यामध्ये आहेत. हातकणंगले, सांगली, कोल्हापूर परिसरातील चित्रणाबरोबरच त्यांच्या जीवनाशी निगडित असणाऱ्या धारवाडचे विस्ताराने चित्र या आत्मपर लेखनात आहे. विशेषत: कथालेखक जी. ए. कुलकर्णी यांच्यासंबंधित चार लेख या पुस्तकात आहेत. जी. ए. कुलकर्णी यांची मराठी साहित्यात लेखकीय मिथ होती. त्यांनी आपले खासगीपण हेतुपूर्वक जपले होते. जी. ए. कुलकर्णी आणि हातकणंगलेकर यांची चांगली मैत्री होती. धारवाडमधील या कार्यकाळाविषयी जी. एं.च्या स्वभावदर्शनावर प्रकाश टाकणारे अनेक स्रोत या जी. एं.वरील लेखांत आहेत. विसंगतीने व तऱ्हेवाईकतेने भारलेल्या व्यक्तिमत्त्वातील काही एक सुसंगती शोधण्याचा प्रयत्न या लेखांत आहे. आपल्या स्वामित्वावर बंधन येईल या उद्देशाने जी. ए. माणसांपासून सावध अंतर बाळगत असत. जी. एं.च्या व्यक्तिमत्त्वाची व त्यांच्या साहित्यातील चित्रणप्रदेशाची काही रहस्ये हातकणंगलेकरांच्या या निवेदनात आहेत. हातकणंगलेकर यांनी म्हटल्याप्रमाणे या माणसांनी माझ्या आयुष्यातल्या अनेक घटना सुखदायी व समाधानी करून टाकल्या आहेत. त्याबद्दलची अंत:करणापासूनची कृतज्ञता या लेखनातून व्यक्त झाली आहे.

हातकणंगलेकर यांची दोन व्यक्तिविषयक पुस्तके प्रकाशित आहेत. साहित्यसोबती (१९९७) व आठवणीतली माणसं (२००५). तसेच स्मरण आणि क्षणचित्रे या लेखसंग्रहातही काही लेख आहेत. आयुष्याच्या वाटचालीत संपर्कात आलेल्या मित्रांच्या आठवणी त्यात आहेत. विशेषत: वाङ्मयीन क्षेत्रातील सुहृदांच्या या आठवणी आहेत. व्यंकटेश माडगूळकर, जी. ए. कुलकर्णी, मे. पुं. रेगे, श्री. दा. पानवलकर, स. शि. भावे, विद्याधर पुंडलिक, कमल देसाई, गौरी देशपांडे, प्रकाश संत, मालतीबाई किर्लोस्कर अशा साहित्यकांची ही व्यक्तिचित्रे आहेत. त्या त्या व्यक्तींचे, त्यांच्या स्वभावाच्या अलक्षित पैलूंचे दर्शन त्यामध्ये आहे. शिवाय त्यांच्या वाङ्मयाविषयीची मार्मिक निरीक्षणे आहेत. या दृष्टीने गौरी देशपांडे व जी. ए. यांची व्यक्तिचित्रे अवश्य पाहावीत. वाङ्मयाच्या व मानवी सद्भावाच्या आस्थेपोटी केलेले हे लेखन आहे. स्मरणात राहिलेल्या अनेक मित्रांवर, लेखकांवर त्यांनी मनापासून लिहिले आहे. हे मित्र व साहित्यिक विविधस्तरीय व भिन्न भिन्न लेखन-संवेदनस्वभावाचे आहेत. बालपणीच्या मित्रांपासून ते अनेक साहित्यिक स्नेह्यांबरोबर, इंग्लंडमध्ये भेटलेल्या मराठी चित्रकारापासून ते पारशी मित्र जहांगीर इराण्यापर्यंतची ही चित्रे आहेत. या माणसांच्या आयुष्यातील चढउतार, परिस्थितीचे चटके, सुखदु:खाचे प्रसंग यांचे संक्षिप्त आलेख त्यामध्ये आहेत. शिवाय उभयतांच्या संबंधातले स्नेहाचे भावस्पर्शित्व आहे. मैत्रभावाचा, सहवासक्षणांचा आठव आहे. या मित्रांशी ते आंतरिकरीत्या एवढे बांधले गेले असल्यामुळे त्यांच्या नाहीसे होण्यानंतरची, अटळ अशा मृत्युक्षणाची भीती सतत त्यांच्या मनात वावरत होती. बालपणी वडिलांच्या मृत्यूच्या अशाच विदारक अनुभवाने ते थबकले होते. एक-दोन ठिकाणी त्यांनी फार उत्कटपणे नोंदवूनही ठेवले आहे, की मृत्यूच्या छायेत वावरणाऱ्या मित्रांना पाहण्याचा त्यांना आतून त्रास होतो. जवळचे मित्र व्यंकटेश माडगूळकर यांच्या मृत्यूनंतर अंत्यदर्शनाला जायचे त्यांनी टाळले. त्यांनी म्हटले आहे, निकटच्या माणसांचे मृतदर्शन घेणे मी टाळतो. ती माझ्या मनाची एक दुर्बलता आहे. त्यांनी लिहिलेले व्यक्तिविषयक लेखन हे एका अर्थाने त्यांचे आत्मचरित्रच आहे.

काही पाश्चात्त्य लेखकांवरही हातकणंगलेकर यांनी लिहिले आहे. भारतीय इंग्रजीमध्ये लेखन करणाऱ्या आर. के. नारायण, मनोहर माळगावकर तसेच अनिवासी भारतीय लेखक व्ही. एस. नॉयपॉल या लेखकांवर त्यांनी लिहिले, तर 'साहित्यसोबती' या ग्रंथात आल्डस हक्सले, सॉमरसेट मॉम, जॉर्ज सिम्ना या पाश्चात्त्य लेखकांवर लिहिले आहे. त्यांचा 'भारतीय जीवनाची नाजूक भाष्यकार रूमर गॉडन' हा लेख पाहावा म्हणजे त्यांच्या इंग्रजी साहित्याचा व्यासंग व मार्मिकता आपल्या ध्यानात येते.

म. द. हातकणंगलेकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचा व समीक्षादृष्टीचा आस्थेवाईकपणा प्रत्येक पिढीला वाटत आला आहे. मानवी आस्थेचे, सहानुभवाचे, संपर्क जोडण्याचे माध्यम म्हणून ते साहित्य कलाव्यवहाराकडे पाहत असावेत. त्यामुळेच आपल्या समकालीन लेखकांना ते जसे जवळचे, समानधर्मी वाटायचे तसेच ते नव्या पिढीलाही नेहमी जवळचे वाटत होते. श्रीनिवास कुलकर्णी, व्यंकटेश माडगूळकर, सखा कलाल, चारुता सागर, जी. ए. कुलकर्णी या समकालीनांवर त्यांनी जसे लिहिले तसेच कृष्णात खोत, पकंज कुरूलकर, प्रदीप पाटील अशा नव्या लेखक-कवींवर त्यांनी लिहिले. अगदी आधीच्या पिढीतील बा. सी. मर्ढेकर, इंदिरा संत, शरच्चंद्र मुक्तिबोध या मातब्बर लेखक कवींवरही त्यांनी लिहिले. नव्या साहित्याचे त्याच्या सामर्थ्य-मर्यादांसह त्यांनी स्वागत केले. आपल्या परिसरातील गुणवान लेखकांच्या

साहित्याचे प्रकाशन प्रतिष्ठित प्रकाशनसंस्थांनी करावे अशी त्यांची धारणा होती व त्यासाठी त्या लेखकांना ते मदतही करत. दादासाहेब मोरे, विमल मोरे आदींची पुस्तके त्यांच्याच प्रोत्साहनामुळे प्रकाशित झाली. चारुता सागरांवरही याच तऱ्हेचे त्यांचे प्रेम होते.

हातकणंगलेकरांच्या समीक्षेत वाचकांशी एक प्रकारची संवादशीलता आहे. श्रीनिवास कुलकर्णी यांच्यावरील लेखाचा शेवट करताना त्यांनी लिहिले आहे, 'कुलकर्णी यांच्या अनुभवाची ही रीत मराठीत मला विरळा व ललितोत्तम भासते.' तर सखा कलाल यांच्या 'ढग'वरील परीक्षणाचा शेवट करताना वाचकांना नम्रतापूर्वक विनंती केली आहे. या कथालेखनाकडे वाचकांचे दुर्लक्ष होऊ नये, ती नीट समजून घ्यावी यासाठी शेवटी लिहिलं आहे. 'या अबोल, सात्त्विक गुणी माणसाच्या बाबतीत असे घडू नये. हे साहित्य लक्षपूर्वक न्याहाळावे. चंद्रशेखर जहागिरदार यांना म्हटले आहे, 'ज्यांच्याशी बोलताना आपल्याला पिढीतले अंतर कधीच जाणवत नाही.' 'हातकणंगलेकर यांची समीक्षावृत्ती केवळ सैद्धान्तिकतेच्या आग्रहातून येणारी तर्ककर्कशता टाळून आणि निखळ आस्वादकतेतून येणारी भावप्रधानता या दोन्ही टोकांना टाळून त्यांचा मध्यबिंदू साधते असे वाटते,' असे सांगून 'श्री. के. क्षीरसागरांच्या पद्धतीची समीक्षा लिहिणारा अखेरचा समीक्षक' अशा शब्दांत जहागिरदारांनी त्यांचा गौरव केला आहे.

हातकणंगलेकरांच्या व्यक्तिमत्त्वाचा महत्त्वाचा विशेष म्हणजे त्यांचे माणसांवरील प्रेम. साहित्यप्रेम हा त्यांच्या या प्रेमाचा एक महत्त्वाचा आविष्कार. संपर्कात आलेल्या अनेकांशी ते फार प्रेमाने, मृदुभावाने व सुजनत्वाने वागायचे. सुजनत्व हा त्यांचा नेहमीच्या वापरातला शब्द. सांस्कृतिक जीवनात अतिशय आस्थापूर्वक त्यांचा सहभाग असायचा. स्मरणे आणि क्षणचित्रे या लेखसंग्रहाच्या मनोगतात त्यांनी म्हटले आहे, 'माणसे मला अभिजात साहित्यकृतीप्रमाणे हृदयाला स्पर्श करणारी वाटत आली आहेत. सर्व तऱ्हेच्या माणसांना जीव लावावा, त्यांना जवळ करावे, असे मला आजपर्यंत वाटत आले आहे. खेड्यातील शाळेतील माझे सर्व जातिधर्मांतील मित्र आणि गरीब, श्रीमंत, गावपाटील, मामलेदार अशा किती तरी सवंगड्यानी माझे मन रिझवले आहे, मला बांधून ठेवले आहे.' या प्रकारचा कृतज्ञताभाव त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा व लेखनाच्या गाभ्याचा विषय राहिला. त्यांच्या सबंध दृष्टीमागे हा भाव कायम वसत आणि झरत आलेला होता. या भावाची उतराई ते आपल्या प्रत्यक्ष वर्तनातून व लेखनातून व्यक्त करत होते. हातकणंगलेकर सर हे प्रा. गो. मा. पवार सरांचे व्याही. त्यामुळे अनेकवार त्यांना एकत्र पाहण्याचा, भेटण्याचा योग आला. सानिया आणि सनथ (बिटू) या नातवांवर हातकणंगलेकरांचे अतिशय प्रेम. त्यांच्या शैक्षणिक व इतरही आवडीच्या छंदांविषयी त्यांना अपार कौतुक. या आवडीपोटी व सहवासक्षणांबद्दल त्यांनी 'मौज'च्या दिवाळी अंकात व दै. 'सकाळ'च्या एका रविवार आवृत्तीत नातवंडांवर लेख लिहिले होते.

त्यांच्या स्वभावात एक संथ, खोलवरचा मिश्कीलपणा दडलेला होता. आपल्या खास अशा शैलीत त्याचा ते उच्चार करायचे. व्यक्तिस्वभावाबद्दलची फार मार्मिक निरीक्षणे सहजपणे त्यांच्या तोंडून बाहेर पडायची. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवडून आल्यानंतर तत्काळ त्यांच्या मित्रांनी एक छोटेखानी अनौपचारिक सत्कार पुण्यातील एका प्रकाशनसंस्थेच्या कार्यालयात आयोजित केला होता. या प्रकाशनसंस्थेचे कार्यालय छोटे होते. तिथे एकदम गर्दी झाली. त्या वेळी कुणी तरी म्हणाले, ''सर, उभे राहा, तुम्हाला हार घालायचा आहे.'' त्या वेळी ते तत्परतेने म्हणाले, ''इतके वर्ष झाले मी उभाच होतो.'' त्यांचे जवळचे काही स्नेही गमतीने त्यांचा उल्लेख मराठीचे देवेगौडा किंवा एम.डी.एच. (मसाले) असा करायचे. ते ऐकून पापण्यांची संथ उघडझाप करून ते मंद हसायचे. समकालीन मित्रांबद्दल, त्यांच्या कर्तबगारीबद्दल उमदेपणाने, गौरवाने आस्थापूर्वक उल्लेख करायचे. गो. मा. पवार सरांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त कोल्हापुरात आयोजित केलेल्या चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभाच्या भाषणात ते म्हणाले होते, की प्रा. पवार यांचे वेगवेगळ्या क्षेत्रांतले विद्यार्थी पाहून मला असे वाटते, की संगीत-गायनक्षेत्रात जशी गुरू घराण्यांची परंपरा असते, तशी प्रा. पवार यांचे शैक्षणिक व समीक्षाक्षेत्रातले पवार घराणे आहे. याचा मला मनस्वी आनंद वाटतो.

जुन्या आठवणींत त्यांना रमायला फार आवडायचे. मित्रांसमवेतच्या गप्पांत असे विषय निघाले की ते बैजवार संथपणे त्या हकिकती सांगायचे. हे त्यांचे सांगणे विशिष्ट संथ लयीतले विश्रब्ध असे कथन असायचे. प्रेमभावाने व मृदू अंतःकरणाने ते रचलेले असायचे. ऐकत राहावे असे वाटणारे. ते ज्या वेळी सांगायला सुरूवात करायचे त्या वेळी समवेतचे लोक नि:शब्द असायचे. त्यांच्या सांगण्यात मन:पूर्वकता व अंत:करणातील ओलाव्याची सहृदयता असायची. ओथंबलेपणाने भारलेला अवकाश त्यांच्या संथ-अल्प-स्वल्प विरामाच्या मोकळ्या जागांनी सांधलेला असायचा. ऐकणाऱ्याला आपण नवे ऐकल्याचे समाधान देणारा. कुणाही व्यक्तीविषयीचा विखार वा असूया त्यामध्ये नसायची. त्यामुळे हे ऐकणे निखळ निर्मळपणाचे असायचे. साहित्य व माणूसपणावर अपरंपार प्रेम करणारा मागच्या पिढीतील हा उदारमतवादी समीक्षक आता काळाच्या पडद्याआड गेला आहे. त्यांना विनम्र श्रद्धांजली.

◆

**डॉ. रणधीर शिंदे**
भ्रमणध्वनी : ९८९०९१३०३
madhurang76@yahoo.co.in

# समाजभान जपणारी लेखिका सरिता पदकी



मंदा खांडगे

**ज्येष्ठ लेखिका सरिता पदकी यांचे नुकतेच निधन झाले. गेल्या सहा दशकांहून अधिक काळ कथा, कविता, ललित गद्य, संपादन, अनुवाद, बालसाहित्य, नाटक असे अनेकविध साहित्यप्रकार हाताळत त्यांनी विविधांगी लेखन केले. त्यांच्या कार्यकर्तृत्वावर आणि व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारा हा लेख...**

जन्म : १८ डिसेंबर १९२८, मृत्यू : ३ जानेवारी २०१५

१९९६ साली आळंदीला अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन झालं. शांताबाई शेळके त्या संमेलनाच्या अध्यक्ष होत्या. पुणे-आळंदी अशी रोजची वारी करत संमेलनाला तीनही दिवस हजेरी लावता आली होती. साहित्य संमेलनात दुसऱ्या दिवशी निमंत्रितांचं कविसंमेलन रंगलं होतं. सरिता पदकी त्यात सहभागी होत्या. सरिताबाईंनी व्यासपीठावरून आपली कोरी करकरीत कविता सादर केली. आज सातशे वर्षांनंतर मला जर मुक्ताबाई भेटली तर काय म्हणेल, असा आशय त्या कवितेत होता आणि तो अर्थगर्भ होता. ज्ञानेश्वर माउलींच्या आळंदीत कवितेला रंग भरत होता. आम्ही साहित्यप्रेमी त्याच्या साक्षीदार होतो...

*''परवाच मला मुक्ताबाई भेटली*
*तिच्या मुखावर होती विजेची झळाळी*
*आभाळातल्या विजेनेच*
*तिला कवेत धरली होती ना!*
*माझ्याकडे बघून मुक्ताबाई हसली*
*म्हणाली, ''का गं माझ्या लेकी,*
*माझी वारस असूनदेखील*
*तू का अशी विषण्ण?''*

शेवटच्या कडव्यात मुक्ताबाई म्हणते...

*''पोरी, अगं जगच वन्हीचं असतं*
*पण आपण, आपण पाणी असतो*
*आपलं पाणीपण ओळखून*
*आपण वन्हीशी खेळायचं असतं*
*असं केलं की जय आपलाच असतो*
*नि-नि बीजही आपलीच असते!''*

कविता अजूनही पुरी होत होती..
पण कवितेचं स्वागत प्रचंड टाळ्यांच्या गजरात झालं...

*''इतकं सांगून निघून गेली मुक्ताबाई*
*आई माझी सातशे वर्षांपूर्वीची*
*आता माझ्या हातात आहे*
*झळाळी विजेची.''*

ह्या झळाळत्या हातानेच सरिताबाईंचं साहित्यकर्तृत्व सिद्ध झालं आहे. गेल्या सहा दशकांपेक्षाही अधिक काळ कथा, कविता, ललित गद्य, संपादन, अनुवाद, बालसाहित्य, नाटक, वैचारिक लेखन अशा अनेकविध साहित्यप्रकारांत लेखन करून मराठी साहित्याचं दालन समृद्ध करणाऱ्या सरिताबाईंनी ३ जानेवारी २०१५ला या जगाचा अखेरचा निरोप घेतला. नुकतंच १८ डिसेंबरला त्यांना ८६ वं वर्ष पूर्ण झालं होतं. गेली चार-सहा वर्षं त्यांना प्रकृती साथ देत नव्हती; पण त्यांची तक्रार नव्हती किंवा आपलं दुखणंही कधी त्यांनी कुरवाळलं नाही. गेली दोन-अडीच वर्षं त्या अमेरिकेत धाकटा मुलगा मनोजकडे होत्या. असाध्य अशा दुखण्यामुळे त्यांना एकटीला पुण्याला ठेवायचं नाही असा त्यांच्या दोन्ही मुलांनी निर्णय घेतला होता. आणि अडीच वर्षांपूर्वी सरिताबाई आपल्या कर्मभूमीचा-पुण्याचा अखेरचा निरोप घेऊन कायम वास्तव्यासाठी अमेरिकेला गेल्या. त्या अमेरिकेत आहेत, दूर आहेत, पण आहेत हे समाधान होतं; पण आता त्या नाहीत हे वास्तव आहे. आयुष्यावर त्यांनी भरभरून प्रेम केलं. कायम सकारात्मक भूमिकेतून जगाकडे पाहिलं. एकटेपणाची तक्रार नव्हती. याही वयात त्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाशी स्वतःला जोडून घेतलं होतं. लॅपटॉपवर सर्वांशी त्या संवाद साधत राहायच्या. नवीन काही लिहिलं कविता वगैरे तर मैत्रिणींना तिथून पाठवत राहायच्या. शेवटी हॉस्पिटलमध्ये ॲडमिट व्हायच्या आधीही त्यांनी कविता लिहिली होती ती अखेरची ठरली. त्यांच्या मृत्यूनंतर १९ फेब्रुवारीला त्यांच्या अप्रकाशित कथांचा 'कांचनसंध्या' हा संग्रह प्रकाशित झाला.याआधी त्यांचे बारा रामांचं देऊळ आणि

घुसमट हे संग्रह प्रकाशित झाले आहेत.

सरिताबाईंच्या सान्निध्यात येऊन मला जवळजवळ ४० वर्षं झाली. त्यांना मी कधी रागावून बोललेलं आठवत नाही. चेहऱ्यावर नेहमी स्मित आणि अनेक गोष्टी जाणून घेण्याची त्यांना हौस होती. स्वभावाने त्या नावाप्रमाणे शांत होत्या. शांता हे त्यांचं माहेरचं नाव. आडनाव कुलकर्णी. सरिताबाईंचं जन्मगाव ठाण्याजवळ आगाशीचं. वडील शिक्षक होते. त्या काळातील प्राथमिक शिक्षकाच्या घरात असे तशी घरची परिस्थिती अगदी बेताची होती. तीन भावंडांच्या पाठीवर जन्म झाला म्हणून शांती करायला सांगितली; पण त्यांचे वडील पुरोगामी विचारांचे असल्यामुळे त्यांनी शांती करायच्याऐवजी मुलीचं नाव शांता ठेवलं. त्यांचं शालेय शिक्षण ठाणे जिल्ह्यात झालं. पुढे न्यू इंग्लिश स्कूल, सातारा येथे विद्यालयीन शिक्षण आणि पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजातून महाविद्यालयीन शिक्षण झालं. घरची परिस्थिती बेताची असल्याने परिस्थितीला तोंड देतच पण हुशारीमुळे शिष्यवृत्तीवर त्यांचं सगळं शिक्षण पार पडलं. बी. ए. आणि एम. ए.ला त्यांचा संस्कृत हा विषय होता. बी. ए.ला त्या कॉलेजात संस्कृतमध्ये पहिल्या आल्या आणि एम.ए.ला विद्यापीठात संस्कृतात पहिल्या आल्या होत्या.

सरिताबाईंच्या आईचे वडील कीर्तन करीत. त्यामुळे घरात लहानपणापासून आरत्या, अभंग, स्तोत्रं कानावर पडलेली. आईकडून त्यांना काव्याचा वारसा मिळाला. लहानपणीच सरिताबाईंनाही काव्यरचनेचा नाद लागला. कविता लिहिली की घरीदारी त्यांचं कौतुक होऊ लागलं. फर्ग्युसन कॉलेजात शिकत असताना 'साहित्य सहकार'मध्ये त्यांना प्रा. रा. श्री. जोगांचं मार्गदर्शन लाभलं. ग. प्र. प्रधान त्यांना इंग्रजी शिकवत. एकदा गप्पांच्या ओघात सरिताबाईंनी सांगितलं, की 'प्रधान सरांनी ऑर्थर कोसलरचं 'डार्कनेस अॅट नून' आणि 'अरायव्हल अँड डिपार्चर' ही दोन पुस्तकं वाचायला दिली. ती वाचल्यावर प्रखर वास्तववाद काय असतो ते मला समजलं आणि आपल्या पायाखाली कोणी पेटते निखारे ठेवलेत असं भासलं. या दोन कलाकृतींचा जबरदस्त परिणाम माझ्यावर झाला. घरची परिस्थिती अगदी बेताची, या वाचनाचा झालेला परिणाम आणि आयुष्यातलं वास्तव यामुळे माझ्या एकूण लेखनात वास्तववाद यायला लागला. किंबहुना माझ्या सर्वच साहित्यात प्रॅक्टिकल ड्रीमर आढळेल. एकीकडे वास्तववाद आणि संस्कृत वाङ्मयातला रोमँटिसिझम यांचं मिश्रण माझ्या काव्यात किंवा सर्वच साहित्यात झालंय.' उमेदीच्या काळात सरिताबाईंच्या कथा आणि कविता 'सत्यकथे'सारख्या मासिकात प्रसिद्ध होऊ लागल्या. त्या वेळी सत्यकथेत छापून येणाऱ्या साहित्याला आणि त्या लेखकाला एक वेगळंच वलय होतं. याच सुमारास मंगेश पदकी यांच्याही कथा 'सत्यकथे'तून येत होत्या. सत्यकथेच्या निमित्ताने दोघांची ओळख झाली. त्या वेळच्या उदयोन्मुख कवींच्या काव्यमैफली कविवर्य बा. भ. बोरकरांच्या घरी होत. मंगेश पदकी आणि सरिताबाईंच्या ओळखीची दृढ मैत्री या वातावरणात झाली. पुढे त्यांचा प्रेमविवाह झाला. साहित्यिक जोडपी तशी फार कमी आहेत. पदकी दांपत्य त्यापैकी एक. पदकी इंग्रजीचे अभ्यासक. घरातलं वातावरण साहित्यिक. या निकोप वातावरणात दोघांचं साहित्यविश्व फुललं.

सरिताबाईंचं शिक्षण पूर्ण झालं आणि त्यांच्या व्यावसायिक आयुष्याला सुरुवात झाली. डेक्कन कॉलेजात कोशविभागात, त्यानंतर गोखले अर्थशास्त्र संस्था, स्त्रीवाणी, भारतीय विद्या प्रसारिणी, फर्ग्युसन कॉलेजात काही दिवस संस्कृतचं अध्यापन करता करताच सरिताबाईंनी साहित्याची अनेक दालनं स्वतःसाठी खुली केली. काव्यलेखनाने सुरुवात झाली होतीच. मग नाटक, कथा, अनुवाद, अभ्यासग्रंथ, संपादन, समीक्षा, परिचयात्मक लेखन, स्तंभलेखन असं त्यांचं साहित्यलेखन विस्तारत गेलं. साहित्यनिर्मिती करताना अनेक उत्तम देशी-विदेशी साहित्य त्यांनी अभ्यासलं होतं. त्यांच्या बालपणातले काही दिवस विरार, नालासोपारा, पापडी अशा गावांतून निसर्गाच्या सहवासात गेले. पापडीमध्ये जवळच असलेल्या चर्चची घंटा सतत ऐकू यायची. नाताळातली येशूची मिरवणूक अस्वस्थ करायची. त्यातूनच बायबल वाचनाची ओढ निर्माण झाली. मग त्यांनी बायबलही अभ्यासलं. जे मनात येईल ते कृतीत आणायचं हा त्यांचा स्वभाव होता.

सरिताबाईंच्या एकूण पुस्तकांची संख्या तीसच्या आसपास आहे. त्यात विविधता आहे. त्यांच्या साहित्यकृतींवर लिहायचं झालं तर स्वतंत्रपणे दीर्घ लेख लिहावा लागेल. मात्र, त्याचा थोडक्यात आढावा घ्यायचा झाला तर पहिल्यांदा त्यांच्या काव्याचा उल्लेख करावा लागेल. सरिताबाईंनी कवितेवर आणि बालकवितेवर अधिक प्रेम केलं. त्यांची बालकविता त्यांच्या स्वतःच्या मुलांबरोबर रुजली, फुलली. मुलांच्या वाढीबरोबर कथालेखनही वाढलं. मुलांत मूल होऊन वावरण्याची कला त्यांच्याजवळ होती आणि बालमनाचा सूर त्यांना गवसला होता. त्यामुळे अत्यंत सकस अशी कविता त्यांनी बालविश्वाला दिली. त्यांनी बालगोपाळांसाठी केलेली वाङ्मयनिर्मिती मराठी बालसाहित्यात मोलाची भर घालणारी आहे. गुटर्रगूऽ गुटर्रगू, नाच पोरी नाच, सुळुऽक, गार्गुष्का आणि सात रंगांच्या कमानी माझ्या पापण्यांवर हा जपानी कवयित्री कानेगो मिनुजू यांच्या बालकवितांचा त्यांनी केलेला अनुवाद स्वतंत्र कलाकृती वाटावी इतका सरस झाला आहे. यापैकी गुटर्रगूऽ गुटर्रगू आणि नाच पोरी नाच या साठच्या दशकातील दोन्ही बालगीत संग्रहांना राज्यपुरस्कार प्राप्त झाले. बालसाहित्य आनंददायक असावं. मुलांना ते आपलं वाटायला हवं. आपलं वाटेल ते खरं बालवाङ्मय, अशी साधी-सोपी बालवाङ्मयाची त्यांनी केलेली व्याख्या. प्रौढपणा बाजूला ठेवून बालविश्वात शिरताना सरिताबाईंची कविता सोपी शब्दकळा, लोकगीतांची लय, नाद,

ताल घेऊन येते.

हसवणारं अत्तर, जंमत टंपू-टिल्लूची, करंगळ्या, अक्कल घ्या अक्कल, छोटू हत्तीची गोष्ट ही त्यांची बालकथांची पुस्तकं सरिताबाईंचं गद्य खूप कमी आहे. 'अंगणात माझ्या' हे त्यांचं ललितलेखनाचं पुस्तक म्हणजे मुलांसाठी लिहिलेलं निसर्गसूक्तच आहे.

सरिताबाईंचा पहिला कवितासंग्रह 'चैत्रपुष्प' हा १९६१ साली प्रसिद्ध झाला आणि दुसरा 'लगनगंधार' २००६ साली दीर्घ प्रतीक्षेनंतर रसिकांच्या हाती आला. सुरुवातीच्या काळात तारुण्यसुलभ प्रेमकविता आणि निसर्गकविता यात रमलेली त्यांची कविता पुढील कालखंडात बदलत्या जीवनजाणिवांचा वेध घेताना दिसते. १९७५ नंतर समाजजीवनात झालेलं स्थित्यंतर, बदललेलं समाजवास्तव यांचं प्रतिबिंब त्यांच्या काही कवितांमधून दिसतं, त्यांच्या भावविश्वामधून दिसते. अनुभूतींचं एकारलेपण किंवा मर्यादित भावविश्व यापेक्षा वेगळं जग त्यांच्या कवितेने दाखवलं.

नाटक हा साहित्यप्रकार सरिताबाईंनी सहजपणे हाताळला. 'बाधा' हे त्यांचं स्वतंत्र नाटक. त्याचे प्रयोग झाले. १९५६ मध्ये पन्नास वर्षांपूर्वी प्रौढ कुमारिकेचा प्रश्न त्यांनी त्यातून हाताळला होता. यात्रिक, एक प्रेम झेलु बाई, तळ्यात मळ्यात, हे असं असतं तर सगळं, खून पाहावा करून व सीता ही त्यांची नाट्यसंपदा पाहिली तर तत्कालीन हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या ज्या नाट्यलेखिका होत्या त्यात सरिताबाईंचं नाव मानाने घ्यावं लागतं. 'खून पाहावा करून' आणि 'सीता' ही अनुवादित नाटकं. पैकी 'खून पाहावा करून'चे अनेक प्रयोग झाले. स्नेहलता रेड्डी यांच्या 'सीता' या तेलुगू नाटकाचा अनुवाद करून त्यांनी मराठीमध्ये मोलाची भर घातली आहे. वेदनेच्या वाटेवरून जातानाही आपला आत्मसन्मान जपणारी 'सीता'ची व्यक्तिरेखा रूढ रामायणातील व्यक्तिरेखेपेक्षा वेगळी आहे. 'सीता' पुनर्मुद्रित व्हावं आणि त्याचे परत प्रयोग व्हावेत ही त्यांची इच्छा मात्र अपुरी राहिली.

अनुवादाच्या क्षेत्रात सरिताबाईंची कामगिरी मोलाची आहे. त्यांनी मोजकेच अनुवाद केले, पण ते मास्टरपीस ठरले. त्यातल्या दोन पुस्तकांचा उल्लेख करते. चाइल्ड ऑफ द डार्क (द डायरी ऑफ कॅरोलिना मारिया द जीझस- मूळ पोर्तुगीज भाषेत) या पुस्तकाचा अनुवाद त्यांनी 'काळोखाची लेक' या नावाने केला. हे पुस्तक ८० ते ९०च्या दशकात खूप गाजलं. ब्राझीलच्या झोपडपट्टीत राहणाऱ्या कागदकचरा गोळा करणाऱ्या स्त्रीची ही डायरी आहे. दुसरं 'अखेरचे पर्व' हे निर्मलकुमार बोस यांच्या 'माय डेज विथ गांधीजी' या इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद. गांधीजींच्या नोआखालीच्या वास्तव्यात बोस त्यांच्या दुभाष्याचं काम करत होते. गांधींबरोबर ते त्या काळात राहिले होते. त्या अनुभवावर आधारित हे पुस्तक आहे.

'काळोखाची लेक'साठी सरिताबाईंना केंद्र शासनाचा अनुवादाचा पुरस्कार मिळाला. 'जंमत टंपू-टिल्लूची' या बालकथा संग्रहालाही केंद्र शासनाचा पुरस्कार मिळाला. 'बाधा', 'चैत्रपुष्प', 'बारा रामांचं देऊळ' या पुस्तकांना राज्य शासनाचा पुरस्कार मिळाला. पुण्याच्या साहित्य संमेलनात त्यांना जीवनगौरव पुरस्कार देण्यात आला. इतर अनेक पुरस्कार आणि मानसन्मान त्यांना मिळाले.

स्त्रियांच्या सामाजिक प्रश्नांत त्यांना रस होता. 'निहार' या वेश्यांच्या मुलांसाठीच्या संस्थेशी त्यांचा जवळून संबंध होता. अंधशाळा, अनाथाश्रम इथे त्या मुलांसाठी कार्यक्रम करत तेव्हा त्या मुलांमध्ये रमून जात. 'वंचित विकास'च्या 'रानवारा' या बालमासिकाच्या त्या सल्लागार होत्या. तळागाळातील मुलांबद्दल आणि स्त्रियांबद्दल त्यांना विशेष आस्था होती. 'निहार' प्रकल्पासाठी त्यांनी खूप काम केलं होतं. लेखन करताना आणि सामाजिक काम करताना जीवनातला क्षण न् क्षण त्या समरसून जगल्या.

'साहित्यप्रेमी भगिनी मंडळ' हे संजीवनी मराठे, पद्मा गोळे, सरिता पदकी या कवयित्री आणि शांताबाई किर्लोस्कर या संपादक व सुधा साठे या लेखिका यांनी साहित्यविषयक मनमोकळी चर्चा करण्यासाठी सुरू केलेलं मंडळ. या साऱ्याचजणी साहित्यावर समरसून प्रेम करणाऱ्या होत्या. त्या काळची गरज म्हणून सुरू केलेलं मंडळ सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरं करत आहे. या साऱ्यांनी लावलेल्या या मंडळाचं आता संस्थेत रूपांतर झालं आहे. संस्थापक सदस्य असलेल्या सरिताबाई 'साहित्यप्रेमी'च्या १९९२ ते ९७ या काळात अध्यक्ष होत्या. त्या वेळी मी त्यांच्याबरोबर कार्यवाह म्हणून काम केलं. त्या वेळी त्यांच्या सामाजिक कार्याच्या या पैलूची मला जवळून ओळख झाली. 'साहित्यप्रेमी'च्या अध्यक्ष असताना त्यांच्या कार्यकाळात संस्थेची अधिकृत नोंदणी झाली आणि संस्थेची घटना तयार झाली. त्यांच्याच कल्पनेतून साहित्यप्रेमी भगिनी मंडळातर्फे १९९६ साली महाराष्ट्र साहित्य परिषदेला गिरिजाबाई केळकर, काशीबाई कानिटकर, लक्ष्मीबाई टिळक, बहिणाबाई चौधरी, आनंदीबाई शिर्के ते पद्मा गोळे, संजीवनी मराठे आदी १८ साहित्यकार स्त्रियांच्या तसबिरी डॉ. सरोजिनी वैद्य यांच्या हस्ते भेट म्हणून देण्यात आल्या. साहित्य परिषदेच्या कार्यालयात त्या लावल्या आहेत. अर्वाचीन मराठीतील सुरुवातीच्या कालखंडातील आणि महत्त्वाच्या अशा या साहित्यिकांच्या लेखनकर्तृत्वाचं स्मरण या तसबिरींच्या निमित्ताने निश्चितच होतं.

साहित्यकर्तृत्वाने जिचा जीवनपट उजळून निघाला अशी सरिताबाईंसारखी सामाजिक भान असणारी आणि सामाजिक बांधिलकी जपणारी लेखिका विरळाच.

◆

**डॉ. मंदा खांडगे**
भ्रमणध्वनी : ९३२६८४२२०५

विश्राम गुप्ते



लेखक विश्राम गुप्ते यांनी तरुण आश्वासक कवी विनायक येवले यांचा 'ठसे बदललेल्या मुक्कामावरून' हा कवितासंग्रह वाचून त्यांना लिहिलेले उत्कट पत्र खास पत्रिकेच्या वाचकांसाठी येथे प्रसिद्ध करत आहोत.

# एका लेखकाचे एका कवीस पत्र...

**प्रिय विनायक,**

'ठसे बदललेल्या मुक्कामावरून' हा तुझा कवितासंग्रह मी आत्ताच वाचून काढला. तो मी 'वाचून संपवला' असं म्हणणार नाही. कारण तुझ्या कवितेची ओळख म्हणजे ती वाचताना काळजावर रेखली जाते. ह्याचं कारण तुझी एक कवी म्हणून तळमळ आणि तू हस्तगत केलेली शब्दशक्ती. ह्याबद्दल तुझं एक कवी म्हणून मी अभिनंदन करतो. प्रतिक्रियेला उशीर केला ह्याबद्दल क्षमस्व. कवी आपल्या पोटातून काही तरी मांडतो. त्यावर वाचकाचा प्रतिसाद तितकाच उत्स्फूर्त आणि लगोलग हवा. तो तुला मी काही देऊ शकलो नाही, पण तुझ्या कविता वाचताना ही कविता कवितेच्या घोळक्यातून उठून दिसणारी आहे हे जाणवलं.

'मरणोन्मुख गावसंस्कृतीची सामुदायिक वेदना मांडणारी कविता' असं तुझ्या कवितेचं एक वाचन संभवतं. 'एका संवेदनशील, हळुवार माणसाचं समूहातलं एकटेपण व्यक्त करणारी कविता' असंही तुझ्या कवितेचं वाचन शक्य आहे. 'अत्यंत तिरकस आणि भेदकपणे भोवतालचा कौटुंबिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिसर टिपणारी कविता' असं तिसरं वाचनसुद्धा तुझ्या कवितेचं होऊ शकतं. तुझ्या गावाकडल्या कवितेचा आवाका बहुविध अर्थ व्यक्त करतो, ही तुझ्यासारख्या तरुण कवीसाठी फार आशादायक गोष्ट समज.

रूपकातून सांगायचं झालं, तर तुझ्या कवितेचा कॅनव्हास 'ग्लोबलायझेशन'चा आहे आणि त्याची फ्रेम 'ग्लोबल वॉर्मिंग'ची. तुझ्या कवितेतली नियतिशरणता आणि हतबलता ग्रामीण कवितेला नवी नाही. मात्र, तिला तू तुझा असा स्वर दिलेला आहे. जागतिकीकरण आणि ग्लोबल वार्मिंग ह्या दोन संकटांशी लढणारी तुझी कविता आहे. हे तसं म्हटलं तर 'कविताबाह्य' घटक वाटतात. पण कविता ही निखळ, शुद्ध, प्युअरब्युअर अशी अभिव्यक्ती नसतेच, तर तो बेइमान, बेवफा, बेमुर्वत काळाला दिलेला लिरिकल

रिस्पॉन्स असतो. तो तत्काळ प्रत्युत्तरासारखा असतो, आणि मुख्य म्हणजे तो फार विचार न करता चटकन पोटातून सुचलेला असतो. कादंबरी विचारपूर्वक रिस्पॉन्स तर कविता हृदयपूर्वक रिस्पॉन्स असं मला वाटतं. ह्या संदर्भात मला तुझी कविता फार पटली.



**ठसे बदललेल्या मुक्कामावरून**
**विनायक येवले**
**काव्याग्रह प्रकाशन, वाशिम**
**पृष्ठे : ८०**
**मूल्य : १२० रुपये**

**विनायक येवले**
भ्रमणध्वनी : ९०९६९९९८६५

तुझा तुझ्या ठसे बदललेल्या मुक्कामाशी जो संवाद आहे त्यातला उदास सूर मला अस्वस्थ करून गेला. आपली कविता अशी का झाली? तर आपली परिस्थितीच अशी होत गेली, असं तुझं म्हणणं असू शकतं. कविता परिस्थितिशरण असते, कारण कवी तसा असतो. आज 'गावसंस्कृतीची कविता' म्हणून जो कोणी कविता करतो, तो उखडलेल्या, उद्ध्वस्त झालेल्या, भंगलेल्या इमारतीबद्दल बोलत आहे, हे ग्रामीण मराठी कवितेत आज बऱ्यापैकी स्थापित झालेलं सत्य आहे.

गाव मेलं आणि शहर बेइमान झालं तर माणसाने जावं कुठे, हा तुझ्या कवितेतला अध्याहृत प्रश्न आहे. ह्याचं उत्तर तुझं तूच दिलं आहेस. अशा शोकात्म परिस्थितीत कवीने ना गावात राहावं ना शहरात, तर स्वतःतच राहावं. स्वतःच्या स्वच्छ जाणिवेत राहणं हा कलाकारांसमोरचा एकमेव पर्याय आहे. मला वाटतं, ह्या कवितेतून तू तोच निवडला आहेस. असं करणारे अनेक कवी आपली लिरिकल व्हेन गमावतात आणि गद्य होतात. तुझ्या कवितेत तसं काहीही होत नाही. सुरुवातीच्या ओळीपासून सुरू झालेली तुझी कविता अखेरपर्यंत ताणलेल्या प्रत्यंचेसारखी आहे. हा ताण टिकवणं सोपं नाही. ज्याच्या हृदयात परदुःखाबद्दल कळवळा आणि सहवेदना नांदते असा माणूस कवी होतो. ह्या दोन्ही गोष्टी तुझी कविता वाचताना तुझ्यात आहेत हे मला जाणवलं. पण विनायक, कवीला नुसती सहवेदना कामाची नसते, तर त्या वेदनेचं पोट चिरण्याची कुवत जरुरी असते. त्यासाठी सामाजिक भान आणि विश्लेषण लागतं. दोन्ही गोष्टींचा तुझ्या कवितेत तुटवडा नाही. मात्र, जे गाव पूर्वी सुंदर होतं, आणि जे आता मेलं किंवा मरायला टेकलं असं तुला वाटतं ते गाव पूर्वी खरोखरीच सुंदर होतं का, की त्या गावाबद्दल आपली चिकित्साबुद्धी विकसित झाली नव्हती, हा प्रश्न तू स्वतःला जरूर विचारला पाहिजेस.

ग्रामीण कवितेत किंवा एकूणच ग्रामीण साहित्यात, मला वाटतं, गावाचं जे रोमँटिकीकरण सुरू आहे त्यावर नव्याने चर्चा व्हायला हवी. प्रेम, जिव्हाळा, ओलावा, आपलेपणा ह्या गोष्टी गावात नसतात. त्या घरात आणि घराभोवती राहणाऱ्या माणसांमध्ये मधूनमधून व्यक्त होत राहतात. ह्या लोभस भावनांचा अनुभव फक्त गावातच नव्हे तर शहरात राहणाऱ्या आणि मेट्रोमध्ये राहायची पाळी आलेल्या एखाद्या मुलाला येणं शक्य आहे. ह्या रम्य भावनांचा तुटवडा पडू लागला की आपण अस्वस्थ होऊ लागतो. पण आजपासून पन्नास वर्षांपूर्वी, आणि पंधरा वर्षापूर्वी आपण राहायचो तो मुक्काम खरोखरच इतका आदर्श, रम्य, 'युटोपियन' होता, की आपण निरागस असल्यामुळे आपल्याला तसं वाटायचं? हा प्रश्न तुला आवडला नसला तरी त्या अंगानेसुद्धा तू तुझ्या एकूण मुक्कामाचा विचार करावा असं मी तुला सुचवेन.

माणसं बदललीत की ती पूर्वीपासून तशीच होती आणि आपला त्यांना बघणारा आपला नजरिया बदलला, हा विचार तुला वाटतो तितका टाकाऊ नसेलही कदाचित. तर यावर तू विचार कर. माणसं माणसं असतात. ती प्रेमळ, ओलसर, जिव्हाळा लावणारी आणि हेकट, तुटलेली, कोरडी, एककल्ली आणि स्वतःची स्वप्नं पूर्ण करणारी, दोन्ही असतात. तू म्हणतो त्या गावात माणसांमध्ये जास्त आदर्श गुण असतील; पण माणसांची सरासरी बेरीज संमिश्र असते. मात्र, एक कवी म्हणून तुझा भावनोद्रेक समजण्याजोगा आहे. तो तू अत्यंत चपखल भाषेत मांडला आहेस.

संपूर्ण एकटा असलेला स्व हा तुझ्या कवितेचा प्रवक्ता आहे. ह्याला कादंबरीत प्रॉटॅगॉनिस्ट म्हणतात. हा तुझ्या कवितेतला प्रवक्ता स्वतःच्या दुःखाला न गोंजारता समूहाचं दुःख भोगणारा छान माणूस आहे. प्रत्येकाने असंच राहावं; पण ते दैनंदिनतेच्या रामरगाड्यात शक्य होत नाही. प्रत्येकाला स्वतःची कामं असतात, स्वतःचं क्षितिज असतं. तिथे पोहोचायला प्रत्येकजण आतुर असतो. पण एखादा कवी सगळ्यांना कवेत घेणारं क्षितिज कसं बघू शकतो हे तुझ्या

कवितेवरून मला कळलं.

ह्या संग्रहातल्या बहुधा सगळ्याच कविता मला आवडल्या. त्यातली 'ओळख' ही अंगाने रोड पण आशयाने भारी कविता आहे. 'हरवलेल्या गावास अनावृत्त पत्र' ही कविता म्हणजे प्रत्येक कवीची आद्य कविता असते. मी गावात वाढलो नाही, पण ज्या शहरात मी लहानाचा मोठा झालो त्या शहराबद्दलसुद्धा मला तुला जे काही वाटलं तसंच काही तरी वाटतं. 'गावसंस्कृतीच्या बखरी झाल्या इतिहासजमा' असं तू काहीसं म्हणतोस. ह्या बखरी जर एखाद्या तिऱ्हाईत माणसाने, ज्याचं मन विचलित होत नाही अशा माणसाने, जर लिहून काढल्या असत्या तर त्यांच्यामधे तुला मी जे पाठ्यभेद सुचवू इच्छितोय ते कदाचित दिसले असते. पण ही एकूण कविता प्रभावी आहे. 'वेदनांनाही भुलवितो मी' ही कविता म्हणून अत्यंत घाटदार आणि सुंदर आहे. विशेषतः त्यातल्या अखेरच्या चार ओळी वाचून तुझी कवितेची तयारी जोरात सुरू आहे हे कळलं.

विनायक, तुझ्या 'ना दाद ना फिर्याद' या बापाची व्यथा आणि वेदना व्यक्त करताना त्याच्या कष्टाचं चीज होत नाही, ही खंत तू व्यक्त करतोस. त्यातली ओळ, 'न पडणाऱ्या पावसाचा हवाला मनी धरून' ही अस्वस्थ करते. बापाचं आणि निसर्गाचं हे युद्ध निसर्ग जिंकणार, कारण ग्लोबल वार्मिंग सुरू होतंय. त्यात बाप म्हणजे माणूस हरणार. कारण माणूस कितीही रड रड रडला तरी त्याच्या अश्रूंमुळे त्याच्या कोरडवाहू शेतीचं सिंचन होत नाही, हे प्रखर वास्तव आहे. ह्यावर गाव सोडून शहर जवळ करणे आणि तिथे आपला गाव वसवणे हा एक उपाय दिसतो. माणूस चिवट आहे. तो कुठेही तगतो, कुठेही रुजतो असं मला वाटतं. फक्त त्यासाठी शेतकऱ्यात जी स्वकष्टांबद्दल दुर्दम्य ईर्ष्या असते ती माणसाने अंगी बाणवावी लागते. पाऊस जेव्हा थांबेल तेव्हा फक्त गावंच नाही तर शहरंसुद्धा उजाड होणार आहेत हे तू पक्क समज. त्यामुळे गावसंस्कृतीवर जर दुष्काळाचं सावट येणार असेल तर त्याच्या दुप्पट सावट शहरावर येणार. फक्त तो दिवस आपण जिवंत असेपर्यंत येऊ नये असं, फार तर फार, आपल्याला मनाशी म्हणता येईल. मानवी अवस्था, मला तरी वाटतं, मग ती गावाकडली असो की शहराकडली, समजावून घ्यायला अत्यंत दुर्घट आहे. त्यावर उपाय-अविरत कष्ट म्हणजे काम हेच.

तुझी 'वाहाणं मात्र चालू आहे' ह्या कवितेतला तुझा पवित्रा स्थितप्रज्ञाचा आहे. सगळं भयंकर सुरू आहे आणि कवी तिऱ्हाइताचा उसना चेहरा घेऊन स्वतःच्या अपार्थिव शवाकडे पाहतोय. 'उधळलेला पट' ही कविता पण मला आवडली. 'अभावच ते फंडामेन्टल' ह्या कवितेतलं आत्मभान खूप आवडलं. 'जगण्याचा पार ढोल झालाय' ही ओळ प्रभावी आहे. तुझ्या 'आरेखन'मधली 'सीमेवरील अजातशत्रूंची विशाल छावणी' ही शब्दयोजना तुझ्यातली पोएटिक व्हेन कशी पक्की आहे हे दर्शवते. 'भावाच्या मुलीच्या पाचव्या 'बड्डे'च्या दिवशी'मधलं कौटुंबिकतेचं वर्णन म्हणजे गावात शहरी संस्कार कसे शिरले ह्याचं अत्यंत भेदक वर्णन आहे. गावातलं दारिद्र्य आणि 'बडे' समारंभातील तफावत अस्वस्थ करते.


मला तुझी आवडलेली कविता म्हणजे 'बर्म्युडा चड्डी घालून शीर्षासन करणारा कवी'. ही एक अफलातून कविता आहे. ती प्रत्येक कवीने, कथाकाराने, कादंबरीकाराने वाचायला हवी. कवितेतला भंपक कवी हा परदुःखाचं (एके काळी स्वतःचं असलेल्या) मार्केटिंग आपल्या कवितेतून कसा तरबेजपणे करतो आणि किती बेरकेपणे गावाला विसरून शहराला जवळ करतो हे तू इतकं तीक्ष्णपणे सांगितलं आहेस, की ते वाचताना मला एकाच वेळी हसू येत होतं आणि विषण्ण वाटत होतं. ही तुझी कविता ग्रामीण साहित्यावरची काव्यात्मक समीक्षा आहे असं मला वाटलं. माणूस भंपक आहे, कवीसुद्धा माणूस आहे, म्हणून तो भंपक आहे, हे लॉजिक तुला पचवावं लागणार आहे. पण एकूण ही कविता जोरदार जमली आहे.

विनायक, तुझ्या कवितेवर लिहिताना मी बरंच बोलून गेलो. कारण तुझ्या कवितेत संवेदनशीलता लपलेली आहे. तू तुझ्या नव्या मुक्कामाचा प्रदीर्घ अभ्यास कर. तुला शब्दांची कमतरता नाही. भावनांचा ओलावा तुझ्यात आहे. जगाकडे बघण्याची तिरकस नजर आहे. तेव्हा ह्याचा फायदा तुला तुझ्या पुढच्या लिखाणात जरूर होईल.

स्नेहांकित,

**विश्राम गुप्ते**


भ्रमणध्वनी : ९४२३८८६०४६




# प्रकाशक आणि त्यांचे प्रकल्प

सुजाता शेणई

**वाचक आणि प्रकाशक यांचं नातं अतूट असतं. वाचनसंस्कृती वाढविण्याची आणि ग्रंथप्रसाराची जबाबदारी दोघांचीही असते. चांगल्या वाचकांसाठी काही प्रकाशक महत्त्वाचे प्रकल्प हाती घेऊन आपली जबाबदारी पार पाडताना दिसतात. अशाच काही प्रकाशकांचा आणि प्रकाशनसंस्थांचा परिचय 'प्रकाशक आणि त्यांचे प्रकल्प' या सदरातून देत आहोत. या अंकात 'पद्मगंधा प्रकाशन'ने केलेले प्रकल्प, प्रकाशकाची भूमिका आणि वाचकांचा प्रतिसाद याविषयी...**











प्रकाशन व्यवसायाला दीर्घ परंपरा लाभली आहे. इ.स. १८०५ मध्ये श्रीरामपूर इथे विल्यम कॅरे याने 'मराठी भाषेचे व्याकरण' हे पहिले पुस्तक प्रकाशित केले. या पुस्तकाच्या निमित्ताने प्रकाशन व्यवसायाची मूहूर्तमेढ रोवली गेली. पुढे १८१३ मध्ये मुंबईत गणपत कृष्णाजी पाटील यांनी हिंदूंना उपयोगी पडेल म्हणून धर्मप्रसारार्थ पुस्तके प्रकाशित केली. सयाजीराव गायकवाडांच्या बडोदा संस्थानातही या दृष्टीने प्रयत्न झाले. कालपरत्वे त्यात भर पडत गेली. एकविसाव्या शतकात तंत्रज्ञानाने जोर धरला. त्याचा फायदा सर्व क्षेत्रांबरोबर प्रकाशन व्यवसायालाही झाला व गुणवत्ता आणि अचूकता यावर भर देता येऊ लागला. पुस्तकांच्या मांडणीतील बदलाबरोबरच प्रकाशित होणाऱ्या पुस्तकांची संख्याही वाढली नि अनेक प्रकाशनसंस्था कार्यरत झाल्या. त्यातीलच एक महत्त्वाचे नाव म्हणजे 'पद्मगंधा प्रकाशन'.



# स्वतःचा चेहरा असलेली प्रकाशनसंस्था पद्मगंधा प्रकाशन








**'पद्मगंधा'ची उभारणी**

'पद्मगंधा प्रकाशन'चे मालक आणि प्रकाशक अरुण जाखडे हे मूळचे नगर जिल्ह्यातल्या पेडगावचे. नोकरीसाठी म्हणून ते पुण्यात आले. काही काळ नोकरी केल्यानंतर नोकरीपेक्षा स्वतःचा प्रकाशन व्यवसाय असावा ही इच्छा त्यांना स्वस्थ बसू देईना. पुण्यात त्या वेळी (साधारण १९९४-९५ साली) इतरही प्रकाशनसंस्था होत्या. त्यांच्यापेक्षा आपण काही तरी वेगळे विषय हाताळले पाहिजेत आणि वैशिष्ट्यपूर्ण प्रकाशनसंस्था म्हणून ओळख निर्माण केली पाहिजे, ही त्यांची भूमिका होती. प्रकाशनसंस्था उभी करण्यामागे कोणता विचार होता, या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणतात, ''प्रकाशनसंस्था ही विद्यापीठाची प्रतिकृती बनायला पाहिजे. 'नॉलेज इंडस्ट्री' (ज्ञानभांडार) ही प्रकाशनसंस्थेची दुसरी बाजू असायला हवी. प्रकाशनसंस्थेला स्वतःचा चेहरा हवा. ते पुस्तक विकण्याचं विक्रीकेंद्र होता कामा नये. तसं झालं तर 'स्टेशनरीचं दुकान' आणि 'पुस्तक विक्री केंद्र' यात काय अंतर राहिलं? हे होऊ नये म्हणून मी 'पद्मगंधा'मार्फत जाणीवपूर्वक काही प्रकल्प कार्य हाती घेतलं.''

**प्रकल्प कार्य : निर्मिती व पुनर्निर्मिती**

कोणताही प्रकल्प हाती घ्यायचा तर त्याला बराच काळ द्यावा लागतो. लेखकाबरोबरच प्रकाशकाला स्वतःलाही त्यात सहभागी व्हावं लागतं. ते संशोधनाचं काम असतं. लेखक आणि प्रकाशक दोघांचाही बौद्धिक आणि आत्मिक विकास त्यात होत असतो. हे प्रकल्प कार्य म्हणजे लेखकाची निर्मिती तर प्रकाशकाची पुननिर्मिती असते. निर्मिती आणि पुनर्निर्मिती समांतर चालली पाहिजे. कोणताही प्रकल्प सुरू करणं सोपं नाही. त्यासाठी वेळेचं व कामाचं नियोजन, आर्थिक गुंतवणूक आणि सहभागी व्यक्तींचं सहकार्य फार मोठ्या प्रमाणात लागतं.

**'पद्मगंधा'चे प्रकल्प**

१९९६ मध्ये ही प्रकाशनसंस्था स्थापन झाली. सुरुवातीला ज्येष्ठ अभ्यासक आणि संशोधक डॉ. रा. चिं. ढेरे यांच्या 'संत, लोक आणि अभिजन', 'लोकसंस्कृतीचे उपासक' आणि 'भारतीय रंगभूमीच्या शोधात' या महत्त्वाच्या तीन पुस्तकांची पुनर्व्यवस्थापन करून, मांडणी करून प्रकाशन केलं. डॉ. रा. चिं. ढेरे हे देवताविज्ञान शाखा यातील मूलभूत संशोधनासाठी प्रसिद्ध आहेत. त्यांची 'श्रीतुळजाभवानी', 'करवीरनिवासिनी श्रीमहालक्ष्मी' आणि 'श्रीवेंकटेश्वर आणि श्रीकालहस्तीश्वर' ही पुस्तकं नव्याने प्रकाशित केली. त्यामुळे देवताविज्ञान शाखाप्रकारात 'पद्मगंधा'ला टाळून पुढे जाता येणार नाही, हे नक्की.

ज्ञानकोशकार आणि विसाव्या शतकातील द्रष्टा विचारवंत म्हणून नावाजलेले श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्या कादंबऱ्या आजही समकालीन वाटतात, म्हणून त्यांच्या 'सात' कादंबऱ्या 'पद्मगंधा'ने पुनर्प्रकाशित केल्या. तसेच दोन हजार वर्षांपूर्वीचा मराठीतील आद्यग्रंथ 'हाल सातवाहनाची गाथासप्तशती' प्रकाशित करून मराठी अभ्यासकांची आणि संशोधकांची चांगली सोय करून दिली. साहित्य, समीक्षा आणि लोकसाहित्य या विषयावरचे प्रकल्पही 'पद्मगंधा'ने केले.

**महत्त्वाच्या प्रकल्पांविषयी**

'पद्मगंधा'च्या महत्त्वाच्या काही प्रकल्पांविषयी अरुण जाखडे सांगतात, ''विसाव्या शतकातील द्रष्टे विचारवंत र. धों कर्वे यांच्यावर डॉ. अनंत देशमुख यांनी १५-२० लेख लिहिले होते. पण र. धों. कर्वे या बुद्धिप्रामाण्यवादी विचारवंतावर

**अरुण जाखडे**
पद्मगंधा प्रकाशन
भ्रमणध्वनी : ९८५००८६४२३
संपर्क - (०२०) २४४५०२६०

एखादं पुस्तक काढणं प्रशस्त वाटेना, म्हणून 'र. धों.' हा प्रकल्प 'पद्मगंधा'ने हाती घेतला. 'असंग्रहित र. धों. कर्वे' 'बुद्धिप्रामाण्यवाद', 'समाजस्वास्थ्यातील निवडक लेख', 'निवडक शारदेची पत्रे', 'मोपांसाच्या कथा', 'प्रो. र. धों. कर्वे : मते आणि मतांतरे', 'समाजस्वास्थ्य'कार' आणि 'शेष समाजस्वास्थ्य' अशा आठ ग्रंथांची निर्मिती केली. या विचारप्रकल्पात लेखकाबरोबर संपादकही समरस होत जातो. ज्ञाननिष्ठ जनसंपर्क ठेवावा लागतो. त्यांचे मौलिक सल्ले उपयोगी पडतात. कोणताही प्रकल्प हा एकट्याचा नसतो, तर त्यात प्रत्यक्ष- अप्रत्यक्ष अनेकांचा सहभाग असतो.''

भाषांच्या सर्वेक्षणाचा प्रकल्प व्हावा अशी केंद्र शासन आणि सर्व भाषातज्ज्ञांची इच्छा होती, परंतु प्रकल्प होत नव्हता. पुढे ज्येष्ठ भाषा अभ्यासक डॉ. गणेश देवी यांच्या मुख्य मार्गदशनाखाली हा प्रकल्प सुरू झाला. स्वातंत्र्योत्तर काळात प्रथमच भारतीय भाषांचं सर्वेक्षण झालं. समकालीन परिस्थितीत अस्तित्वात असणाऱ्या आणि विस्मरणाच्या सीमारेषांवर असणाऱ्या भाषांची नोंद 'भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण' या प्रकल्पातून घेतली गेली. विसाव्या शतकात जॉर्ज ग्रिअर्सन या आयरिश गृहस्थाने अशा प्रकारचं सर्वेक्षण केलं होतं. त्यानंतर जवळजवळ शंभर वर्षांनी असं सर्वेक्षण झालं आहे. महाराष्ट्रातील भाषांसाठीच्या प्रकल्पाची जबाबदारी 'पद्मगंधा'ने उचलली व 'भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण : महाराष्ट्र' या खंडातून ती प्रत्यक्षात आणली. चार भागांमध्ये विभागलेल्या या खंडात मराठीचा सर्वांगीण विचार अत्यंत सखोलतेने केला आहे. विविध प्रदेशांतल्या भाषा, त्यातील लोककथा, त्या त्या भाषेतील काही वैशिष्ट्यपूर्ण नामं, वैशिष्ट्यपूर्ण विशेषणं, वैशिष्टपूर्ण शब्दकळा, अपशब्द, वाक्प्रचार, म्हणी, उखाणे, इ. सारंच साक्षेपाने नोंदवलं आहे. या खंडाचं वेगळेपण म्हणजे या खंडाचे संपादक, समन्वयक आणि प्रकाशक अरुण जाखडेच आहेत. या खंडातून एखाद्या बेटावर स्वतंत्र राहणारी छोटी लोकवस्ती, ती कोणती भाषा बोलते, त्यांची संस्कृती कोणती याचाही शोध घेतला आहे. मराठीबद्दल सांगोपांग माहिती करून घेण्यासाठी या खंडाला पर्याय नाही.

मराठीतील एक व्रतस्थ काव्यसमीक्षक डॉ. अक्षयकुमार काळे यांच्या गौरवार्थ 'अर्वाचीन मराठी काव्यमीमांसा' हा बृहद्ग्रंथ 'पद्मगंधा'ने अलीकडेच प्रकाशित केला. यात एकूण आठ विभाग आहेत. 'काव्यरूपमीमांसा', 'काव्यप्रकारमीमांसा', 'वाद-विचारसरणी आणि अर्वाचीन मराठी कविता', 'नवे काव्यप्रवाह', 'काव्यसमीक्षापद्धती', 'साहित्यसिद्धांतसापेक्ष काव्यमीमांसा', 'अक्षयकुमार काळे : जीवन व समीक्षा' आणि 'परिशिष्टे' असे हे विभाग आहेत. अर्वाचीन काळात उदयास आलेल्या विविध विचारधारांचा कवितेशी असलेला अनुबंध आणि त्यातून फुललेल्या विविध काव्यरूपांचा चिकित्सक शोध हे या ग्रंथाचं वैशिष्ट्य आहे.

'पद्मगंधा'ने काही अनुवादाचे प्रकल्पही हाती घेऊन पूर्णत्वास नेले आहेत. त्यातला महत्त्वाचा प्रकल्प म्हणजे अगाथा ख्रिस्ती या 'क्वीन ऑफ क्राइम'ची पुस्तकं तीन संचातून, एकूण तब्बल ३८ कादंबऱ्यांतून प्रसिद्ध केली. मधुकर तोरडमल यांनी या कादंबऱ्यांचा अनुवाद केला आहे.


उर्दू शायरीचे कोहिनूर गालिब मराठीत प्रथमच त्यांच्या सर्व पैलूंसह 'गालिबचे उर्दू काव्यविश्व : अर्थ आणि भाष्य' (लेखक डॉ. अक्षयकुमार काळे) या पुस्तकातून 'पद्मगंधा'ने प्रकाशित केले. सुफी संप्रदायाची विविध अंगांनी सविस्तर चर्चा करणारा अभ्यासपूर्ण आणि संग्राह्य ग्रंथ 'सुफी तत्त्वज्ञान : स्वरूप आणि चिंतन' (लेखक डॉ. मुहम्मद आजम) 'पद्मगंधा'ने प्रकाशित केला आहे. याशिवाय कोणतेही वाङ्मयीन निकष न लावता काही समाजशास्त्रावर आधारित ग्रंथही त्यांनी प्रकाशित केले आहेत.

या प्रकल्पांना वाचकांचा कसा प्रतिसाद मिळतो, असं विचारलं असता जाखडे म्हणाले, ''वाचक तीन प्रकारचे असतात. सर्वसामान्य वाचक, वैचारिक वाचन करणारा आणि संशोधनात्मक दृष्टी ठेवून समजून घेणारा. वाचकालासुद्धा स्वतःची प्रतिभा हवी. अशा प्रतिभावान वाचकांसाठी आम्ही काही प्रकल्प केले. या प्रकल्पांच्या निमित्ताने माझ्या आयुष्यातला उर्वरित अभ्यास होत गेला. मूलभूत कामापर्यंत जाता आलं. प्रकल्पाच्या मांडणीला जी सौंदर्यदृष्टी लागते ती देण्याचाही प्रयत्न केला. मराठी साहित्यात लष्करी जीवन कमी प्रमाणात आलं आहे. सध्या त्याचा विचार चालू आहे. माझा वाचकवर्ग हा दीर्घजीवी वाचकवर्ग आहे आणि तो सर्व पिढ्यांत राहील याची मला खात्री आहे, विश्वास आहे आणि ते माझ्यासाठी पुष्कळ आहे असं वाटतं. प्रकाशनसंस्था विद्यापीठाची प्रतिकृती असावी हे स्वप्न अजून प्रत्यक्षात उतरलं नाही. काही मर्यादा आहेत, पण त्या दिशेने प्रयत्न मात्र जरूर सुरू आहेत.''

◆

**प्रा. सुजाता शेणई**
भ्रमणध्वनी : ९०११०१७९१६

# मच्छीमारांचं भावविश्व टिपणारी कादंबरी



**गाज**
**नीलिमा बोरवणकर**
**मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस**
**पृष्ठे : १३३**
**मूल्य : १७० रुपये**

महाराष्ट्रातल्या कोकणपट्ट्यातला मासेमारी हा आदिम व्यवसाय. 'मच्छीमार' ही जमातच त्यातून निर्माण झालेली. त्यांचे जीवनव्यवहार काहीसे वेगळेच. भाषाही निराळीच. सगळं काही मत्सव्यवहाराशी निगडित. त्यांची ही जीवनसरणी जवळून पाहावी, वाचकांपर्यंत पोहोचवावी या प्रेरणेतून लेखिका नीलिमा बोरवणकर यांची 'गाज' ही कादंबरी प्रकाशित झालेली आहे. या लेखनासाठी त्या अनेकदा कोकणात जाऊन राहिल्या. विशेषतः तळकोकणमधला सिंधुदुर्ग जिल्हा त्यांनी आपल्या नजरेत सामावून घेतला. तिथलं जनजीवन समजून घेतलं आणि कादंबरीच्या आकृतिबंधात ते वाचकांसमोर सिद्ध केलं.

मालवणात राहणाऱ्या एक साध्यासुध्या कुटुंबाची ही कथा आहे. एका छोटेखानी घरात राहून पैसे जमतील तसतशी एकेक खोली वाढवत नेणारी ही आयुष्य जगणारी समाधानी माणसं. परंपरागत जीवन जगत असतानासुद्धा नवेपणा स्वीकारण्याची सशक्त मानसिकता असलेलं हे मच्छीमार कुटुंब. मोठा मुलगा महेश आणि बापू मासेमारीच्या पारंपरिक व्यवसायात गुंतलेले. महेशला शिक्षणात फारसा रस नसल्याने बारावीनंतर वडलांबरोबर तोही मच्छीमारी व्यवसायात शिरलेला. दरम्यान त्याचं प्रेमलग्न झालेलं. खरं तर रेखा खूप हुशार. वैद्यकीय शिक्षणाचं स्वप्न ती आणि तिचे कुटुंबीय पाहत होते. महेशच्या प्रेमाखातर ती घरचा विरोध पत्करून आलेली, पण इथल्या पाण्यामातीत तळापासून मिसळून गेलेली. दुसरा मुलगा ज्ञानेश शिक्षणासाठी कोल्हापूरमध्ये राहिलेला. शिक्षण घेता घेता चळवळीचं वारं अंगात मुरलेला. तोही मधुवंती जोशी नावाच्या मुलीच्या प्रेमात पडलेला. तिलाही त्याच्यातला कार्यकर्ता खूप भावला होता. त्याच्याखातर तीही कोल्हापूर सोडून मालवणात आनंदाने राहायला तयार झाली. इथे ती रमलीही चांगली. पण पुढे तिच्या आणि ज्ञानेशच्या सहजीवनात किंचितसा कंगोरा जाणवायला लागला. त्याच्यातली मूल्यं, तत्त्वं आकुंचित होताहेत की काय असं भय तिच्या मनात दाटून यायला लागलं. ही भयलाट विरून जावी असं ती मनाला समजावत राहिली. दुसरीकडे आपल्या सासूशी आणि जावेशी तिचं नातं गर्द होत गेलं. जातीचा मुद्दा आड न येता ही मुलगी आपल्यात छान सामावून गेलीय याचं सासूला समाधान वाटत होतं. मधुवंतीने इथे मालवणमध्ये बचत गटासाठी महिलांना प्रेरित करून त्यांना आपल्या कार्यक्षमतेची जाणीव करून दिली आणि त्यातून स्वतःचं एक कार्यक्षेत्र उभं केलं. ज्ञानेशने मेडिकल शॉप उघडलं असलं तरी त्याच्यातलं कार्यकर्तेपण त्याने सांभाळलं होतं. पुढे त्याचा तोल ढळत जातो.

तिसरा मुलगा रमेश मुंबईत जाऊन हॉटेल मॅनेजमेंटचा कोर्स करून येतो आणि पॅरिसला त्यातलेच पुढचे अभ्यासक्रम करायला जातो. त्यासाठी आर्थिक जमवाजमव, त्यातले ताणतणाव, त्यातून त्याचं घराशी तुटलेपण येऊन कुटुंबाचं चित्र काहीसं विस्कटून जातं. मोठा मुलगा महेशच्या मनातही महत्त्वाकांक्षेचा मोहोर उमलू लागतो. त्याची अल्पसंतुष्टपणाची भूक मावळत जाते. समुद्रात लांबवर जाणारी मोठी बोट- तिला पर्सिननेट म्हटलंय- ती घेण्यासाठी त्याचा आर्थिक लढा सुरू होतो. कारण त्या बोटीमुळे धंद्यात लक्षणीय वाढ होणार असते. अशा बोटींमुळे छोट्या मच्छीमारांच्या धंद्यावर प्रतिकूल परिणाम होतो. यासाठी त्याच्या वडिलांनी या बोटींच्या वापराच्या विरोधात जाऊन अनेकदा लढा दिला. आणि आता आपलाच मुलगा एका अर्थाने स्पर्धक म्हणून उभा राहतोय यात त्यांचं आत्मरुदन तर आहेच. शिवाय समस्त मच्छीमारांवर येणाऱ्या आगामी संकटाची चाहूल त्यांना अस्वस्थ करते, हतबलही करते.

अखेरच्या टप्प्यात या दोघा पती-पत्नींना अगदी परिस्थिति- शरणता नाही पण आहे ती परिस्थिती शांतपणे, निर्मळ मनाने समजून घ्यायचं ठरवतात.

आईच्या (काशीबाईच्या) समजुतदार भूमिकेमुळे, आश्वासक करत करत परिस्थितीतला अशक्तपणा निघून जायला मदत होते.

कादंबरीचं कथासूत्र साधं, सरळरेषेत जाणारं आहे. अनेक कुटुंबांमध्ये अशी मतमतांतरं, कलह, स्पर्धा, अहंकार, वादळ, कुरघोड्या असतातही. त्यामुळे कुटुंबाची चौकट डळमळीत झाल्यासारखी वाटते. कौटुंबिक शांती ढळत जाते. हे सर्वसामान्य चित्र आहे. या कादंबरीतही असे कंगोरे आहेत, पण व्यवच्छेदक म्हणाव्या अशा एका विषयाला लेखिकेने


कादंबरीरूप दिलंय. एका चौकटबाह्य विश्वाला स्पर्श करून वाचकांना मच्छीमारांच्या भावविश्वात नेऊन कादंबरी लक्षवेधी केली आहे. त्यात नेमकेपणा, वस्तुनिष्ठता येण्यासाठी, तसंच मालवणी भाषेची लय साधण्यासाठी घेतलेले कष्ट या लेखनाविष्कारावरून जाणवतात.

रविमुकुल यांचं आशयसंपन्न मुखपृष्ठ लक्षवेधी झालं आहे. ते समोर ठेवून कादंबरीत शिरत गेलं की ती अधिकाधिक पकड घेत जाते, वाचनमग्नतेतून बाहेर पडू देत नाही. चित्रदर्शी शैली हेही लेखनाचं वैशिष्ट्य म्हणायला हवं. एकंदरीत, एक वाचनीय मेजवानी रसिकांसाठी लेखिकेने उपलब्ध करून दिली आहे .

◆ **नंदा सुर्वे**

भ्रमणध्वनी : ९४२३५३३२४०

# संत नामदेव, घुमान व शीख धर्मावर प्रकाश




**साहित्यवारी घुमानद्वारी**
**प्रकाश पायगुडे**
**संगत प्रकाशन**
**पृष्ठे : १४४**
**मूल्य : १०० रुपये**

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात आता साहित्य संमेलनाला वेगळे स्थान प्राप्त झाले आहे. शतकोत्तर परंपरा असलेला हा साहित्य उत्सव दरवर्षी कोठे साजरा होतो याबद्दलही मराठी रसिकांच्या मनात अपार उत्सुकता असते, तशी ती ह्या ८८ व्या संमेलनासाठीही होती. महामंडळाने ८८ वे संमेलन 'घुमान' ह्या पंजाबातील एका छोट्या गावात घेण्याचे ठरविल्यावर 'घुमान' हे चर्चेच्या केंद्रस्थानी आले.

ह्या पार्श्वभूमीवर 'घुमान'संबंधी तसेच तेथील संत नामदेव महाराजांचे वास्तव्य आणि कार्य, आणि प्राचीन आध्यात्मिक परंपरेशी आता जोडली जाणारी वाङ्मयीन परंपरा याबद्दल एकत्रित माहिती देणाऱ्या पुस्तकाची आवश्यकता निर्माण झाली. प्रकाश पायगुडे यांच्या 'साहित्यवारी घुमानद्वारी' या पुस्तकामुळे ही गरज आता पूर्ण झाली आहे.

पुस्तकाला डॉ. सदानंद मोरे यांची नेमकी आणि नेटकी प्रस्तावना आहे.

पहिल्याच लेखात संत नामदेवांचे चरित्र आणि त्यांच्या कार्याचे मर्म समजावून सांगितले आहे. अतिशय साररूपाने सांगितलेली ही चरित्रकथा संत नामदेवांच्या भक्तीचे व कार्याचे मोल समजावून सांगते. संत नामदेवांच्या आयुष्याचा आढावा घेतानाच त्यांच्या समकालीन संतांशी त्यांचे असलेले भावसंबंध व ज्ञानसंबंधही पायगुडे यांनी उलगडून दाखविले आहेत. 'नामदेवगाथा' ह्या मराठीतील अद्भुत ग्रंथाची रचना समजावून सांगतानाच लेखकाने संत नामदेवांचा आद्य चरित्रकार असा उल्लेख केला आहे तो सार्थच आहे.

पुढील प्रकरणात श्रीक्षेत्र घुमानबद्दल माहिती दिली आहे. घुमानला पहिल्यांदा गेल्यानंतर आणि नंतरही गेल्यानंतर लेखकाला आलेला आत्मानुभव सांगतानाच घुमान गावाची रचना पायगुडे यांनी अतिशय सचित्र टिपली आहे. डॉ. वि. भि. कोलते, डॉ. हे. वि. इनामदार, डॉ. वर्मा, आचार्य विनोबा भावे, बॅ. काकासाहेब गाडगीळ यांचे संदर्भ देऊन घुमानचे महत्त्व व महाराष्ट्राशी त्यांचे असलेले संबंध अधोरेखित केले आहेत.

पंजाबमधील भगत बाबा नामदेव ह्या प्रकरणात संत नामदेवांनी महाराष्ट्रातून केलेले स्थलांतर, घुमानमधील त्यांचे वास्तव्य आणि त्यांच्या पदरचनांचा उल्लेख करत संत नामदेवांचे आध्यात्मिक व सामाजिक विचार मांडले आहेत. शिखांच्या 'गुरू ग्रंथसाहिबा'मध्ये नामदेवांच्या पदरचनांना मिळालेले स्थान आणि शिखांनी स्वीकारलेले संत नामदेव बाबांचे शिष्यत्व पाहता संत नामदेवांचा प्रभाव तत्कालीन पंजाबमधील समाजावर केवढा होता याची कल्पना येते.

अर्थात हे अधिक समजून घेण्यासाठी शीख धर्म समजून घेणे आवश्यक आहे. पायगुडे यांनी पुढील काही प्रकरणे यासाठीच लिहिली आहेत. 'शीख धर्माची ओळख' या प्रकरणातून शीख धर्माचा परिचय होतो. त्याला जोडूनच त्यांनी पुढील प्रकरणात शिखांच्या १० गुरूंचा परिचय करून दिला आहे. पंजाबची माहिती व तेथील लोकजीवनाचीही माहिती 'ओळख पंजाबची' ह्या प्रकरणातून दिली आहे.

शेवटी संमेलनाचा मागोवा घेणारे प्रकरण, साहित्य संमेलनाची परंपरा, साहित्य संस्था व महामंडळाची रचना, संमेलने, संमेलनस्थळे आणि संमेलनाध्यक्ष यांची माहिती दिली आहे.

एकूणच, संत शिरोमणी नामदेव महाराज, त्यांचे महाराष्ट्र व पंजाबमधील कार्य, पंजाब आणि शीखधर्म, घुमानचे तीर्थक्षेत्र म्हणून होत असलेले महत्त्व व तेथे होत असलेल्या साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर साहित्यसंस्था व साहित्य संमेलनाची माहिती, एवढा मोठा दस्तऐवज अतिशय कमी शब्दांत, कमी पृष्ठांत मांडण्याचे पायगुडे यांचे कौशल्य कौतुकास्पद आहे. संमेलनाच्या स्मरणिकेपूर्वीची 'एकटाकी स्मरणिका' असाही उल्लेख ह्या पुस्तकाचा करावा असे वाटते. ह्या पुस्तकाच्या निमित्ताने संत नामदेवांचे व घुमान ह्या तीर्थक्षेत्राचे पुनःस्मरण होत आहे ही गोष्ट महत्त्वाची आहे.

◆ **प्रदीप खेतमर**

## मुख्य शाखा कार्यवृत्त

प्रकाश पायगुडे

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
# मुख्य शाखा (पुणे शहर) कार्यवृत्त

**२७ व २८ सप्टेंबर २०१४**

**दुसरे समीक्षा संमेलन :**

मसापचे दुसरे समीक्षा संमेलन ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यात आले. 'साहित्य आणि सौंदर्यशास्त्र' असा संमेलनाचा विषय होता. या वेळी पूर्वाध्यक्ष डॉ. के. रं. शिरवाडकर यांनी 'साहित्य आणि जीवन' या विषयावर निबंधवाचन केले. डॉ. सुधीर रसाळ यांचे 'साहित्य आणि सौंदर्यशास्त्र' या विषयावर बीजभाषण झाले. दुसऱ्या दिवशी डॉ. वसंत पाटणकर यांनी 'साहित्य व सौंदर्यशास्त्र', डॉ. मिलिंद मालशे यांनी 'सौंदर्यशास्त्रातील नवे प्रवाह', डॉ. मो. गो. धडफळे यांनी 'संस्कृत काव्यशास्त्रातील सौंदर्य संकल्पना', डॉ. त्रिभुवन रॉय यांनी 'हिंदी काव्यशास्त्र के परिप्रेक्ष्य में सौंदर्य और साहित्य संकल्पना', तर डॉ. बोरवणकर यांनी 'हिंदी काव्य शास्त्र के परिप्रेक्ष्य में सौंदर्य और साहित्य' या विषयावर आपले निबंध वाचले. या संमेलनाला मसापच्या कार्याध्यक्ष डॉ. माधवी वैद्य, प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे, कोषाध्यक्ष सुनील महाजन यांची प्रमुख उपस्थिती होती. दोन्ही दिवशी वक्त्यांचा परिचय व सूत्रसंचालन करण्याचे काम कार्यवाह डॉ. कल्याणी दिवेकर, नंदा सुर्वे, दीपक करंदीकर, उद्धव कानडे यांनी पार पाडले. समारोपाच्या सत्रात डॉ. सुधीर रसाळ यांचे समारोपाचे अध्यक्षीय भाषण झाले.

**१४ ऑक्टोबर २०१४**

**प. पू. परमहंसस्वामी स्वरूपानंद (पावस) स्मृती व्याख्यान :**

या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात डॉ. रामचंद्र देखणे यांचे 'ज्ञानदेवे रचिला पाया' या विषयावर व्याख्यान झाले. या वेळी वसंतराव देसाई, प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकाश पायगुडे यांनी, तर सूत्रसंचालन दीपक करंदीकर यांनी केले.

**१६ ऑक्टोबर २०१४**

**श्रद्धांजली सभा :**

डॉ. अशोक केळकर, शंकर वैद्य, जयवंत चुनेकर, राजाभाऊ माटे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी मसापच्या कार्याध्यक्ष डॉ. माधवी वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली सभेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी रामदास फुटाणे, डॉ. उज्ज्वला केळकर, डॉ. नीलिमा गुंडी, डॉ. कल्याणी दिवेकर, म. ना. गोगटे, डॉ. माधवी वैद्य आदींची श्रद्धांजलीपर भाषणे झाली.

**५ नोव्हेंबर २०१४**

**योगिनी जोगळेकर स्मृतिदिन :**

या निमित्ताने निमंत्रित कवींचे कविसंमेलन आयोजित करण्यात आले होते. त्यात मृणालिनी कानिटकर-जोशी, चंचला काळे, अंजली कुलकर्णी, प्रभा सोनवणे, ज्योत्स्ना चांदगुडे, अंजली महागावकर, अनन्या जोगळेकर यांनी सहभाग घेतला. या वेळी डॉ. नीलिमा गुंडी यांनी आपले काव्यविचार मांडून कविता सादर केल्या. कविसंमेलनाचे सूत्रसंचालन अंजली कुलकर्णी यांनी, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक करंदीकर यांनी केले. या वेळी सुधन्वा जोगळेकर व सुषमा जोगळेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

**१०,११ व १२ नोव्हेंबर २०१४**

**पुणे बुक फेअर :**

मसाप व पुणे बुक फेअर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ग्रंथप्रदर्शनाचे उद्‌घाटन श्याम आगरवाल आणि डॉ. माधवी वैद्य यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या

वेळी तीन दिवस विविध साहित्यिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यात अभिनेते राहुल सोलापूरकर यांची मुलाखत डॉ. कल्याणी दिवेकर यांनी घेतली, तर श्याम भुर्के व गीता भुर्के यांनी 'पु. ल. देशपांडे : एक आनंदयात्रा' हा कार्यक्रम सादर केला. तिसऱ्या दिवशी कविसंमेलन आयोजित करण्यात आले. त्यात स्वप्निल पोरे, संदीप अवचट, उद्धव कानडे, घनश्याम धेंडे, दीपक करंदीकर सहभागी झाले होते. कार्यक्रमांचे सूत्रसंचालन दीपक करंदीकर यांनी केले.

**१२ नोव्हेंबर २०१४**

**डॉ. रावसाहेब कसबे यांचा सत्कार :**

ज्येष्ठ साहित्यिक व मसापचे उपाध्यक्ष डॉ. रावसाहेब कसबे यांचा ७०व्या वाढदिवसानिमित्त डॉ. माधवी वैद्य यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी चंद्रकांत शेवाळे, रामदास फुटाणे, प्रकाश पायगुडे, सुनील महाजन यांची उपस्थिती होती. डॉ. कल्याणी दिवेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

**२६ नोव्हेंबर २०१४**

**द. वा. पोतदार पुरस्कार वितरण :**

हा पुरस्कार डॉ. पुष्कर रमेश शास्त्री यांच्या 'पेशवेकालीन पुणे शहरातील कोतवाली' या ग्रंथाला डॉ. श्री. मा. भावे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. परीक्षक म्हणून डॉ. अनुराधा कुलकर्णी व सुमित्रा कुलकर्णी यांनी काम पाहिले. या वेळी डॉ. शास्त्री, अनुराधा कुलकर्णी व डॉ. भावे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कल्याणी दिवेकर यांनी केले.

**२७ नोव्हेंबर २०१४**

**अहिताग्नी शं. रा. राजवाडे स्मृती व्याख्यान :**

या निमित्ताने हिमानी सावरकर यांचे 'क्रांतिकारकांच्या कुटुंबकथा' या विषयावर व्याख्यान झाले. या वेळी शैला मुकुंद यांनी राजवाडे यांच्या आठवणींना उजाळा दिला. प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे यांनी प्रास्ताविक, तर दीपक करंदीकर यांनी सूत्रसंचालन केले.

**२९ नोव्हेंबर २०१४**

**कविवर्य माधव जूलियन स्मृतिदिन :**

या निमित्ताने नचिकेत जोशी व कल्याणी देशपांडे यांचा 'अक्षरनाते' हा काव्य सादरीकरणाचा कार्यक्रम झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्याध्यक्ष डॉ. माधवी वैद्य यांनी, तर सूत्रसंचालन दीपक करंदीकर यांनी केले.

**११ डिसेंबर २०१४**

**संमेलनाध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांचा सत्कार कार्यक्रम :**

घुमान (पंजाब) येथे होत असलेल्या ८८व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांचा सत्कार मसापचे अध्यक्ष डॉ. प्र. चिं. शेजवलकर यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी कार्याध्यक्ष डॉ. माधवी वैद्य, प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे, कोषाध्यक्ष सुनील महाजन उपस्थित होते. या वेळी विविध संस्था-व्यक्तींनीही डॉ. मोरे यांचा सत्कार केला. या वेळी डॉ. मोरे यांनी सत्काराला उत्तर देणारे भाषण केले.

**१६ डिसेंबर २०१४**

**वि. वि. बोकील पुरस्कार वितरण कार्यक्रम :**

हा पुरस्कार संदीप खरे यांच्या 'अग्गोबाई, ढग्गोबाई' या काव्यसंग्रहास डॉ. माधवी वैद्य यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या वेळी संदीप खरे यांची प्रकाश पायगुडे यांनी मुलाखत घेतली. या वेळी बोकील यांचे चिरंजीव रमेश बोकील, प्रकाशक देवयानी कुलकर्णी-अभ्यंकर उपस्थित होते. परीक्षक म्हणून दीपक करंदीकर व अंजली महागावकर यांनी काम पाहिले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यवाह नंदा सुर्वे यांनी केले.

**२७ डिसेंबर २०१४**

**मिर्झा गालिब जयंती :**

या निमित्ताने मसाप व उर्दू साहित्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने 'याद-ए-गालिब' ही विशेष मैफल आयोजित करण्यात आली होती. प्रारंभी डॉ. अनिश चिश्ती यांचे गालिबच्या जीवनावर प्रकाश टाकणारे भाषण झाले. त्यानंतर श्रीनिवास वारुंजीकर, मानसी कानेटकर व दीपक करंदीकर यांनी 'याद-ए-गालिब' हा कार्यक्रम सादर केला, तर गालिबच्या गझलेतील शेरांवर आधारित 'तरही मुशायरा' या कार्यक्रमात नझीर फतेहपुरी, हसन अश्रफी, शमशाद बानो शाह, एस. एम. खान, सय्यद असिफ यांनी सहभाग घेतला.

**११, १२ व १३ जानेवारी २०१५**

**'मासिक मनोरंजनकार' कार. मित्र व्याख्यानमाला व श्री. म. माटे स्मृती व्याख्यान :**

मसाप व मराठी विज्ञान परिषद, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली. पहिल्या दिवशी विज्ञान परिषदेने घेतलेल्या विज्ञानकथा स्पर्धेतील विजेते डॉ. सुनीता बागवडे, डॉ. अनघा केसकर व दीपक आवटे यांनी आपल्या कथांचे वाचन केले, दुसऱ्या दिवशी मृणालिनी वनारसे यांचे 'निसर्ग- मानव संबंध आणि संस्कृती' या विषयावर व्याख्यान झाले, तर तिसऱ्या दिवशी श्याम मनोहर यांचे 'विज्ञान आणि साहित्य : अभ्यासाच्या पद्धती' या विषयावर व्याख्यान झाले. या वेळी डॉ. माधवी वैद्य, प्रकाश पायगुडे, सुनील महाजन यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. विनय र. र.

यांनी, तर सूत्रसंचालनाची जबाबदारी डॉ. कल्याणी दिवेकर, नंदा सुर्वे, दीपक करंदीकर यांनी पार पाडली.

**१९ जानेवारी २०१५**

**तिसरे पर्यावरणप्रेमी साहित्य संमेलन :**

मसाप व वसुंधरा महोत्सव यांच्या संयुक्त विद्यमाने व एच. व्ही. देसाई महाविद्यालयाच्या सहकार्याने महाविद्यालयाच्या सभागृहात हे संमेलन आयोजित करण्यात आले होते. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ दिलीप कुलकर्णी होते. ८८व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते या संमेलनाचे उद्घाटन झाले. या संमेलनात प्रा. हेमा साने यांचे 'वृक्षकथा' या विषयावर, तर अभिजित घोरपडे यांचे 'बदलते हवामान आणि आपण' या विषयावर व्याख्यान झाले. संमेलनाचे अध्यक्ष दिलीप कुलकर्णी यांची मुलाखत मंजिरी लिमये व डॉ. विलिना इनामदार यांनी घेतली. या कार्यक्रमाला डॉ. माधवी वैद्य, वीरेंद्र चित्राव, प्रकाश पायगुडे, सुनील महाजन, प्रा. गणेश राऊत यांची उपस्थिती होती. मोठ्या संख्येने विद्यार्थी या संमेलनात सहभागी झाले होते. डॉ. कल्याणी दिवेकर, नंदा सुर्वे आणि महेंद्र मुंजाळ यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

**३० जानेवारी २०१५**

**विद्याधर पुंडलिक पुरस्कार वितरण कार्यक्रम :**

हा पुरस्कार स्वाती चांदोरकर यांच्या 'आणि विक्रमादित्य हरला' या कथासंग्रहाला 'अंतर्नाद'चे संपादक भानू काळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या वेळी चांदोरकर व भानू काळे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन डॉ. कल्याणी दिवेकर यांनी केले.

**३ फेब्रुवारी २०१५**

**श्रद्धांजली सभा :**

सरिता पदकी, ॲड. रावसाहेब शिंदे, प्रा. म. द. हातकणंगलेकर, आर. के. लक्ष्मण, डॉ. वसंतराव गोवारीकर, डॉ. सीताराम रायकर या मान्यवरांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी डॉ. माधवी वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली सभा आयोजित करण्यात आली होती. डॉ. मंदा खांडगे, रावसाहेब पवार, प्रा. रूपाली शिंदे, मंगेश तेंडुलकर यांची श्रद्धांजलीपर भाषणे झाली.

**६ फेब्रुवारी २०१५**

**माधवराव मदाने स्मृती व्याख्यान :**

या निमित्ताने ज्येष्ठ पत्रकार-संपादक यमाजी मालकर यांचे 'जनधन आणि भारतीय मन' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रकाश पायगुडे यांनी, तर सूत्रसंचालन दीपक करंदीकर यांनी केले.

**२६ फेब्रुवारी २०१५**

**स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर स्मृती व्याख्यान :**

या निमित्ताने मंदार परळीकर यांचे 'क्रांतिवीर सावरकर' या विषयावर व्याख्यान झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकाश पायगुडे यांनी, तर सूत्रसंचालन दीपक करंदीकर यांनी केले.

**२७ फेब्रुवारी २०१५**

**डॉ. सुहासिनी इर्लेकर स्मृती पुरस्कार आणि कुसुमाग्रज पुरस्कार वितरण समारंभ :**

या वेळी डॉ. सुहासिनी इर्लेकर स्मृती पुरस्कार बालिका ज्ञानदेव बिटले यांच्या 'मॅगेझिनीतून सुटतेय गोळी' या काव्यसंग्रहाला, तर कॉन्टिनेंटल पुरस्कृत कवी कुसुमाग्रज पुरस्कार नीलम माणगावे यांच्या 'खचू लागली भुई' या काव्यसंग्रहाला आणि प्रकाशकाचा पुरस्कार मनोहर सोनवणे यांच्या 'कविताघर' या प्रकाशनाला ज्येष्ठ पत्रकार-संपादक, माजी संमेलनाध्यक्ष उत्तम कांबळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या पुरस्कारांसाठी प्रा. सुजाता शेणई, प्रतिक पुरी, डॉ. कल्याणी दिवेकर, महेंद्र मुंजाळ, दीपक करंदीकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. ॲड. यशवंत इर्लेकर आणि इर्लेकर कुटुंबीय उपस्थित होते. या वेळी बालिका ज्ञानदेव, नीलम माणगावे, मनोहर सोनवणे, सुजाता शेणई आणि उत्तम कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. कल्याणी दिवेकर, आभार नंदा सुर्वे यांनी, तर सूत्रसंचालन दीपक करंदीकर यांनी केले.

**२८ फेब्रुवारी २०१५**

**विज्ञानदिन :**

या निमित्ताने मसाप आणि मराठी विज्ञान परिषद, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. दिलीप सेठ व डॉ. यशवंत पाठक यांचे 'संतसाहित्यातील विज्ञाननिष्ठा' या विषयावर व्याख्यान झाले.

◆

**प्रकाश पायगुडे**
प्रमुख कार्यवाह
**कार्यवृत्त नोंद :** दीपक करंदीकर, कार्यवाह

# महाराष्ट्र साहित्य परिषद
# शाखा कार्यवृत्त
## (१ एप्रिल २०१४ ते २८ फेब्रुवारी २०१५)

### नंदुरबार शाखा

**दि. २९ मे २०१४ :**

गो. शं. सोनगिरीकर यांचे 'अहिराणी मायबोली' या स्वरचित म्हणींवर व्याख्यान झाले. डॉ. शिवाजीराव पाटील यांनी अध्यक्षीय समारोप केला.

### सासवड शाखा

**दि. ७ जून २०१४ :**

मसापच्या सासवड शाखेची पंचवार्षिक निवडणूक पार पडल्याचे अध्यक्ष रावसाहेब पवार यांनी कळविले.

### चाळीसगाव शाखा

**दि. १० ऑगस्ट २०१४ :**

प्रा. तानसेन जगताप यांच्या अध्यक्षतेखाली 'श्रावणसरी' हे कविसंमेलन पार पडले. अप्पासाहेब पाटील यांच्या हस्ते या कविसंमेलनाचे उद्घाटन झाले. कार्यक्रमाचे नियोजन रमेश पोतदार यांनी, सूत्रसंचालन शालिग्राम निकम यांनी, तर आभार गणेश आढाव यांनी मानले.

**३० ऑगस्ट २०१४ :**

संमेलनाध्यक्ष फ. मुं. शिंदे यांचा सत्कार राजीव देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला. प्रा. तानसेन जगताप यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. पाहुण्यांचा परिचय रामचंद्र गोसावी यांनी, तर सन्मानपत्राचे वाचन डॉ. संतोष मालपुरे यांनी केले. आभारप्रदर्शन गणेश आढाव यांनी, तर सूत्रसंचालन संगीता देव व शालिग्राम निकम यांनी केले.

**२८ सप्टेंबर २०१४ :**

शाखेची वार्षिक सर्वसाधारण सभा प्रा. तानसेन जगताप यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली, असे प्रमुख कार्यवाह रामचंद्र गोसावी यांनी कळविले.

### सोलापूर शाखा

**दि. १२ ऑगस्ट २०१४ :**

आचार्य अत्रे जयंती : या निमित्ताने ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी यांचे आचार्य अत्रे यांच्या शैक्षणिक कार्यावर प्रकाश टाकणारे व्याख्यान झाले.

कथा-कविता-भारूड मैफल : डॉ. इरेश स्वामी यांची कथा, अपर्णा सहस्रबुद्धे यांची भारुडे व हेमकिरण पत्की यांच्या कविता अशी बहारदार मैफल झाली. डॉ. सुहास पुजारी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

**७ ऑक्टोबर २०१४ :**

वर्धापनदिन : संस्थेचा ७३ वा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. मसाप दक्षिण सोलापूर शाखेचे नूतन अध्यक्ष नागेश सुरवसे व कवी माधव पवार यांचा या वेळी सत्कार करण्यात आला. संगीतकार प्रशांत देशपांडे यांचा 'गाणी मनातली' हा कार्यक्रम या वेळी झाला.

### जुळे सोलापूर शाखा

**१२ जून २०१४ :**

पु. ल. देशपांडे स्मृतिदिन : या निमित्ताने रजनीश जोशी व सुनीता तारापुरे यांनी 'पुलकित' हा कार्यक्रम सादर केला. या वेळी प्रशासकीय अधिकारी विष्णू कांबळे, अध्यक्ष डॉ. वासुदेव रायते, उपाध्यक्ष नारायण कुलकर्णी, कार्यवाह गिरीश दुनाखे, प्रशांत जोशी, मसाप जिल्हा प्रतिनिधी पद्माकर कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.

**२९ जून २०१४ :**

महाकवी कालिदास जयंती : जुळे सोलापूर शाखा आणि आनंद श्री प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने 'शब्दांचा पाऊस' हा नामवंत कवींच्या कवितांवर आधारित कार्यक्रम डॉ. माधव

मुतालिक व डॉ. मैत्रेयी मुतालिक यांनी सादर केला. कार्यक्रमाला डॉ. वासुदेव रायते, नारायण कुलकर्णी, गिरीश दुनाखे, प्रशांत जोशी, पद्माकर कुलकर्णी, डॉ. माधवी रायते आदी मान्यवर उपस्थित होते.

**९ ऑगस्ट २०१४ :**

'एक कवी आणि त्याच्या कविता' या उपक्रमांतर्गत हेमकिरण पत्की यांचा काव्यवाचनाचा कार्यक्रम झाला. या वेळी शाखेचे पदाधिकारी उपस्थित होते.

**७ सप्टेंबर २०१४ :**

वर्धानपदिन : शाखेच्या तिसऱ्या वर्धापनदिनानिमित्त वृक्षारोपण करण्यात आले. इंडियन मॉडेल स्कूलच्या विद्यार्थिनींनी नृत्यातून गणेशवंदना सादर केली. या वेळी राजा माने, ल. सि. जाधव, माधव पवार, इंद्रजित घुले, डॉ. सुहास पुजारी, जयंत पानसरे, अमोल जोशी या मान्यवरांचे सत्कार चंद्रकांत गुडेवार आणि डॉ. सुहासिनी शहा यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. वासुदेव रायते यांनी, आभार सायली जोशी यांनी मानले. शाखेच्या कार्यक्रमांचा आढावा गिरीश दुनाखे यांनी घेतला. श्री. बंड्या यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

**१३ सप्टेंबर २०१४ :**

शाखा व श्री व्यंकटेश संगीत विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मिलिंद तुळणकर यांचा जलतरंग वादनाचा कार्यक्रम झाला. प्रास्ताविक प्रा. रूपश्री येवलेकर यांनी, तर आभारप्रदर्शन संदीप कुलकर्णी यांनी केले.

**४ ऑक्टोबर २०१४ :**

वाघमोडे पुरस्कार सोहळा : या वेळी जयश्री बापट यांच्या 'जीवनसंगीत' या कथासंग्रहास, तर इंद्रजित घुले यांच्या 'या वेशीपासून त्या वेशीपर्यंत' या कथासंग्रहास डॉ. दत्तप्रसाद काटीकर आणि डॉ. मनीषा काटीकर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. जुळे सोलापूर शाखा व अंजनी साहित्य प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम झाला.

**५ ऑक्टोबर २०१४ :**

शाखा व मैत्र दिवाळी अंक यांच्या संयुक्त विद्यमाने 'लोकमंगल मैत्र दिवाळी अंक २०१४'चे प्रकाशन सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. इरेश स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली व डॉ. सुहास पुजारी यांच्या हस्ते करण्यात आले.

**२१ ऑक्टोबर २०१४ :**

दिवाळी पहाट कार्यक्रम : शाखा व श्री व्यंकटेश संगीत विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'दिवाळी प्रभाती सूर' हा पहाटगाण्यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रा. ए. डी. जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. यात जयंत पानसरे, नागेश पवार, मनोज परांजपे, मीरा देशपांडे, गौतमी नितुरी, पूनम लांडे, ऐश्वर्या व्हटकर यांनी गीते सादर केली. सचिन वाघमारे, महादेव नेल्सी, प्रशांत लोंढे, शिवराम नाईकनवरे, संदीप कुलकर्णी यांनी साथसंगत केली.

**१२ ऑक्टोबर २०१४ :**

डॉ. वासुदेव रायते यांच्या अध्यक्षतेखाली वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली.

**६ नोव्हेंबर २०१४ :**

महानगरपालिका आयुक्त चंद्रकांत गुडेवार यांनी दुर्मिळ ग्रंथसंग्रह कार्यवाह गिरीश दुनाखे यांच्याकडे सुपूर्द केले. या वेळी प्रशांत जोशी, पद्माकर कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.

**१६ नोव्हेंबर २०१४ :**

मसाप, जुळे सोलापूर शाखेच्या संकेतस्थळाचे उद्घाटन : संकेतस्थळाचे उद्घाटन मसापच्या कार्याध्यक्ष आणि अ. भा. मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्ष डॉ. माधवी वैद्य यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी प्रकाश पायगुडे, सुनील महाजन, शुभदा फडणवीस आदी मान्यवर उपस्थित होते. सायली जोशी व हे संकेतस्थळ तयार करणारे अमित कामतकर यांचा या वेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. वासुदेव रायते यांनी, आभार गिरीश दुनाखे यांनी, तर परिचय पद्माकर कुलकर्णी यांनी करून दिला.

**३० नोव्हेंबर २०१४ :**

जुळे सोलापूर शाखा व प्रिसिजन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्व. दत्ता हलसगीकर श्रेष्ठ साहित्यिक पुरस्कार' डॉ. अनिल अवचट यांना डॉ. जगदीश पाटील यांच्या हस्ते व अभिनंदन थोरात यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला. या वेळी 'मुक्ती' हा लघुपट दाखवण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. वासुदेव रायते यांनी, तर पाहुण्यांचा परिचय सायली जोशी व प्रशांत जोशी यांनी करून दिला. माधव देशपांडे यांनी मानपत्राचे वाचन केले, तर गिरीश दुनाखे यांनी आभार मानले.

### फलटण शाखा

**२५ नोव्हेंबर २०१४ :**

स्व. यशवंतराव चव्हाण एकदिवशीय साहित्य संमेलन : संमेलनाचे उद्घाटन संजय नहार (सरहद) यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी एक हजार विद्यार्थिनींनी कवी राजा मंगसुळीकर यांनी लिहिलेले 'यशवंत' हे गीत सादर केले. प्रा. रवींद्र येवले, महेश मांढरे यांनी यशवंतरावांच्या आठवणी

जागवल्या. संमेलनाचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक व. बा. बोधे यांनी भूषवले. या वेळी विलास वरे यांना यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. ज. तु. गार्डे, विजय जाधव, जीवन सावंत, रवींद्र कोकरे यांनी या वेळी कथाकथन केले.

**३ डिसेंबर २०१४ :**

ज्येष्ठ समाजसेवक डॉ. रवींद्र व डॉ. स्मिता कोल्हे यांच्या अनुभवकथनाचा कार्यक्रम सादर झाला.

### श्रीरामपूर शाखा

**३ फेब्रुवारी २०१५ :**

ॲड. रावसाहेब शिंदे यांना श्रद्धांजली अर्पण करणारी सभा आयोजित करण्यात आली होती. अविनाश आपटे अध्यक्षस्थानी होते. या वेळी नामदेवराव देसाई, काशिनाथ गोटागे, के. एल. खाडे, दिनकर पोखरकर, डॉ. कमलजित कौर बतरा, सुरेखा कासार यांची श्रद्धांजलीपर भाषणे झाली. डॉ. बाबुराव उपाध्ये यांनी प्रास्ताविक केले. प्रा. टी. ई. शेळके यांनी इच्छापत्राचे वाचन केले. विजय नगरकर, प्रकाश कुलथे, सुकदेव सुकले, संगीता कासाटे यांनी संयोजन केले.

### ठाणे शाखा

**२० एप्रिल २०१४ :**

ज्येष्ठ कवयित्री इंदिरा संत यांच्या जन्मशताब्दीनिमित्त प्रा. डॉ. वीणा सानेकर यांचे 'इंदिरा संतांचे साहित्य' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

**६ जुलै २०१४ :**

शाखेच्या ३५ व्या वर्धापन- दिनानिमित्ताने कवयित्री डॉ. प्रभा गणोरकर यांचे 'वाङ्मयीन संस्कृती : काल आणि आज' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

**२० सप्टेंबर २०१४ :**

प्रा. म. वि. फाटक स्मृतिपुष्प (वर्ष २७ वे) - प्रा. दीपक घारे यांच्या 'साहित्य आणि कला' या व्याख्यानाने गुंफले.

**४ डिसेंबर २०१४ :**

डॉ. जयप्रकाश घुमटकर यांच्या 'युगपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर : शोध आणि बोध' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. हे पुस्तक मसापच्या ठाणे जिल्हा शाखेनेच प्रकाशित केले आहे.

**३ जानेवारी २०१५ :**

डॉ. दाऊद दळवी लिखित भारतातील 'मुस्लिम स्थापत्यकला', 'माझे अंतरंग' (आत्मकथन), 'लेणी महाराष्ट्राची' (दुसरी आवृत्ती) या पुस्तकांच्या प्रकाशन सोहळ्यात कोकण इतिहास परिषदेत ठाणे शाखा सहभागी झाली होती. प्रा. जे. व्ही. नाईक यांच्या हस्ते या पुस्तकांचे प्रकाशन झाले. डॉ. अरूणचंद्र पाठक सहवक्ते होते. या वेळी डॉ. अरविंद दोडे आणि वासंती वर्तक यांनी 'माझे अंतरंग' या आत्मकथनातील काही भागांचे वाचन केले.

**२९ जानेवारी २०१५ :**

मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या वतीने आयोजित ८८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्या सत्कार कार्यक्रमात शाखा सहभागी झाली होती. या वेळी प्रा. मोरे यांची मुलाखत डॉ. वीणा सानेकर यांनी घेतली.

**१ फेब्रुवारी २०१५ :**

साहित्यिक एकनाथ आव्हाड यांचे 'कथाकथन व कवितेतून संवाद' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला, असे ठाणे जिल्हा शाखेचे कार्यवाह पद्माकर शिरवाडकर यांनी कळवले आहे.

◆

**प्रकाश पायगुडे**
प्रमुख कार्यवाह

**कार्यवृत्त नोंद :**
दीपक करंदीकर, कार्यवाह

## 'मसाप'च्या सर्व शाखांना आवाहन

'म. सा. पत्रिकेत' सर्व शाखांच्या विविध उपक्रमांना जास्तीत जास्त प्रसिद्धी देण्याचा प्रयत्न आहे. तरी सर्व शाखांनी आपापले विशेष उपक्रम/कार्यक्रम तसेच कार्यवृत्त ३१ मे २०१५ अखेर मध्यवर्ती शाखेस पाठवावेत, ही विनंती.

**- प्रमुख कार्यवाह**




## मन:पूर्वक अभिनंदन!

मराठीतील विनोदी साहित्याची परंपरा समृद्ध करणारे ज्येष्ठ साहित्यिक आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेचे माजी अध्यक्ष प्रा. द. मा. मिरासदार यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने दिला जाणारा 'विंदा करंदीकर जीवनगौरव' पुरस्कार नुकताच मराठी भाषादिनी (२७ फेब्रुवारी) प्रदान करण्यात आला. त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन!

## मन:पूर्वक अभिनंदन!

मराठी साहित्यात राजकीय कादंबरीचा मानदंड निर्माण करणारे ज्येष्ठ पत्रकार आणि साहित्यिक प्रा. अरुण साधू यांना कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा मानाचा 'जनस्थान' पुरस्कार नुकताच कुसुमाग्रजांच्या जन्मदिनी (२७ फेब्रुवारी) प्रदान करण्यात आला.
त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन!



# मराठी वाङ्मयाचा इतिहास

संपूर्ण संच ५२५०/- रुपयांत




## संचाची किंमत

| | | |
|---|---|---|
| खंड १ ला : | | रु. ५००/- |
| खंड २ रा : | भाग १ : | रु. ७००/- |
| | भाग २ : | रु. ७००/- |
| खंड ३ रा : | | रु. ३५०/- |
| खंड ४ था : | | रु. ४००/- |
| खंड ५ वा : | भाग १ : | रु. ३५०/- |
| | भाग २ : | रु. ३५०/- |
| खंड ६ वा : | भाग १ : | रु. ३५०/- |
| | भाग २ : | रु. ३००/- |
| खंड ७ वा : | भाग १ : | रु. ७००/- |
| | भाग २ : | रु. ८००/- |
| | भाग ३ : | रु. ७००/- |
| | भाग ४ : | रु. ७००/- |
| | | एकूण रु. ७०००/- |

**शाळा, महाविद्यालये आणि व्यक्तिगत ग्राहकांनाही रु. ५२५०/-**
**डिमांड ड्राफ्टने आगाऊ पाठविल्यास संपूर्ण संच** आमच्या खर्चाने रेल्वे अगर एस.टी. पार्सलने पाठवू. (वरील संचातील सुटे भाग हवे असल्यास ग्रंथविक्रेत्यांना २५ टक्के सूट. व्यक्तिगत ग्राहकांना व संस्थांना १५ टक्के सूट. टपालखर्च वेगळा.)

मागणीसाठी संपर्क : **महाराष्ट्र साहित्य परिषद**, टिळक रस्ता, पुणे – ४११ ०३०. दूरभाष : ०२०– २४४७५९६३

बुक-पोस्ट


प्रेषक
प्रमुख कार्यवाह,
**महाराष्ट्र साहित्य परिषद,**
टिळक रस्ता, पुणे - ४११ ०३०.
दूरभाष : ०२०-२४४७५९६३

Maharashtra Sahitya Patrika. Quarterly : March 2015
Registered with the Register of Newspaper for India under No. 6398/57
Book Pkt. Periodical Category